नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर - ४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक १८३ * * नागपूर * | शनिवार, दिनांक ०४ ऑक्टोबर २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## .. तर तुमचा इतिहास-भूगोल बदलू



■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ३ :
सरक्रीक प्रदेशात पाकिस्तानच्या लष्करी उभारणीबाबत संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी पाकिस्तानला कडक इशारा दिला आहे. ते म्हणाले, पाकिस्तानच्या कोणत्याही कृतीला इतिहास आणि भूगोल दोन्ही बदलेल असे उत्तर दिले जाईल.
सिंह म्हणाले की भारताची सीमापार दहशतवादाविरुद्धची लढाई सुरूच राहील. त्यांनी १९६५ च्या युद्धाची आठवण करून दिली. भारतीय सैन्य लाहोरला पोहोचले होते. पाकने हे लक्षात ठेवावे की कराचीला जाणारा एक मार्ग खाडीतून जातो.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## आणखी शिव्या हव्या होत्या

शिवसेना नावाची लढाऊ संघटना बाळासाहेब ठाकरे यांनी मराठी माणसाच्या संरक्षणाकरिता स्थापन केलेली होती. सुरुवातीचे दिवस अतिशय मंतरलेले होते जीवावर उदार होऊन शिवसैनिक बाळासाहेबांची आज्ञा शीरसावंद्य मानत होते. शिवसेना म्हणजे आज्ञाधारकांची संघटना आणि आज्ञा देणारे बाळासाहेब ठाकरे यांचे नाते फारच वेगळे होते. बाळासाहेबांबद्दल तुम्ही कितीही बोलले तरी ते कमी झाले. अशी भक्कम असलेली संघटना गेल्या तीन-चार वर्षात भरकटलेली वाटते. त्यापूर्वी काही काळ शिवसेनेत अंतर्गत असंतोष होता त्या असंतोषाचा फायदा नेमका भारतीय जनता पार्टीने उचलला. राजकारणात असेच होत असते आणि त्यात भारतीय जनता पक्ष संधी कशी साधावी हे बघून आपली पावले शांतपणे टाकत असतो. उद्धव ठाकरे यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळामध्ये एकनाथराव शिंदे यांच्याकडे अत्यंत फलदायी आणि मलाईदार खाती होती, खरं पाहायला गेले तर शिंदे त्या काळामध्ये उद्धव ठाकरे यांचे म्हणजेच सत्ता हाती असतानाचा जो काळ होता त्यामधील सरसेनापती होते. उद्धव ठाकरे किंवा ठाकरे परिवाराला बाळासाहेब असतानाही असे धक्के बसले होते. कारण तेव्हा भुजबळ गेले होते, राणे गेले होते, तरीही शिवसेनेचे बळ काही कमी झाले नव्हते. कारण बाळासाहेबांचा दरारा काही औरच होता. त्या काळात भारतीय जनता पक्षाला शिवसेनेचा आधार घेणे गरजेचे होते, ते त्यांनी केलेही मात्र २०१४ पासून महाराष्ट्राचे राजकारण ढवळून निघाले. युतीच्या पहिल्या कार्यकाळात शिवसेनेला जणूकाही शिवाशिवीचा खेळच खेळावा लागला होता. फारसे महत्त्व नसणारी खाती असताना त्यावेळी शिवसेनेचे अनेक मंत्री राजीनामा खिशात ठेवून फिरत होते. अशा राजीनामा खिशात ठेवणाऱ्या कुठल्याच मंत्र्यांनी कुणीच आणि कधीच राजीनामा दिला नाही आणि मग त्यानंतर २०१९ च्या निवडणुका आल्या. शिवसेनेशिवाय भागत नाही हे भाजपला दिसून आले आणि त्यात जे राजकारण झाले त्यानंतर मुख्यमंत्रीपदावर उद्धव बाळासाहेब ठाकरे विराजमान झाले मग, त्याबाबतीत शरदचंद्र पवार साहेबांचा आदेश असो किंवा विनंती असो परंतु उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले. महाराष्ट्राचा मुख्यमंत्री म्हणून आणि त्या वेळेचे संकट बघून त्यांना जे जे शक्य होते त्याप्रमाणे त्यांनी सरकार चालवले. जुन्या गोष्टी विसरून अडीच वर्षानंतर भारतीय जनता पक्षाने शिवसेनेच्या अनेक आमदारांना अलगद उचलले, तेव्हा आणि त्यानंतर काय झाले हे उद्धवरावांना कळलेच नाही आणि तेव्हा तिकडे गेलेले आमदार परत इकडे वळलेच नाहीत. मात्र, स्वतः उद्धवरावांनी घोषित केलेले सरसेनापती तिकडे गेल्यामुळे आणि त्यांच्यासोबत ते सर्वच आमदार त्यांचे झाल्यामुळे शिवसेनेचे गणित काही जुळून आले नाही. पूर्वी उद्धव ठाकरे यांची भेट मिळणे मुश्किल होते. नेमका तेव्हाच शिंदे साहेबांचा खुला दरबार होता. त्यावेळी उद्धवरावांना काहीच देणे घेणे नव्हते. अशा प्रकारे आधुनिक काळात कोणताही मुख्यमंत्री आपले सर्वस्व दुसऱ्याच्या हाती सोपवत नसतो. नेमके तेव्हा ते तसे झाले आणि मग उद्धवराव जमदग्नीप्रमाणे किंवा दुवार्सा सारखे आग ओकू लागले. सुरुवातीच्या काळात शिंदे त्यांच्या विरोधात बोलायला लाजत होते किंवा दबकत होते पण, तिकडून दररोज बॉम्ब वर बॉम्ब सुटत असल्यामुळे इकडेही हायड्रोजन बॉम्बची तयारी सुरू झाली. पहिल्या मेळाव्यात जी भाषा होती ती त्यातल्या त्यात जराशी सौम्य होती. लोकसभेत चमत्कार घडला तो भारतीय जनता पक्षाच्या जिव्हारी लागला, विधानसभेत तसा चमत्कार घडला नाही. आणि जो चमत्कार घडला तो सर्व विरोधकांना अगदी चारीमुंड्या चीत करता झाला. आता परवा उद्धवरावांची वाक्ये आधी ऐकवली गेली आणि मग शिरसावंद्य शिवसेनाप्रमुख यांच्याबाबत रामदासांनी कदमा-कदमावर जे काही उद्गार काढले त्यावरून आता महाराष्ट्राचे राजकारण किती शिव्याशब्दबंबाळ झालेले आहे हे दिसून आले आहे. घरचा करता पुरुष निघून गेल्यावर वारसदार जशी मारामारी करतात तशी शाब्दिक मारामारी जनतेचे मनोरंजन करून जात आहे. या सर्व वाक्यांना कोणीही गंभीरपणे घेत नाही. एकूणच जनतेला असेही वाटले असावे की या दोन मेळाव्यामध्ये थोडी आणखी शिव्यांची फोडणी दिली तर फारच मजा आली असती. पुढच्या वेळी याचे भान ठेवावे आणि जमलेच तर काही नवीन शिव्या शोधून काढाव्यात. ज्यायोगे दोघांचे श्रद्धास्थान बाळासाहेब ठाकरे यांना श्रद्धांजली वाहिल्यासारखे होईल. बाकी सर्व महाराष्ट्र प्रेमींना, जय महाराष्ट्र !

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## डॉ. हेडगेवार आणि बाबासाहेबांच्या विचारांमध्ये आश्चर्यकारक साम्य



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :
जिथे एकता आहे तिथे अस्मिता आहे, आणि जिथे विभागणी आहे तिथे पतन आहे. डॉ. हेडगेवार आणि बाबासाहेबांच्या विचारांमध्ये आश्चर्यकारक साम्य असल्याचे प्रतिपादन माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी केले. आरएसएसच्या विजयादशमी उत्सवात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.
गुरूवारी येथील रेशिमबाग मैदानावर आयोजित संघाच्या विजयादशमी कार्यक्रमात आरएसएस प्रमुख डॉ. मोहन भागवत, देश विदेशातील निमंत्रित पाहुणे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.
आपल्या भाषणात कोविंद यांनी डॉ. आंबेडकरांचे विचार अधोरेखित केले. संविधानामुळे एका सामान्य व्यक्तीला राष्ट्रपतीपदावर पोहोचता आले, हे त्यांनी आवर्जून नमूद केले. तसेच आपण आधी भारतीय आणि नंतर इतर काही आहोत, असा आंबेडकरांचा संदेशही त्यांनी जनतेसमोर पुन्हा ठेवला.
त्यांनी संत तुकाराम, संत रैदास, महात्मा




फुले, भगवान बिरसा मुंडा यांसारख्या महान विभूतिंचा उल्लेख करून, समाजातील विविध घटकांना संघ कसा एकत्र आणतो हे स्पष्ट केले.

(अधिक वृत्त पान ८ वर)

## निळ्या सागराचे अभिवादन !



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :
डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या धम्मक्रांतीचा उत्सव साजरा करण्यासाठी लाखोच्या संख्येत भीम अनुयायी नागपूरच्या दीक्षाभूमीवर आले. शहरातील सर्वच रस्ते आंबेडकरी अनुयायांच्या गर्दीने फुलून गेले होते . दीक्षाभूमिवर निळा जनसागर उसळल्याचे दिसून आले .जयभीमच्या जयघोषासह दीक्षाभूमीकडे जाणारे रस्ते अनुयायांनी गजबजले. स्थानिक प्रशासनानेही अनुयायांच्या सोयीसाठी तयारी पूर्ण करण्याचे प्रयत्न केले.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीच्यावतीने ६९ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा सोहळा गुरुवारी दीक्षाभूमीवर आयोजित करण्यात आला. अध्यक्षस्थानी स्मारक समितीचे अध्यक्ष भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई तर अतिथी म्हणून सारनाथ येथील धम्म लर्निंग सेंटरचे अध्यक्ष भिक्खु चंदिमा थेरो, चंदिगडच्या परिवहन व मत्स्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. राज शेखर वुंड्रू, पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम उपस्थित होते.
जेथे तथागत भगवान बुद्धांना संबोधी प्राप्त झाली, ते बुद्धगया हे जगातील बौद्धांसाठी महत्त्वाचे पवित्र स्थळ आहे, परंतू ते आजही सुवर्णांच्या ताब्यात आहे. बुद्धगया हेच आपले धर्मस्थळ आहे आणि ते परकीयांच्या ताब्यातून मुक्त करण्यासाठी दीक्षाभूमीवरून




एकजुटीने संकल्प करा, असे आवाहन भंते विनाचार्य यांनी केले.
मागील १३४ वर्षापासून बुद्धगया मुक्तिचा लढा सुरू आहे. डॉ. बाबासाहेबांनी आपल्या जीवनात अनेक लढाया लढल्या आणि त्या जिंकल्या आहेत. आपण त्या महामानवाची लेकरे आहोत, तेव्हा ही लढाई आपल्याला जिंकायची आहे, तरच बाबासाहेबांचे स्वप्न पूर्ण होईल, असेही ते म्हणाले.
बुद्धगयाचा ताबा बौद्धांना मिळाल्यास तेथे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे भिक्षु प्रशिक्षण व धम्म प्रशिक्षण केंद्र स्थापन होईल. भिक्खू व अनुयायांसाठी निवासव्यवस्था होईल. जगभरातील बौद्धांसाठी हेच मुख्य धर्मस्थळ ठरेल. देशातील बौद्धांनी एकजूट होण्याची गरज आहे. येत्या १२ फेब्रुवारी २०२६ ला राजधानी दिल्ली येथे बौद्धांची ताकद दाखवावी लागेल, तरच महाविहार मुक्त होईल, असे आवाहन त्यांनी केले.
धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई यांच्या नेतृत्वात भिक्खु संघाद्वारे सकाळी ९ वाजता सामूहिक बुद्ध वंदना घेण्यात आली. यावेळी बाबासाहेबांनी दिलेल्या बावीस प्रतिज्ञांचे वाचन देखील करण्यात आले. सायंकाळी ६ वाजता धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा मुख्य सोहळा पार पडला. दीक्षाभूमी परिसरातील शाळा, महाविद्यालय तसेच वसतिगृह, सभागृह, शासकीय कार्यालये अशा २५ ठिकाणी निवासव्यवस्था करण्यात आली होती. अनुयायांना याबाबत माहिती देण्यासाठी जागोजागी फलक तसेच क्युआर कोड लावण्यात आले होते.
गुरूवारी पहाटेपासून दीक्षाभूमि येथे अभिवादन करण्यासाठी मोठ्या रांगा लागल्या होत्या विविध संघटनांच्यावतिने .शहरात दीडशेपेक्षा अधिक ठिकाणी भोजनदानाची व्यवस्था करण्यात आल्याचे दिसून आले

## केंद्राकडून महाराष्ट्राला मोठी मदत

**कराचे आगाऊ ६४१८ कोटी हस्तांतरित**

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :
सणासुदीच्या हंगामाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने महाराष्ट्रासह सर्व राज्य सरकारांना कराचा आगाऊ हप्ता हस्तांतरित केला आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्राच्या वाट्याला ६४१८ कोटी रुपये प्राप्त झाले आहेत.
हे हस्तांतरण १० ऑक्टोबर रोजी होणाऱ्या सामान्य मासिक हस्तांतरणाव्यतिरिक्त असून, राज्यांना त्यांच्या भांडवली खचार्ला गती देण्यासाठी तसेच कल्याणकारी आणि विकास योजनांसाठी निधी उपलब्ध व्हावा या उद्देशाने करण्यात आले आहे.
केंद्र सरकारच्या या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी पंतप्रधान आणि केंद्रीय अर्थमंत्र्यांचे विशेष आभार मानले आहेत. सणासुदीच्या काळात राज्याला भांडवली खर्चात वाढ करण्यास सक्षम करण्यासाठी तसेच विविध योजनांना वित्तपुरवठा करण्यासाठी या निधीचा निश्चित उपयोग होईल, असा विश्वास अजित पवार यांनी व्यक्त केला आहे.
या अतिरिक्त निधीमुळे, विशेषतः मराठवाड्यातील पूरग्रस्तांना यातून काही तातडीची मदत मिळणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. राज्याला मिळालेला हा मोठा निधी आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना दिलासा देण्यासाठी कशा प्रकारे वापरला जातो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## आठ पर्यटक बुडाले

**तिघांचे मृतदेह हाती लागले**

■ वृत्तसंस्था, सिंधुदुर्ग, दि. ३ :
सिंधुदुर्गमधून एक दुःखद बातमी समोर आली आहे. या ठिकाणी सिंधुदुर्ग -शिरोडा वेळागर समुद्रात आठ पर्यटक बुडाले.
यापैकी तिघांचे मृतदेह हाती लागले असून, अन्य पाच जणांचा शोध सुरू आहे. सर्व पर्यटक सिंधुदुर्ग जिल्ह्यातील असल्याची माहिती आहे. मृतदेह शोधण्यासाठी प्रशासनाकडून सर्वतोपरी उपायोजना केल्या जात आहेत.

## ट्रॅक्टर-ट्रॉली तलावात पडली
## १३ जणांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, खंडवा (म.प्र.), दि. ३ :
मध्य प्रदेशातील खंडवा येथे दुर्गा मूर्ती विसर्जनादरम्यान एक ट्रॅक्टर-ट्रॉली तलावात पडली. या अपघातात आठ मुलींसह तेरा जणांचा मृत्यू झाला. सुमारे २० ते २५ जण बुडाल्याचे वृत्त आहे.
ही घटना खंडवा येथील पंधनाजवळील अर्दला गावात घडली. मूर्ती विसर्जनासाठी एका तात्पुरत्या पुलावर उभा असलेला ट्रॅक्टर-ट्रॉलीसह तलावात उलटला आणि सर्व प्रवासी पाण्यात पडले. या घटनेत १३ जणांचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात येत असले तरी मृतांचा आकडा वाढू शकतो.

## राज्यात आजपासून इलेक्ट्रॉनिक बॉण्ड

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :
महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन आज महाराष्ट्रात इलेक्ट्रॉनिक बॉंड प्रणाली सुरु केली आहे. या नव्या डिजिटल योजनेमुळे राज्यातील आयातदार आणि निर्यातदारांना मोठा दिलासा मिळणार आहे. आता विविध व्यवहारांसाठी वेगवेगळे कागदी बॉंड देण्याची गरज नाही; एकच ई-बॉंड सर्व व्यवहारांसाठी पुरेसे ठरेल.
राज्य शासनाच्या नोंदणी व मुद्रांक विभागाच्या पुढाकाराने, ई-बॉंडची सुरुवात करण्यात आली आहे. ई-बॉण्ड ही एक डिजिटल प्रणाली आहे. या माध्यमातून आयातदार आणि निर्यातदार विविध कस्टम व्यवहारांसाठी वेगवेगळे कागदी बॉण्ड वापरण्याऐवजी एकाच इलेक्ट्रॉनिक बॉण्डद्वारे सर्व प्रक्रिया पूर्ण करू शकतात.
आयातदार आणि निर्यातदारांना प्रोव्हिजनल असेसमेंट्स, एक्सपोर्ट प्रमोशन स्कीम्स, वेअरहाऊसिंग, मॅन्युफॅक्चरिंग इन बॉन्डेड वेअरहाऊसेस अशा सर्व प्रक्रिया एकाच इलेक्ट्रॉनिक बॉंडद्वारे करता येतील. ई-बॉंड ICEGATE पोर्टलवर तयार केला जाईल; NeSL द्वारे ई-स्टॅम्पिंग आणि ई-स्वाक्षरी केली जाईल.

## वेस्ट इंडीजवर २८६ धावांची आघाडी



■ वृत्तसंस्था
अहमदाबाद, दि. ३ :
अहमदाबाद कसोटीत भारताने वेस्ट इंडिजविरुद्ध मजबूत आघाडी घेतली आहे. शुक्रवारी दुसऱ्या दिवशी खेळ संपला तेव्हा भारतीय संघाने ५ बाद ४४८ धावा केल्या होत्या. अष्टपैलू रवींद्र जडेजा १०४ आणि वॉशिंग्टन सुंदर ९ धावांवर नाबाद राहिला.
त्याआधी ध्रुव जुरेल आणि केएल राहुल यांनीही शतके झळकावली. ध्रुव जुरेलला खारी पियरेने १२५ धावांवर बाद केले. केएल राहुल (१०० धावा) ला जोमेल वॉरिकनने बाद केले आणि कर्णधार शुभमन गिल (५० धावा) ला रोस्टन चेसने बाद केले.
गुरुवारी नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतलेल्या कॅरेबियन संघाला फक्त १६२ धावा करता आल्या. वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजने ४ आणि जसप्रीत बुमराहने ३ बळी घेतले. रवींद्र जडेजाने १२६ व्या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर आपले शतक पूर्ण केले.

## मुख्यमंत्री म्हणाले, वरदा तुझ्या दातृत्वाला सलाम !

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :
मुसळधार पावसाने राज्यातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान केले आहे. शेतातील पिके, माती आणि जनावरे पाण्याच्या लोंढ्याबरोबर वाहून गेल्याने शेतकरी आर्थिक दृष्ट्या हतबल झाले आहेत. या संकटकाळात पूरग्रस्तांना विविध सामाजिक घटकांकडून मदत मिळत असल्याने त्यांना काही प्रमाणात आधार मिळत आहे.
अशातच नागपूर येथील एका चार वर्षाच्या वरदा तिमांडे या चिमुकलीने मुख्यमंत्री सहायता निधीसाठी निधीमध्ये दिवाळीसाठी जमा केलेले पैसे थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हातात दिले. तसेच दसऱ्यानिमित्त सोने देऊन आशीर्वाद घेतला. खुद्द मुख्यमंत्री फडणवीसने त्यांच्या सोशल मीडिया अकाउंटवरून ही माहिती दिली.



मुख्यमंत्री फडणवीस यांनी पूरग्रस्तांसाठी तातडीने २,२१५ कोटी रुपयांच्या मदतीची घोषणा केली आहे. ही मदत लवकरच शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवली जाईल, असे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातूनही शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे प्रयत्न सुरू आहेत.
राज्यातील सर्वपक्षीय आमदार,खासदारांनी आपल्या एका महिन्याच्या वेतनाची रक्कम पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी देण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारी कर्मचाऱ्यांनीही एका दिवसाच्या पगाराचे योगदान देण्याचे ठरवले आहे. राजकीय नेते आणि सरकारी कर्मचारी यांच्या सहभागामुळे पूरग्रस्तांना मदत मिळण्याची प्रक्रिया गतिमान झाली आहे.

## उद्धव ठाकरेंनी माझे १ हजार रुपये वाचवले...

उद्धव ठाकरे यांच्या दसरा मेळाव्यात विकासाच्या मुद्यावर कोणताही उहापोह झाला नाही. त्यामुळे माझे १ हजार रुपये वाचले, असा उपरोधिक टोला मुख्यमंत्री फडणवीस यांनी हाणला. उद्धव ठाकरे यांचा गुरूवारी दसरा मेळावा झाला. त्यात त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर बोचरी टीका केली होती.
फडणवीस यांनी आज त्यांच्या या टीकेचा समाचार घेतला. ते म्हणाले, मी उद्धव ठाकरे यांचे आभार मानेन. त्यांनी माझे १ हजार रुपये वाचवले. मी आवाहन केले होते की, उद्धव ठाकरेंच्या भाषणात एकतरी विकासाचा मुद्दा दाखवा आणि १ हजार रुपये मिळवा. उद्धव ठाकरेंनी आपल्या संपूर्ण भाषणात विकासाच्या मुद्यावर कोणतेही भाष्य केले नाही. ते बोलूही शकत नाहीत. त्यामुळे माझे १ हजार रुपये आपसुकच वाचले.



# दसरा मेळाव्यात धडाडली उद्धव ठाकरेंची तोफ

## शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये द्या, अन्यथा राज्यभर आंदोलनाचा दिला इशारा



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आजच्या दसरा मेळाव्यात सत्ताधारी पक्षांवर आणि केंद्र सरकारवर सडकून टीका केली. महाराष्ट्रातील ओल्या दुष्काळाचा मुद्दा उपस्थित करत त्यांनी तातडीने शेतकऱ्यांची कर्जमुक्ती करावी आणि हेक्टरी 50 हजार रुपये मदत जाहीर करावी, अन्यथा राज्यभर मोठे आंदोलन करण्याचा इशारा दिला.

पक्षातील फुटीबद्दल बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, अनेक पक्षांनी शिवसेना फोडण्याचा प्रयत्न केला. काही जणांना त्यांनी पळवले, पण जे पळवले ते पितळ होते, सोनं माझ्याकडेच आहे. त्यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर टीका करताना 'भगवी शाल पांघरलेले गाढव' असे म्हणत हिणवले. सध्याची परिस्थिती मोठी आहे, असे नमूद करत त्यांनी केंद्र आणि राज्य सरकारवर चौफेर टीका केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'ओला दुष्काळ' ही संज्ञाच नसल्याचे म्हटले होते, यावर उद्धव ठाकरे यांनी आक्षेप घेतला. खड्ड्यात घाला समळे निकष आणि शेतकऱ्यांना मदत करा, अशी मागणी त्यांनी केली. आपल्या कार्यकाळात केलेली कर्जमाफी व नियमित कर्ज भरणाऱ्यांसाठी 50 हजार रुपये प्रोत्साहनपर रक्कम देण्याची घोषणा गद्दारांमुळे अपूर्ण राहिली, असा आरोप त्यांनी केला.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला 100 वर्षे पूर्ण झाल्याबद्दल बोलताना त्यांनी सरसंघचालक मोहन भागवत यांना उद्धव ठाकरे यांनी थेट प्रश्न विचारला. संघाच्या 100 वर्षाच्या मेहनतीला लागलेली विषारी फळे (भाजपचे राजकारण) यावर तुम्ही समाधानी आहात का? तसेच, मोहन भागवत यांनी मुस्लिम धर्मगुरूंच्या भेटी घेतल्या. त्यांना म्हणू शकता का मोहन भागवत यांनी हिंदुत्व सोडले? आहे का हिंमत भाजपमध्ये? असा सवालही त्यांनी केला.

उद्धव ठाकरे यांनी जनसुरक्षा विधेयकाला विरोध करण्याचे आवाहन केले. मणिपूर तीन वर्षांपासून जळत आहे, पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी याकडे पूर्ण दुर्लक्ष केल्याचे ते म्हणाले. लडाखमधील न्याय हक्कांसाठी लढणाऱ्या सोनम वांगचूक यांना तुरुंगात टाकण्यावरही त्यांनी टीका केली.

आगामी मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बोलताना, भाजपला 'अमिबा' (एकेपेशीय प्राणी) म्हणून संबोधले. ते व्यापारी म्हणून मुंबईकडे बघत आहेत, आम्ही आमचा जीव म्हणून मुंबईकडे बघतो, असे ते म्हणाले. भाजपकडून निवडणुकीच्या तोंडावर महिलांच्या खात्यात पैसे टाकून 'पगारी मतदार' तयार करण्याचे काम सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला. बिहारमधील महिलांना 10 हजार रुपये दिले जात आहेत, मत विकत घेण्यासाठी यांच्याकडे पैसे आहेत, पण शेतकऱ्यांसाठी नाही, असेही उद्धव ठाकरे म्हणाले.

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येणार का, या प्रश्नावर उद्धव ठाकरे यांनी स्पष्टीकरण दिले. 5 जुलैला आम्ही एकत्र आलो आहोत ते एकत्र राहण्यासाठी. जिथे मातृभाषेचा घात होत असेल, तिथे मी मराठी माणसात फूट पडू देणार नाही, असे ते म्हणाले. मराठी भाषेवर हिंदीची सक्ती सहन केली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. मराठीला हात लाऊन दाखवाच, हात जागेवर ठेवणार नाही, असे म्हणत त्यांनी सत्ताधाऱ्यांना इशारा दिला आहे.

# ३० वर्षांची माया कुठे गेली, लंडनला?

## पूरग्रस्तांना तुम्ही बिस्किटचा पुडा तरी नेला का? एकनाथ शिंदेंचा उद्धव ठाकरेंना तिखट टोला



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :

एकनाथ शिंदे यांनी गोरेगावातील दसरा मेळाव्यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर अत्यंत कठोर शब्दांत आणि थेट आरोप करत हल्लाबोल केला. त्यांच्या पूरग्रस्त भागातील दौऱ्यावरही शिंदेंनी जोरदार टीका केली. तुम्ही एक बिस्किटचा पुडा तरी नेला का? असा सवाल शिंदेंनी केला. तसेच या खुर्चीसाठी उद्धव ठाकरेंनी सर्वच गमावले, अशी टीकाही शिंदे यांनी केली. सावरकरांवर टीका करणाऱ्यांच्या शेजारी बसता. बाळासाहेब असते, तर उलटे टांगून धुरी दिली असती, असा घणाघातही एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर केला.

शिवसेना शिंदे गटाचा दसरा मेळावा गोरेगावातील नेस्को सेंटरमध्ये पार पडला. यावेळी एकनाथ शिंदे यांनी पूरग्रस्तांच्या मदतीपासून हिंदुत्वाच्या मुद्द्यांपर्यंत आणि काँग्रेसशी केलेल्या युतीपर्यंत अनेक आघाड्यांवर उद्धव ठाकरेंवर जोरदार हल्लाबोल चढवला. "आम्ही आधी मदतीचे ट्रक पाठवले, नंतर मी गेलो; पण काही लोक फक्त फोटो काढायला आणि नौटंकी करायला गेले," असा टोला लगावत शिंदेंनी उद्धव ठाकरेंना कठोर शब्दांत सुनावले.

पूरग्रस्तभागात शिंदेंच्या शिवसेनेकडून मदत देण्यात आली होती. मात्र, त्यावर फोटो असल्यामुळे ठाकरे गटाकडून शिंदेंवर जोरदार टीका झाली. या टीकेला एकनाथ शिंदे आज दसरा मेळाव्या जोरदार प्रत्युत्तर दिले. विरोधकांना फोटो दिसतात, पण त्यातील सामान दिसत नाही. पूरग्रस्तांना २६ प्रकारच्या जीवनावश्यक वस्तू दिल्यात. तुम्ही एक बिस्किटचा पुडा तरी घेऊन गेलात का? तेवढा तरी न्यायचा असता. तेवढी तरी दानत दाखवायची होती.

तुमचे फोटो पण लावून आमचे कार्यकर्ते आपत्तीच्यावेळी मदत करत होते ना? तेव्हा बरं वाटत होते. कार्यकर्ते लावतात फोटो. पण फोटोग्राफरला फोटोशिवाय काय दिसणार? असा टोला शिंदे यांनी उद्धव ठाकरेंना लगावला. काही लोक फक्त जाऊन नौटंकी करून आले. पण आम्ही जायच्या आधी मदतीचे ट्रक गेले. आधी मदत गेली, नंतर एकनाथ शिंदे गेली, असे ते म्हणाले.

पीएम केअर फंडातून पूरग्रस्तांसाठी निधी द्यावी, अशी मागणी उद्धव ठाकरे यांनी केली होती. यावरून एकनाथ शिंदे हल्लाबोल केला.

एकनाथ शिंदे म्हणाले, पीएम केअर फंडातून पैसे द्या म्हणत आहेत, पण तो फंड कोविडमध्ये होता, एवढे कळत नाही का? तुम्ही कोविडमध्ये सहाशे कोटी जमा केले, एक पैसा तरी खर्च केला का? तुम्हाला पंतप्रधानांवर आरोप करण्याचा अधिकार आहे का? असा सवाल एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना केला. एकनाथ शिंदे म्हणाले, राहुल गांधी सावरकरांवर मुद्दामहून टीका करतात, हे त्यांच्या मांडीला मांडी लावून बसतात आणि आम्ही हिंदुत्व असल्याचे सांगतात. हे तुमचे बेगडी हिंदुत्व आहे.

# शिंदेंच्या मेळाव्यात भाडोत्री गर्दी

## शिंदे गटावर सुषमा अंधारेंचा घणाघात



■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ३ :

शिवसेनेच्या दोन्ही गटांचे दसरा मेळावे पार पडल्यानंतर आता आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडू लागल्या आहेत. ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी ''वर एक पोस्ट करत शिंदे गटाच्या मेळाव्यातील गर्दी 'भाडोत्री' होती आणि मुख्यमंत्री शिंदेंचे भाषण सुरू होताच लोकांनी काढता पाय घेतल्याने त्यांना गेट बंद करून कोंडण्याचा प्रयत्न झाला, असा गंभीर आरोप केला आहे.

आपल्या पोस्टमध्ये सुषमा अंधारे यांनी दोन्ही मेळाव्यांची तुलना केली आहे. त्या म्हणतात, काल एकीकडे शिवतीर्थावर उद्धव साहेबांचे भाषण ऐकण्यासाठी कोसळत्या पावसात तसूभरही न हलता निष्ठावंत जीवाचा कान करून भाषण ऐकत होते. तर दुसरीकडे गद्दारांच्या इव्हेंटला जमवलेली भाडोत्री गर्दी मात्र शिंदे यांचे भाषण सुरू झाल्यावर काढता पाय घेत होती.

ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी वर पोस्ट करत म्हटलंय की, काल एकीकडे शिवतीर्थावर उद्धव साहेबांचे भाषण ऐकण्यासाठी कोसळत्या पावसात तसू भरही न हलता निष्ठावंत जीवाचा कान करून भाषण ऐकत होते. तर दुसरीकडे गद्दारांच्या इव्हेंटला जमवलेली भाडोत्री गर्दी मात्र शिंदेंचे भाषण सुरू झाल्यावर काढता पाया घेत होती.गर्दीने जबरदस्ती भाषण ऐकावं म्हणून नेस्को चे गेट बंद करून कोंडण्याचे त्यांना प्रयत्न झाले.

# ऊठसूट एकनाथ शिंदेंवर टीका खपवून घेणार नाही : उदय सामंत



■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ३ :

महाराष्ट्रात सध्या आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकारण पेटले आहे. त्यात ठाण्यातील राजकीय संघर्ष चांगलाच रंगात आला असल्याचे दिसत आहे. वन मंत्री गणेश नाईक आणि शिवसेना शिंदे गटातील नेत्यांमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आल्याचे दिसून येत आहे. एका कार्यक्रमात बोलताना गणेश नाईक यांनी खासदार श्रीकांत शिंदे यांच्यावर नाव न घेता खोचक टीका केली आहे. त्यावर शिंदे गटाचे नेते व उद्योग मंत्री उदय सामंत यांनी देखील पलटवार केला आहे.

एका कार्यक्रमात बोलताना मंत्री गणेश नाईक म्हणाले की, तुम्ही भविष्याचा विचार करणार की नाही. नवीन एफएसआय लागू झाला तर या शहराची वाट लागेल. आज नवीन मुंबईत काही ठिकाणीच पाणी साचते, तुंबापूरी होत नाही. कारण आपण या शहरांच्या नाल्याची रचना तशी केली आहे. पण जर नालायक लोकांच्या हातात नवी मुंबई महानगरपालिका सत्ता गेली तर या शहराचा वाटोळे झाले म्हणायचे. आपण जबाबदारीने हे विधान करत असल्याचेही नाईक यांनी स्पष्ट केले.

पुढे बोलताना गणेश नाईक यांनी शिंदेंना टोला लगावताना म्हणाले, आपल्या मनात कोणाविषयी द्वेष नाही. गणेश नाईक सुखी आहे. जो पैसा माझी झोप उडवेल तो पैसा मला नको आहे. आयटीचे लोक येतील, लुटारू येतील, सीबीआय येईल. सुखाची झोप मिळते, मग असा पैसा काय कामाचा, माझा हात साफ आहे आणि मन पण साफ आहे, असा टोला गणेश नाईक यांनी शिंदेंना लगावला होता. यावर मंत्री उदय सामंत यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

मंत्री उदय सामंत यांनी गणेश नाईक यांच्या टीकेला उत्तर देताना म्हणाले, नालायकांच्या हाती सत्ता देऊ नये, म्हणजेच त्याच्या हाती सत्ता दिली जाणार नाही. समन्वय समितीत ही संवाद साधण्यासाठी आहे. ऊठसूट एकनाथ शिंदेंवर टीका खपवून घेणार नाही, नाईकांना काही अडचणी असतील तर त्यांनी एकनाथ शिंदे यांची वेळ घ्यावी.

# ओला दुष्काळ जाहीर करेपर्यंत निवडणुका घेऊ देणार नाही : मनोज जरांगे

■ महासागर प्रतिनिधी, बीड, दि. ३ :

मराठ्यांनी यापुढे शासक आणि प्रशासक बनायचे आहे. हा एक शब्द आज दसरा मेळाव्याच्या निमित्ताने मी तुम्हाला सांगत आहे. मराठ्यांनी डोके लावून आणि हुशारीने शासक आणि प्रशासक बनायचे. शासक बनलात तर कोणाला मागायची गरज पडणार नाही.

शेतात काम करता करता, घरात काम करता करता, व्यवसाय करता करता, शेतीचे काम करताना, नोकऱ्या करताना, आपल्याला शासक आणि प्रशासक बनायचे, हे लक्षात राहू द्या, असे आवाहन देखील मनोज जरांगे पाटील यांनी केले आहे. नारायण गडावर आयोजित दसरा मेळाव्यात मार्गदर्शन करताना ते बोलत होते.



मराठा समाजावरील असलेला दारिद्र्याचे गंज काढायचा असेल तर तुम्हाला शासक बनावेच लागणार आहे. कोणी डोक्यावर हात फिरवला, कोणी हातात हात दिला, कोणी चहा पाजला, म्हणून आपण मोठे होणार नाही. या दसऱ्याच्या निमित्ताने सांगतो की, जातीला सांभाळायचे असेल जातीच्या अडचणी दूर करायच्या असेल, तर शासक बनावेच लागेल. प्रशासनामध्ये प्रचंड ताकद आहे. कितीही मोठा दादा जरी असला, तरी हात जोडून प्रशासकासमोर उभे राहावेच लागते. दादाला देखील हात जोडून प्रशासनासमोर उभे राहावे लागत. राजकीय नेता असला, कितीही मोठा गुंड असला तरी प्रशासनापुढे हात जोडून उभे राहावे लागत असल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. बीड जिल्ह्यातील नारायणगड येथे मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे यांनी आयोजित केलेल्या दसरा मेळाव्याला हजारोंच्या संख्येने मराठा बांधवांनी हजेरी लावली. प्रकृती बरी नसतानाही जरांगे यांनी खुर्चीवर बसून समाजाला संबोधित केलं. या वेळी त्यांनी मराठा समाजाला दोन महत्त्वाचे कानमंत्र दिले. मराठा समाजाने शासक आणि प्रशासक बनले पाहिजे. आपण प्रशासनात असलो तर भल्याभल्यांना आल्यासमोर झुकावे लागेल, असा ठाम संदेश त्यांनी दिला. भाषणादरम्यान मराठा आरक्षणाच्या लढ्याबाबत बोलताना जरांगे यांच्या डोळ्यांत अश्रू तरळले.

# महावितरण मुख्यालयात महिला कर्मचाऱ्यांचा संचालक राजेंद्र पवार यांच्या हस्ते गौरव

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :

वीजसेवेसारख्या धकाधकीच्या, जोखमीच्या तांत्रिक क्षेत्रामध्ये महावितरणमध्ये कार्यरत महिला अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी योगदान व क्षमता सिद्ध केली आहे. ही महिला शक्ती खऱ्या अर्थाने आदिशक्तीचे रूप आहे, असे गौरवोद्गार महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी काढले. नवरात्र उत्सवानिमित्त महावितरणच्या प्रकाशगड मुख्यालयामध्ये कार्यरत महिला अभियंते, अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सन्मानार्थ 'सन्मान सौदामिनींचा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संचालक पवार बोलत होते. व्यासपीठावर कार्यकारी संचालक अपर्णा गिते (सुरक्षा व अंमलबजावणी) व स्वाती व्यवहारे (वित्त) यांची उपस्थिती होती.



महावितरणच्या मुंबई येथील मुख्यालयात नवरात्र उत्सवानिमित्त सन्मान सौदामिनींचा या कार्यक्रमात महिला अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी संचालक राजेंद्र पवार, कार्यकारी संचालक स्वाती व्यवहारे, अपर्णा गिते यांची उपस्थिती होती.

महावितरणच्या मुंबई येथील मुख्यालयात नवरात्र उत्सवानिमित्त सन्मान सौदामिनींचा या कार्यक्रमात महिला अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी संचालक राजेंद्र पवार, कार्यकारी संचालक स्वाती व्यवहारे, अपर्णा गिते यांची उपस्थिती होती.

संचालक पवार म्हणाले, एकेकाळी पुरुषांचे क्षेत्र समजल्या जाणाऱ्या वीजक्षेत्रात स्वकर्तृत्वाने भरारी घेणाऱ्या महिला शक्तीचे अस्तित्व खऱ्या अर्थाने प्रकाशमान झाले आहे. महिला अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अत्यंत प्रभावीपणे व आत्मविश्वासाने महावितरणच्या प्रगतीला हातभार लावला आहे. या महिला शक्तीच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी नवरात्रानिमित्त राज्यभरात सन्मान सौदामिनींचा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचे पवार यांनी सांगितले.

कार्यकारी संचालक (वित्त) स्वाती व्यवहारे यांनी सन्मान सौदामिनींच्या आयोजनाचे स्वागत केले. महिलांनी स्वतःसाठी वेळ काढून तब्येतीची जाणीवपूर्वक काळजी घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

# पुण्यात संघाच्या संचलनादरम्यान नियमन करणाऱ्याला मारहाण

■ महासागर प्रतिनिधी पुणे, दि. ३ :

विजया दशमी निमित्ताने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संचलन पुण्यातील विविध भागात आयोजित करण्यात आले होते. घोरपडे पेठ येथील मोमीनपुरा मध्ये चाँदतारा चौकात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संचलनासाठी बाहतूक नियम करणाऱ्या एकाला त्याची गाडी काढत असताना, एक लहान मुलगा सायकल घेऊन अडथळा निर्माण करत होता. त्यास तक्रारदार याने हटकल्याचे कारणावरुन चाँदतारा चौकातील ख्वाजा शेख व त्याच्या सहकाऱ्यांनी तक्रारदार यास मारहाण केली. तसेच त्याच्या काकूचे अंगाशी झटापट करुन छेडछाड केल्याच प्रकार घडला.

याबाबत संचलन संपल्यानंतर तक्रारदार याचा मोठा भाऊ संघाचे लोकांसह काय प्रकार झाला याबाबत पाहणी करण्यासाठी गेले असता, टोळक्याने दहाजणांना मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार घडला. त्यामुळे याप्रकरणी खडक पोलिस ठाण्यात संघाचे समर्थक मोठया प्रमाणात जमून त्यांनी पोलिसांकडे तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी आरोपींवर गुन्हा दाखल केला आहे.

वैभव सोमनाथ वाघमारे (वय-21,रा. घोरपडे पेठ,पुणे) असे तक्रारदार याचे नाव आहे. याप्रकरणी आरोपी ख्वाजा शेख व त्याचे इतर 15 ते 20 अनोळखी साथीदार यांचेवर भान्यास 115 (2), 118, (1), 189 (2), 190, 191 (3), 74, 79 प्रमाणे व महाराष्ट्र पोलिस अधिनियम 1951 चे कलम 37 (1) (3)सह सुधारित अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनयम 2015 मधील कलम 3 (1) (आर), 3 (1)(एस), 3 (2) नुसार गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार हे मोमीनपुरा येथे चाँदतारा चौकात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संचलनातील लोकांसह सावित्रीबाई फुले स्मारक येथून निघून ठरले मार्गाप्रमाणे चाँदतारा चौकातून पुन्हा मुळ ठिकाणी जाणार होते. त्याच दरम्यान तक्रारदार हे बाहतुकीचे नियम करत असताना, संघाचे संचलन हे चाँदतारा चौक येथून पुढे गेले. त्याचे मागे जाण्यासाठी तक्रारदार त्यांची अॅक्टीवा गाडी काढत होते. त्यावेळी एक लहान मुलगा सायकल घेऊन त्यांना अडथळा करत होता. चाँदतारा चौक येथील आरोपी व त्याचे साथीदार यांनी हाताने मारहाण केली. तसेच तक्रारदार यांचे काकू हिचे अंगाशी झटापट व छेडछाड केली. तक्रारदार व तिच्या काकु, चुलत भाऊ यांना देखील त्यांचे जातीवरुन अपमानीत करुन जातीवाचक शिवीगाळ करण्यात आली आहे.

## १२ वर्षीय चिमुकल्याचा लिफ्टमध्ये गुदमरून मृत्यु

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ३ :

पिंपरी चिंचवड शहरात राम स्मृती सोसायटी येथील एका इमारतीच्या तिसऱ्या आणि चौथ्या मजल्यावर लिफ्ट अडकून बसल्याचा प्रकार घडला. या लिफ्ट मध्ये एक 12 वषार्चा मुलगा अडकून पडला व लिफ्टचा दरवाजा वेळेत उघडता न आल्याने गुदमरुन त्याचा दुर्देवी मृत्यु झाल्याचा प्रकार घडला आहे. या घटनेमुळे संबंधित मृत मुलाच्या कुटुंबावर दुखाःचा डोंगर कोसळला आहे.

पिंपरी चिंचवड मध्ये चौबीसवाडी परिसत असून त्याठिकाणी राम स्मृती सोसायटी इमारत आहे. या इमारतीत 12 वर्षीय मुलगा आपल्या कुटुंबासोबत रहाण्यास आहे. दसऱ्याच्या दिवशी सायंकाळी तो लिफ्ट मधून जात असताना, अचानक लिफ्ट ही तिसऱ्या व चौथ्या मजल्याचे दरम्यान अडकून पडली. त्यामुळे त्याने आरडाओरड केल्यावर स्थानिकांनी लिफ्ट उघडण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांना ते जमले नाही. अग्नीशामक दलाचे जवान तात्काळ घटनास्थळी दाखल झाले असता, त्यांनी आपल्या कौशल्याचा वापर करुन लिफ्टचा दरवाजा उघडला.

## झोमॅटो कर्मचाऱ्याला मारहाण

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ३ :

विविध हॉटेल मधून पार्सल घेऊन ती वेगवेगळ्या ठिकाणी पोहच करणाऱ्या झोमॅटो डिलीव्हरी कर्मचाऱ्यास दिलेली ऑर्डर रद्द करुन पुन्हा त्याच ऑर्डरचे पार्सल द्यावे अशी मागणी करत बेदम मारहाण करुन लुटमार करण्यात आल्याचा प्रकार सोलापूर-पुणे रस्त्यावर लोणीकाळभोर भागात कदमवाक वस्ती याठिकाणी घडला आहे.

# पुणे जिल्हा परिषदेची जालिंदरनगर शाळा जागतिक क्रमवारीत प्रथम

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :

भारतीय शाळा जगात सर्वोत्कृष्ट ठरणे हे जागतिक पातळीवर भारतीय शिक्षण पद्धतीला जगमान्यता मिळण्यासारखे आहे. पुणे जिल्हा परिषदेच्या शाळेचे जगात सर्वोत्कृष्ट ठरणे हा क्षण देश आणि राज्याच्या शासकीय शिक्षण व्यवस्थेसाठी कलाटणी देणारा क्षण आहे, असे गौरवोद्गार शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी काढले.

पुणे जिल्ह्याच्या खेड तालुक्यातील जालिंदरनगर येथील जिल्हा परिषद शाळा, एज्युकेशन या इंग्लंड येथे मुख्यालय असणाऱ्या जागतिक संस्थेने आयोजित केलेल्या वर्ल्ड बेस्ट स्कूल कॉम्पिटिशन स्पर्धेमध्ये जगभरातील समुदायाने पसंती क्रमानुसार केलेल्या मतदानानुसार सर्वाधिक मते मिळवून कम्युनिटी चॉइस वॉर्ड या मानाच्या विभागात सर्वोत्कृष्ट ठरली. लोकसहभागातून विकसित जिल्हा परिषदेची ही शाळा आहे. या शाळेला एक कोटी रुपयांचा पुरस्कार मिळाला आहे. या पार्श्वभूमीवर मंत्री दादाजी भुसे यांनी आज मालेगाव येथे पत्रकारांशी संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते.

मंत्री दादाजी भुसे यांनी या शाळेतील शिक्षक दत्तात्रय वारे यांच्यासह मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, व्यवस्थापन समिती, विद्यार्थी व ग्रामस्थांना शुभेच्छा देत अभिनंदन केले.



ते म्हणाले, आपण केवळ एका शाळेला जिंकवण्यासाठी प्रयत्न केला नसून संपूर्ण शासकीय शाळा व भारतीय शिक्षण पद्धतीला जगमान्य व सक्षम करण्याचे काम केले आहे. आपल्याला समाजाचे आणि देशाचे गतवैभव परत आणायचे असेल, तर भारतातील एका शासकीय शाळेचे जगात सर्वोत्कृष्ट होण्यासाठी हे घडणे गरजेचे होते. त्यासाठी आपण सर्वांनी आपले कर्तव्य समजून या चळवळीचे नेतृत्व केले व एका भारतीय व शासकीय शाळेला जगात सर्वोत्तम बनवले.

विद्यार्थ्यांना आनंददायी व गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या जालिंदरनगर शाळेचे उपक्रम शिक्षण विभागाच्या माध्यमातून

### शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांची माहिती

संपूर्ण राज्यात राबविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, जालिंदरनगर शाळा ही एकमेव भारतीय व जिल्हा परिषदेची शासकीय शाळा असून लोकसहभागातून विकास करत शाळेने अव्वल स्थान मिळविले आहे. प्रगत देशातील व खासगी क्षेत्रातील लाखो शाळांना मागे सोडून सरकारी शाळा इथपर्यंत पोहोचलेली आहे. शासकीय शाळांची क्षमता सिद्ध करणारा आणि सर्वांचा आत्मविश्वास वाढवणारा हा निकाल आहे.

शासकीय शाळेबाबत समाजाच्या मनातील नेहमीच्या सवयीने असलेली दुय्यम दर्जाची मानसिकता व न्यूनगंड नष्ट होऊन सर्वत्र सकारात्मक व विधायक विचार प्रवाह निर्माण होईल. या शाळेच्या यशाने शासकीय शिक्षण व्यवस्थेतील घटकांना आत्मविश्वास मिळेल. शासकीय शाळासुद्धा जागतिक पातळीवर प्रगत देशांच्या आणि खासगी शाळांच्या तोडीस तोड कामगिरी करीत आहेत व जागतिक स्पर्धेत सरस ठरत आहेत. येत्या 15 व 16 नोव्हेंबर रोजी अबुधाबी येथे या शाळेस एक कोटी रुपयांचा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार असल्याचेही मंत्री दादाजी भुसे यांनी यावेळी सांगितले.

# उद्धव ठाकरेंना कोकणात मोठे खिंडार

## सिंधुदुर्गातील नेते राजन तेली शिंदेंच्या शिवसेनेत दाखल

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :

सिंधुदुर्गातील ठाकरेंचे मोठे नेते आणि माजी आमदार राजन तेली यांनी दसऱ्याच्या दिवशीच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटात प्रवेश केला आहे. गोरेगाव येथील नेस्को मैदानावर झालेल्या शिंदे गटाच्या दसरा मेळाव्यात पक्षप्रवेश पार पडला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर झालेला हा पक्षप्रवेश उद्धव ठाकरेंसाठी मोठा धक्का मानला जात आहे.



कोकण हा शिवसेनेचा बालेकिल्ला मानला जातो. या बालेकिल्ल्यात गेल्या काही दिवसांत ठाकरे गटाला सलग धक्के बसत आहेत. अनेक स्थानिक नेत्यांनी ठाकरेंची साथ सोडून शिंदे यांच्या गटात प्रवेश केला आहे. आता राजन तेली यांनी देखील धनुष्यबाण हाती धरला आहे. नारायण राणेंचे खंदे समर्थक ते कट्टर विरोधक असा राजन तेलींचा राजकीय प्रवास राहिला आहे.

नारायण राणे यांचे एकेकाळचे समर्थक असलेल्या तेली यांनी 2024 च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी भाजपमधून उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला होता.

पक्षप्रवेशानंतर उद्धव ठाकरे यांनी राजन तेली यांना सावंतवाडी विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली होती. मात्र त्यांना शिवसेनेचे दीपक केसरकर यांच्याकडून पराभव स्वीकारावा होता. त्यानंतर ते उद्धव ठाकरे गटाचे सक्रिय नेते म्हणून कार्यरत राहिले. मात्र अखेर दसऱ्याच्याच मेळाव्याच्या दिवशी त्यांनी एकनाथ शिंदेंचे नेतृत्व स्वीकारले.

शिवसेनेतून राजकारणाचा श्रीगणेशा करणाऱ्या राजन तेली यांनी नारायण राणे यांच्यासोबत शिवसेना सोडली. मग ते काँग्रेसमध्ये गेले. नारायण राणे यांचे खंदे समर्थक ते कट्टर विरोधक असा तेली यांचा प्रवास राहिला आहे. काँग्रेसमधून ते भाजपमध्ये गेले. गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये त्यांनी भाजपला सोडचिठ्ठी दिली. मग ते ठाकरेंच्या शिवसेनेत गेले आणि आता ते शिंदे गटात दाखल झाले आहेत.

# ७२१ भूमीहिनांना घरकुलांसाठी हक्काची जागा



■ महासागर प्रतिनिधी

**बुलडाणा, दि. ३ :** महसूल विभागामार्फत जिल्ह्यात सेवा पंधरवडा राबवण्यात आला. या सेवा पंधरवड्यात 'सर्वांसाठी घरे' या उपक्रमांतर्गत जिल्हा प्रशासनाकडून जिल्ह्यातील एकूण २७२१ भूमिहीन घरकुल लाभार्थींना एकूण १६.३४ हेक्टर जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या उपक्रमामुळे जिल्ह्यातील भूमिहीन लाभार्थींना घरकुलांसाठी हक्काची जागा मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे, अशी माहिती उपजिल्हाधिकारी (महसूल) समाधान गायकवाड यांनी दिली आहे. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही विशेष मोहीम सुरू आहे. या मोहिमेचा उद्देश महसूल व वन विभाग तसेच इतर संबंधित विभागांमध्ये प्रशासन अधिक लोकाभिमुख, गतिमान आणि पारदर्शक करणे आहे. या उपक्रमात ङ्गसर्वांसाठी घरे २०२५ङ्ग योजनेखाली भूमिहीन घरकूल लाभार्थींना शासन निर्णयानुसार शासकीय जमिनींचे हस्तांतरण जिल्हा प्रशासनाकडून संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना करण्यात आले आहे. शासकीय जागेवर सन २०११ पूर्वीपासून रहिवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण असलेल्या कुटुंबापैकी अतिक्रमण नियमानुकूल करण्यास पात्र असलेल्या कुटुंबांना जागा उपलब्ध करण्यात आली आहे. सेवा पंधरवडा 'सर्वांसाठी घरे' या उपक्रमाअंतर्गत बुलडाणा जिल्ह्यातील सर्व तालुक्यात भूमिहीन घरकुल लाभार्थी यांना उपरोक्त प्रमाणे जिल्हा महसूल प्रशासनाने जागा उपलब्ध करून दिली आहे. या उपक्रमामुळे भूमिहीन घरकुल लाभार्थींना दिलासा मिळाला आहे. चिखली तालुक्यातील ४०४ भूमिहीन घरकूल लाभार्थींना ३.०९ हेक्टर, देऊळगावराजा तालुक्यातील १४५ लाभार्थींना ०.७५ हेक्टर, जळगाव जामोद तालुक्यातील १४२ लाभार्थींना २.८४ हेक्टर, खामगाव तालुक्यातील २६२ लाभार्थींना १.२१हेक्टर, लोणार तालुक्यातील १५४ लाभार्थींना ०.७२ हेक्टर, मलकापूर तालुक्यातील ७०६ लाभार्थींना ३.२७ हेक्टर, मेहकर तालुक्यातील ७४ लाभार्थींना ०.३५ हेक्टर, मोताळा तालुक्यातील ३०२ लाभार्थींना ०.८५ हेक्टर, नांदुरा तालुक्यातील २६२लाभार्थ्यांना १.५९ हेक्टर, संग्रामपूर तालुक्यातील १३६ लाभार्थींना ८.८७ हेक्टर, शेगाव तालुक्यातील २९ लाभार्थींना ०.३ हेक्टर, तर सिंदखेड राजा तालुक्यातील १०५ लाभार्थींना ०.५ हेक्टर अशा एकूण २७२१ भूमिहीन घरकुल लाभार्थींना १६.३४ हेक्टर जागा उपलब्ध करण्यात आली आहे.

## ग्राम विकासावर जिल्हाधिकाऱ्यांचा संवाद

**यवतमाळ :** जिल्हाधिकारी विकास मीना यांनी छत्रपती शिवाजी महाराज महा राजस्व अभियानांतर्गत सेवा पंधरवडा निमित्त तालुक्यातील पाचपोहर या गावास भेट दिली आणि अभियान अंतर्गत घेण्यात आलेल्या शिबिरामध्ये तेथील ग्रामस्थांशी वेगवेगळ्याशासकीय योजनावदाखल्यांचा लाभ -वाटपकरण्यात आले आणि नागरिकांसह विविध वि षयांबाबत चर्चा केली. त्यामध्ये प्रामुख्याने जिल्हाधिकाऱ्यांनी आदी-कर्मयोगी अभियान अंतर्गत आदी-सेवा केंद्र यांचे उद्घाटन केले. या केंद्राव्दारे वेगवेगळ्या विभागांच्या योजनांचा लाभ आदिवासी ग्रामस्थांना होणार आहे. तसेच सेवा पंधरवडाचे उद्दिष्ट ग्रामस्थांना समजावून सांगितले व उपस्थित अधिकारी वर्ग यांना सूचनाही दिल्या. यामध्ये पीएम-धरती आबा व आदि कर्मयोगी अभियान, सशक्त ग्रामपंचायत अभियान, मुख्यमंत्री समृद्ध ग्रामपंचायत अभियान, छत्रपती शिवाजी महाराज महा: राजस्व अभियान, मिशन उभारी , महिला बचत गट (उमेद) आदींविषयी जिल्हाधिकारी यांनी ग्रामस्थांशी चर्चा केली.

## भावंडांचा पाण्यात बुडून मृत्यू



**दारव्हा :** तालुक्यातील महागाव कसबा येथील साईनगरी ले-आऊटमध्ये पाण्याने भरलेल्या गड्डयांमध्ये भाऊ-बहिणीचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना बुधवारी दि. १ ऑक्टोबर रोजी सकाळी उघडकीस आली असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. प्रियांका गणेश राठोड (वय १०) वर्ष आणि कार्तिक गणेश राठोड (वय ८) वर्ष अशी मृतक बहिण-भावाचे नाव आहे. दारव्हा-आर्णी रोडला लागून असलेल्या साईनगरी या ले-आऊटमध्येअंदाजे दहा फूट खोल खड्डे खोदण्यात आले होते. या गड्डयांमध्ये पाणी साचल्याने मुले पोहण्यासाठी गेली होती. मात्र पोहता न आल्याने ती बुडाली. त्यानंतर त्याचा जागीच मृत्यू झाला. रात्री उशिरापर्यंत मुले घरी परतली नसल्याने पालकांनी शोधाशोध सुरु केली. मात्र त्यांचा पत्ता लागला नाही. अखेर दुसऱ्या दिवशी सकाळी ११ वाजताच्या सुमारास या दुर्दैवी घटनेची माहिती मिळताच नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून, ग्रामस्थांनी प्रशासनाकडे अशा धोकादायक गड्डयांवर त्वरित सुरक्षा उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

## दूषित पाण्याने दोन किडनीग्रस्त रुग्णांचा मृत्यू





**महागाव :** ग्राम पंचायतच्या वतीने करण्यात येणाऱ्या दुषित पाणी पुरवठ्यामुळे वागद इजारा गावात किडनी आजाराने ग्रस्त रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून दोन दिवसापूर्वी यापैकी दोन रुग्णांचा एकाच दिवशी मृत्यू झाल्याने संपुर्ण गावावर शोककळा पसरली असून प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे या नागरिकांना आपला जीव गमवावा लागला असा आरोप गावकरी करीत आहेत. सुरेश तुकाराम राठोड (वय ५०) वर्ष आणि सुरेखा अर्जुन चव्हाण (वय ४५) वर्ष अशी त्या दोघांची नावे आहेत. महागाव तालुक्यातील वागद (ईजारा) येथे गावकऱ्यांना दुषित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केल्या जात असून याबाबत गावकऱ्यांनी पाणी तपासण्याची मागणी केल्यानंतर प्रयोगशाळेत पाणी नमुने तपासण्यात आले. त्यामध्ये गावातील पाणी पिण्याच्या योग्य नसून त्यामध्ये टीडीएस १२०० च्यावर असून याबर उपाय योजना करण्याची मागणी करण्यात आली. परंतु ग्राम पंचायत प्रशासनाने लाखो रुपयांचा निधी खर्च करून आर-ओ प्लांट बसवून घेतले. परंतु त्यावरील फिल्टर हटवल्याने हा प्लांट शोभेची वस्तू बनला आहे. अशातच या रुग्णांपैकी सुरेश राठोड आणि सुरेखा चव्हाण या सात वर्षांपासून आजाराशी लढा देत होत्या. परंतु या दोघांचीही प्राण ज्योत मालवली.

## रिसोडमध्ये स्वच्छता रॅली उत्साहात



**रिसोड :** ममता आणि मधुसूदन अग्रवाल फाउंडेशन तसेच रिसोड नगर परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ङ्गस्वच्छ शहर - सुंदर शहरङ्ग संकल्पनेतून बुधवार, १ ऑक्टोबर रोजी रिसोड शहरात स्वच्छता रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीचे प्रमुख आकर्षण प्रसिद्ध हिंदी चित्रपट अभिनेता जितू वर्मा होते. त्यांनी घोड्यावर स्वार होऊन नागरिकांना स्वच्छतेचा संदेश दिला. नगर परिषद कार्यालयातून सुरुवात झालेली ही रॅली शहरातील प्रमुख मार्गांवरून फिरली. डॉक्टर आंबेडकर चौक, सराफा लाईन, चांदणी चौक, अष्टभुजा देवी चौक, जामा मस्जिद चौक अशा विविध भागांतून फिरत छत्रपती शिवाजी महाराज चौकात रॅलीचा समारोप झाला. विद्यार्थ्यांनी हातात फलक, बॅनर व घोष वाक्यांच्या माध्यमातून ङ्गस्वच्छ शहर -आपली जबाबदारीङ्ग हा संदेश दिला. रॅलीत नगरसेवक, शिक्षक, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते, व्यापारी, वारकरी दिंडी तसेच अप्पा स्वामी व्यायाम मंडळाच्या मुलींनी सहभाग घेतला.

# निकृष्ट कामामुळे मार्गावर अपघाताची श्रृंखला
## खड्डयांचे साम्राज्य वाढले, महिलेचा बळी





■ महासागर प्रतिनिधी

**दिग्रस , दि. ३ :** दिग्रस-दारव्हा रस्त्याचे काम संथगतीने सुरू असलेले काम संबंधित ठेकेदाराने पूर्ण केले. अनियमितता व अतिशय निकृष्ट दर्जाचे काम झाले. ६ किलोमीटर अंतरावर असलेल्या मांडवा गावापूर्वी खताचा कारखाना आहे. या कारखान्यासमोरील रस्त्याला मोठ्या तड्या पडल्या आहेत. यात दुचाकीचे चाक अडकून अपघातात जीव गेल्याची घटना प्रकाशित होताच संबंधित ठेकेदाराने डागडुजी केली. मागील ९ वर्षापेक्षा जास्त काळापासून डागडुजी करुनच काम सुरु असल्याने या मार्गावर अपघाताची श्रृंखला निर्माण झाली आहे. या मार्गाचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाले आहे. काही महिन्यातच भेगा पडल्या आहे तर कुठे रस्त्याच्या मधोमध दोन भागामध्ये मोठी दरी निर्माण झाली आहे. वाशीम जिल्ह्यातील रहिवासी रत्नप्रभा शंकरलाल जयस्वाल भाच्यासह दुचाकीने जात असताना मांडवा गावाजवळ खड्डयातील झटक्यामुळे खाली पडल्या. त्यांच्या डोक्याला गंभीर इजा झाल्याने त्यांचा जागीच मृत्यु झाला. या रस्त्यावरील अपघातात अनेकांचा बळी गेला आहे. आणखी किती बळी जाणार असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे.

राजकीय श्रेयात या रस्त्याचे काम तर झाले नाही ना असा संशय निर्माण केला जात आहे. या रस्त्याच्या कामात कंत्राटदार उत्सुक नव्हते. सुरुवातीला पाटील कॉन्ट्रॅक्सशन कंपनीने काम हाती घेतले. त्यानंतर तीन ठेकेदारांनी या रस्त्याच्या कामाला हात लावून कसातरी रस्ता तयार केला. परंतु, त्यावरही तथाकथित गाव पुढाऱ्यांनी नांगर चालविला. काम चांगले झाले नसते तर त्याला संवैधानिक मार्गाने विरोध करता आला असता. परंतु, ठेकेदारास वेठीस धरून अनेक आडकाठ्या आणल्या गेल्या. पालकमंत्र्यांनी मार्गावर कंत्राटदारांना घेऊन दुचाकीने प्रवास केला. यानंतर हा रस्ता निकृष्ट असून त्वरित चांगल्या दर्जाचे करा, असा आदेशही दिला होता. मात्र आजही परिस्थिती जैसे थे आहे. यानंतर खा. संजय देशमुख यांनी पत्रकार परिषद घेऊन संजय राठोड यांच्या दुचाकी प्रवासाला नौटंकी संबोधले होते. मंत्री या रस्त्याने येत नाही का? त्यांना या रस्त्याची परिस्थिती माहीत नाही का? शासन दरबारी रस्त्याबद्दल पाठपुरावा न करता केवळ नौटंकी करीत असल्याचा आरोपही केला होता. या रस्त्यासाठी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा उद्धव ठाकरे गटाच्या नेत्यांनी दिला होता. त्यांचे आंदोलन अद्यापही झाले नाही. कॉंग्रेस नेते माणिकराव ठाकरे यांनी या रस्त्या संदर्भात कुठलीही भूमिका घेतलेली नाही. त्यामुळे या मार्गाचा कुणीही वालीच नसल्याने जनतेने कोणाकडून अपेक्षा करायच्या असा प्रश्न उपस्थित होत आहे. या मार्गावर ठिकठिकाणी भेगा पडल्यात असून त्याची केवळ डागडुजी करण्यात येत आहे. या रस्त्यावर अनेकांचे बळी गेले, जखमी झाले, कायमच अपंगत्व आले. तरीही या रस्त्याकडे दुर्लक्ष का? हा मोठा संशोधनाचा विषय आहे.

# अनुसूचित जमातीचे आरक्षण लागू करण्यासाठी
## चिखलगाव येथे मेंढ्यासह रास्तारोको




■ महासागर प्रतिनिधी

**बोरगाव मंजू , दि. ३ :** धनगर समाजाच्या अनुसूचित जमाती आरक्षणाच्या मागणीसाठी बुधवारी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. अकोला पश्चिम तालुका सकल धनगर समाजाच्या वतीने हे आंदोलन अकोला ते पातूर महामार्गावरील चिखलगाव येथे करण्यात आले. गत काही दिवसात मराठा कुणबी एकच असल्याचे समजून हैदराबाद गॅझेटनुसार आरक्षण देणार असल्याचे फडणवीस सरकारने शासन निर्णय जारी केला. अशातच आता धनगर समाजाकडूनही आरक्षणाबाबत आक्रमक पवित्रा घेण्यात येत आहे. गत अनेक दिवसांपासून जालना येथे धनगर समाजाचे नेते दिपक बोऱ्हाडे हे आरक्षणाच्या मागणीसाठी आमरण उपोषण सुरू ठेवून ठाम भूमिका घेत आहेत. त्यांच्या या लढ्याला समर्थन देण्यासाठी आणि त्यांच्या आदेशानुसार हे आंदोलन करण्यात आले.

प्रतिनिधी बोरगाव मंजू सकल धनगर समाजाकडून आरक्षणासाठी बुधवारी एल्गार पुकारत बोरगाव मंजूनजीक महामार्गावर ठिय्या आंदोलन करण्यात आले. आरक्षणाच्या अनुषंगाने शासनाने त्वरित अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली. गत काही दिवसांपासून धनगर समाजाचे नेते दीपक बोऱ्हाडे यांच्यासह सकल धनगर समाजाचे वतीने जालना येथे

धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या आरक्षण लागू करण्याची अंमलबजावणी व्हावी, यासाठी उपोषणाला बसलेले आहेत. त्यांना समर्थन करत बोरगाव नजीक राष्ट्रीय महामार्गावर शेकडो सकल धनगर समाज बांधवांनी ठिय्या मांडुन रास्ता रोको आंदोलन केले. यावेळी प्रचंड घोषणा देत शासनाने दखल घ्यावी; अन्यथा भविष्यात उग्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला. आंदोलनस्थळी पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, मूर्तिजापूर पोलिस उपविभागीय अधिकारी वैशाली मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक अनिल गोपाळ, उपनिरीक्षक रवींद्र धुळे, हेडकॉन्स्टेबल सचिन सोनटक्के, किशोर सोळंके , महादेव पातोंड , प्रमोद डोईफोडे यांच्या सह बोरगाव मंजू पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# आदिशक्तीला भक्तांचा श्रद्धेने निरोप



■ महासागर प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ३ :** गेल्या नऊ दिवसांपासून जिल्हाभरात ठिकठिकाणी विराजमान करण्यात आलेल्या आई जगदंबेला निरोप देण्यास बुधवारी दि. १ ऑक्टोबर रोजी सुरूवात झाली. जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणात असलेल्या सार्वजनिक दुर्गोत्सव मंडळांची संख्या पाहता सहा दिवसात टप्पा-टप्प्याने विसर्जनास परवानगी देण्यात आली आहे. संपूर्ण जिल्ह्यात सलग नऊ दिवस माँ आदिशक्तीची आराधना केली जाते. प्रत्येक जन मनोमन देवीची भक्ती करतो. उपवास ठेवून चित्तशुद्धी केली जाते. यंदा जिल्ह्यात ३ हजार ३२६ सार्वजनिक दुर्गोत्सव मंडळांनी माँ दुर्गेच्या मूर्तीची प्रतिष्ठापणा केली होती. त्यात जिल्ह्यात यवतमाळ शहरासह इतर काही शहरातही भव्य-दिव्य देखावे साकारण्यात आले होते. हे देखावे पाहण्यासाठी जिल्ह्यासह राज्यभरातून दुर्गादेवी भक्त यवतमाळातील दुर्गोत्सवात सहभागी झाले होते. विसर्जनासाठी भव्य मिरवणुका काढून ढोल-ताशांच्या गजरात मिरवणुकीचे नियोजन करण्यात आले आहे. त्यात मोठ्या दुर्गोत्सव मंडळांकडून विविध पथकांना पाचारण करण्यात आले आहे. ग्रामीण भागात देखील मोठ्या प्रमाणात मिरवणुका काढत आहेत. काही मंडळाकडून दुर्गादेवीला दसऱ्याचे सोने देऊन नंतर मूर्तीविसर्जन करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील दुर्गा विसर्जन प्रक्रियेसाठी जिल्हा पोलिस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला आहे. त्यामध्ये पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलिस अधिकारी, पोलिस निरीक्षक, सहायक पोलिस निरीक्षक, पोलिस उपनिरीक्षक, २ हजार पोलिस कर्मचारी, १ हजार ५० पुरुष होमगार्ड तर २०० महिला होमगार्ड, एक एसआरपीएफ प्लाटून आदी तैनात केले. जिल्ह्यात नवरात्री उत्सवादरम्यान दुर्गा मातेच्या मूर्ती प्रमाणेच शारदा देवीची स्थापनाही मोठ्या प्रमाणात करण्यात येते. यंदा जिल्ह्यात ७०६ सार्वजनिक शारदोत्सव मंडळांनी शारदा मातेच्या मूर्तींची स्थापना केली होती.


## कार्यालय नगर परिषद वानाडोंगरी
### (जिल्हा नागपूर)

**शुध्दीपत्रक**

वानाडोंगरी नगर परिषदेचे ३ कामांचे निविदा सूचना जावक क्रमांक न.प.वा./वि.वि/२७४३/२०२५ दिनांक:-३०/०९/२०२५ नुसार दिनांक ०२/१०/२०२५ चे वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेली होती. जाहिरातीतील नमूद दिनांक ०९/०२/२०२५ व १०/०२/२०२५ हे ०९/१०/२०२५ व १०/१०/२०२५ याप्रमाणे असे वाचावे.

मुख्याधिकारी
नगरपरिषद वानाडोंगरी

## कार्यालय ग्राम पंचायत गुमथळा

**पंचायत समिती कामठी, जिल्हा परीषद नागपूर,**
**ई-निविदा सुचना क. ०१ सन २०२५-२०२६**
**साहीत्य खरेदी करीता (प्रथम वेळ)**

ग्राम पंचायत **गुमथळा** प.स. **कामठी** जि.प. नागपूर याव्दारे सर्व अधिकृत बांधकाम साहीत्य पुरवठादारास सुचित करण्यात येते कि, सन २०२५-२०२६ मध्ये विविध योजनेचे साहित्य आवश्यकतेनुसार पुरवठा करण्याकरिता ई-निविदा मागवण्यात येत आहे. करिता जिल्हा परिषद वेबसाईटवर http.mahatendars.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

| अ. क्र. | कामाचा तपशील | ई निविदा फी | दर पत्रक विक्रीचा दिनांक | दर पत्रक स्विकृत दिनांक |
|---|---|---|---|---|
| 01 | सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात स्व निधी (सामान्य निधी) तसेच १५ वित्त आयोग, जिल्हा वार्षिक योजना, मा. आमदार व मा. खासदार स्थानीक विकास निधी, शासन योजना २५२५, अनूसुचित जाती व नवबौध्द घटकांचा वस्तीचा विकास करणे योजना व इतर विविध शासन योजना अंतर्गत होणाऱ्या बांधकामा करिता बांधकाम साहीत्य आवश्यकते नुसार पुरवठा करणे. | १०,०००/. (दहा हजार) रू. डी.डी. | दि. ०३/१०/२०२५ स. १०.०० वाज | दि. ०८/१०/२०२५ साय. ०४.०० वाजे |

निविदेतील अटी व शर्ती जिल्हा परिषद नागपूर महाराष्ट्र शासनाच्या http.mahatendars.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.निविदा सादर करण्याची डिजीटल सही अनिवार्य राहील. निविदा शक्यतो व त्याच दिवसी किवा समितीने दिलेल्या दिनांकास उघडण्यात येईल.

सरपंच/सचिव
ग्राम पंचायत गुमथळा

## कार्यालय नगरपरिषद काटोल
### जिल्हा नागपूर

क्रमांक/नपका/पापु/४८०/२०२५ — दिनांक : ०३/१०/२०२५

**निविदा सुचना**

मुख्याधिकारी नगरपरिषद काटोल जिल्हा नागपूर यांचे वतीने नगरपरिषद निधी अंतर्गत खालील प्रमाणे २ कामे करावयाची असल्याने अधिकृत कंत्राटदाराकडुन निविदा मागवीण्यात येत आहे.

कामाचे नांव:- १) नगरपरिषद निधी अंतर्गत नगरपरिषदेच्या जलशुध्दीकरण केंद्राकरीता एस.एस. अ‍ॅन्ड स्टेनलेस बॉडी व्हॅक्यूम टाईप क्लोरोनेट सेट क्षमता तासी १ ते ५ कीलोपर्यंत पुरवठा करणे नग १. २) नगरपरिषदेच्या जलशुध्दीकरण केद्रावरील २० अश्वशक्ती क्षमतेच्या ब्लोअर मोटारीचा पंप साहीत्यास दुरुस्तीकरण्या करीता प्रपत्र बी-१ दोन लीफाफा पध्दतीने अधीकृत कंत्राटदारा मार्फत निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामाची निविदा ही ऑफलाईन पध्दतीने सादर करावयाची आहे. सदर कामाचे कोरे निविदा प्रपत्र दिनांक १३/१०/२०२५ ला दुपारी २.०० वाजेपर्यंत प्राप्त करून घेता येईल व निविदा दिनांक १४/१०/२०२५ ला दुपारी २.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येईल. निविदेचा विस्तृत नमुना नगरपरिषदेच्या बांधकाम विभागात व नगरपरिषदेच्या सुचना फलकावर दिनांक /१०/२०२५ पासुन पहावयास उपलब्ध आहे.

स्वा/-
प्रशासक तथा मुख्याधिकारी
नगरपरिषद काटोल

## ग्रामपंचायत जामठा
### पंचायत समिती नागपूर जि. नागपूर

**जाहीर सूचना**

कार्यालय ग्रामपंचायत जामठा प.स. नागपूर कडून सुचित करण्यात येते कि, खालील मालमत्ता धारकांचे अर्ज फेरफार करण्यासाठी व नवीन कर आकारणी करण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालय जामठा ता. नागपूर अर्ज प्राप्त झालेले आहे.

करिता कोणाचे कर्ज बोजा गहानपत्र अथवा कोणत्याही प्रकारचे आक्षेप उजर असल्यास वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून ७ दिवसाचे आत लेखी स्वरुपात कार्यालयात कार्यालयीन वेळेत सादर करावेत. मुदतीनंतर आलेल्या कोणाचेही आक्षेप स्विकारल्या जाणार नाही व ग्रामपंचायतीकडून आलेल्या अर्जाचा फेरफार करून नाव दर्ज करण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

| अ.क्र. | नवीन मालकाचे नाव | जुन्या मालकाचे गाव | प.ह.नं. | सर्व्हे नं. | प्लॉट नं./ flat no. | क्षेत्रफळ | विक्रीपत्र जोडणे व दस्तावेज क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पियुष यादवराव बडस्कर | मे. संदेश इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | 42 | 156/1k | 21 | 114 sq.m | विक्रीपत्र ७७०५/२०२४ |
| २ | प्रदीप काह्नजी तांडेकर व इतर | मे. संदेश इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | 42 | 167/2,168 | R-36 | 97.757 sq.m | विक्रीपत्र ५८४३/२०१५ |
| ३ | मनोहर चिलु तानकर | मोरेश्वर मारोतराव ढगे | 42 | 50/1 | 4 | 169.943 sq.m | विक्रीपत्र ३४२१/२०१७ |
| ४ | प्रज्योत राजेन्द्र मेघे | लवकुश कारपोरेशन प्रा.लि. | 42 | 83.84/2 | 61 | 135.20 sq.m | विक्रीपत्र ६४२/२०२३ |
| ५ | अविनाश प्रभाकर कुलतामकर | शिप्रा नितीन कैलासबार | 42 | 48 | 24 | 114 sq.m | विक्रीपत्र ४५३१/२००७ |
| ६ | अलका दीपक आक्रेबार व इतर | हर्षलता ओमप्रकाश कारमोरे | 42 | 157/2,158 | r-11 | 99.217 sq.m | विक्रीपत्र १०८८४/२०२५ |
| ७ | करूणा विठ्ठल माकडे | संदीप ओमप्रकाश अग्रवाल | 42 | 65 | 89 | 250.84 sq.m | विक्रीपत्र ५६७९/२०२५ |
| ८ | पार्थ राघवेंद्र स्थापक | मे. अष्टविनायक डेव्हलपर्स | 42 | 96a,96b | 401 | 70.14 sq.m | विक्रीपत्र ५५००/२०१७ |
| ९ | प्रतिमा राघवेंद्र स्थापक | मे. अष्टविनायक हेम्हलपर्स | 42 | 96a,96b | 402 | 76.90 sq.m | विक्रीपत्र ५५०१/२०१७ |
| १० | शैलेश बाळारावजी धनबिज व इतर | मे. वैनगगा रिटेलर्स प्रा.सि | 42 | 181/B | 25 | 147.28 sq.m | विक्रीपत्र ९४२१/२०२० |

स्वा/-
ग्रामपंचायत जामठा

# मतदार केंव्हा जागा होणार?

**मतदार हा केव्हाच राजा नव्हता आणि राहणार पण नाही. याचे कारण आपण प्रतिनिधीक लोकशाहीचा स्विकार केला आहे. जनता आपला प्रतिनिधी निवडून सभागृहात पाठविते. आपले लोकप्रतिनिधी जनतेच्या वतीने सभागृहात प्रतिनिधीत्व करीत असतात. याच कारणाने त्यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. निवडणुकी नंतर मतदारांचे महत्त्व संपते. या सत्याचा स्विकार करावाच लागेल.**

------------------

लोकशाही मार्गाने जनतेला आपल्या मागण्या सरकार दरबारी मांडाव्या लागतात. यात उपोषण, सत्याग्रह, धरणे आंदोलन, बहिष्कार, मूक मोर्चा इ. मार्गाने आपल्या मागण्या शारिरीक, मानसिक यातना सहन करून, वेळप्रसंगी लाठीकाठी खाऊन, गोळ्यांचा मार सहन करून सरकार दरबारी मांडाव्या लागतात. याचा त्रास जनतेलाच सहन करावा लागतो. लोकप्रतिनिधींना नाही.

अपवाद आहेत बोटावर मोजण्या इतकेच! ते तर सन्मानाने लोकांच्या निवेदनाचा स्विकार करून आपला मोठेपणा समाजात मिरवीतात. जनतेने एखादे निवेदन अधिकारी, लोकप्रतिनिधी, मंत्रीगण यांना सादर केल्यानंतर त्याचे पुढे काय होते हे कळण्यास पणं मार्ग नसतो. उपोषणामध्ये कागदोपत्री मागण्या मान्य करून आलेली वेळ मारून नेली जाते. याची सगळ्यांनाच माहिती आहे.

आमदार-खासदार म्हणेल ती पुर्व दिशा असा सर्व कारभार सुरू आहे. याच कारणाने लोकप्रतिनिधींना अवास्तव महत्व प्राप्त झाले आहे. जेंव्हा की लोकशाही प्रक्रियेमध्ये जनतेच्या मतांना, विचारांना अग्रस्थान प्राप्त असले पाहिजे. परंतु असे कुठेही दिसून येत नसल्याने आमदार, खासदार यांची मते ही जनतेवर लादली जातात. यामुळेच निवडणुकीनंतर आमदार- खासदार हे जनतेला आपल्या मुठीत ठेवतात.

आम्ही सांगू तसे वागाल तरच तुमची प्रगती होवू शकते हे पक्ष कार्यकर्त्यांना पटवून देतात. मग ते त्याचे गुलाम बनतात.साहेबांचा शब्द हा त्यांच्यासाठी वंदनीय ठरतो. यासाठी ते आपले प्राण पण द्यायला तयार असतात. ही आजच्या लोकशाही प्रणालीची वास्तविकता दर्शविते आहे.

ग्रामसभा वगळता कुठल्याही शासकीय सभेला जनतेला बोलावले जात नाही.नगर पंचायत, नगर परिषद,महानगर पालिका, पंचायत समिती,जिल्हा परिषद इत्यादींच्या सभेमध्ये जनतेला कुठलेही स्थान दिले जात नाही. जनतेनी निवडून दिलेले प्रतिनिधी मग ते पदाधिकारी होतात. त्यांचेच हाती सर्वकाही कारभार सोपविला जातो. यावर फक्त सीईओ,कलेक्टर व इतर अधिकाऱ्यांचे सही पुरतेच वर्चस्व शिल्लक राहते.

लोकप्रतिनिधी, पदाधिकारी यांच्या संमत्तीने लोकोपयोगी विकास कामें केली जातात. यामध्ये रस्ते, इमारत, पाटबंधारे, बांधकाम इत्यादींचा समावेश असतो. या कामांवर जनतेचे कुठलेही नियंत्रण नसते. कोणत्या फंडातून कोणती विकास कामे केली जातात. त्या कामाचा दर्जा काय असतो. त्या कामाचे सोशल व स्ट्रक्चरल अंकेक्षण कोण करतात? अंकेक्षण कुणाव्दारे केले जाते? याचा थांगपत्ता जनतेला नसतो.

यासंबंधाने कुठलिही माहिती जनतेला दिली जात नाही.काही ठिकाणी कामाचे माहिती फलक लावले जातात. यावरील माहिती ही अपुर्ण असते. निव्वळ उदघाटनाचे फलक लोकप्रतिनिधींच्या छायाचित्रासह रस्त्याशेजारी लावले जातात.

**मिलिंद गड्डमवार**
**सामाजिक कार्यकर्ते, मुक्त पत्रकार**
**राजुरा. 9511215200**

कामाचा दर्जा काय आहे हे जनतेसमोर कधीच मांडले जात नसल्याने उदघाटनाआधी पुल कोसळतात, सिमेंटचे रस्ते फुटतात. छप्पर कोसळतात.रस्ते वाहून जातात.तरीही कुणालाही साधी विचारणा केली जात नाही. कारवाई करणे तर दुरच राहिले. असा सर्व सावळा गोंधळ सुरू आहे. हे सर्व जनतेच्या करा मधून केले जाते. तरीही जनता नामानिराळी असते.

जनतेला विश्वासात न घेता वारेमाप कर्ज घेतल्या जाते. यातून आपल्या पसंतीची कमिशन रूपी कामें केली जातात.यातून लोकप्रतिनिधींची घरे भरली जातात. जनतेच्या डोक्यावर वारेमाप पणे कर्ज करून ठेवले जाते. याला लोकशाही व्यवस्था म्हणावे?

आज तर जनतेची मते खरेदी करण्यासाठी वेगवेगळी शक्कल लढवली जात आहे. मध्य प्रदेश, महाराष्ट्र इ. राज्यांमध्ये लाडली बहना, लाडकी बहीण सारख्या योजना निवडणुकपूर्व लागू करून जनतेच्या तिजोरीवर डल्ला मारला जातो आहे. तर बिहार सारख्या राज्यात गरीब जनतेच्या खात्यांमध्ये निवडणुक पुर्व रुपए दहा हजार जमा करून मते खरेदी करण्याचा वेगळाच पायंडा राबविला जातो आहे.

हे घटनाबाह्य कृत्य ठरते आहे. तरीही निवडणुक आयोग कुठलेही पाऊल उचलू शकत नाही. अशी शोकांतिका पहायला मिळते आहे. यांस काय म्हणावे? मतचोरी का अजून काही ?

याचा प्रखर विरोध जनता, मतदाता करीत नाही. चुकीच्या कामांविरोधात जनतेचा आवाज निवडणुकीत बुलंद होऊ नये यासाठीचे हे पुर्वनियोजन ठरते आहे. सुशिक्षीत मतदार, कर्मचारीवर्ग पण वेगवेगळ्या कारणाने भ्रष्टाचारात लिप्त असल्याने ते पणं या भानगडीत पडू इच्छित नाहीत. आज जाड भिंगातून प्रामाणिकता ही शोधूनही सापडेनाशी झाली आहे. इतकी ती दुर्मिळ झालेली आहे. मग चांगले परिणाम कसे पहायला मिळणार आहेत ?

भारतीय मतदार हा विकला जातो आहे. हे सर्वज्ञात झाले आहे. मग लोकशाहीच्या गप्पा मारून काय साध्य करणार आहात ? देश गुलाम होता तेंव्हा माणुसकी जीवंत होती. आज देश स्वतंत्र झाला. माणुसकी मरणासन्न अवस्थेत असलेली पहायला मिळते आहे.


आज कुणी कुणाचे ऐकण्याच्या मनः स्थितीत नाहीत. पैश्याला देवत्व प्राप्त झाले आहे. पैसा असणारे लोकच सत्तेत जाऊन बसू शकतात. पक्ष अश्याच लोकांच्या पाठीशी आहे. मग तो पैसा अवैध मार्गाने मिळवलेला असेल तरी चालेल. अशी आपली मानसिकता दृढ झालेली आहे.जनता अश्यांच्याच पाठीशी उभी राहते आहे. हे अनेक निकालांमधून सिध्द झाले आहे.

जनतेची कामें चिरीमिरी दिल्याशिवाय होत नाहीत.जनतेला याची सवय जडली आहे. प्रामाणिकतेला कुणीही हुंगत नाही. तुझे शहाणपण तुझ्याजवळ राहू दे. असे सांगितले जाते. अन्याय सहन करण्याची सवय जडली आहे. कारण मतदार पैसा घेऊन लोकप्रतिनिधींचा गुलाम, दबेल बनला आहे. याच कारणाने भारतात प्रचंड असंतोष, बेरोजगारी, भ्रष्टाचार डोक्यावर दिसत असूनही तो उफाळून येत नाही. हे आपल्या देशाचे सुदैव समजावे कां दुर्दैव?

मतदारांनी आता तरी जागे व्हावे. नाहीतर काळ सोकावल्या शिवाय राहणार नाही. याचे चांगले वाईट परिणाम भोगावेच लागतील. यातून कुणाचीही सुटका होणे नाही. हे लक्षात घेतले पाहिजे.

# शेतीतला भारत आणि इंडिया...

भारतीय शेतकरी हा जगातील सर्वात मेहनती आणि चिकाटीने काम करणारा असतो. वर्षभर घाम गाळून तो पेरणी, मशागत, खतपाणी, कीडनियंत्रण, निंदणी अशा कष्टप्रद कामांमध्ये गुंतलेला असतो. त्याचे स्वप्न एकच, भरघोस उत्पादन आणि योग्य भाव. पण ह्या स्वप्नाचा प्रवास पिकापासून विक्रीपर्यंत अनेक अडथळ्यांनी भरलेला असतो.



**व्यंकटेश नारायण जोशी**
**ज्येष्ठ पत्रकार, विचारवंत आणि शेतीनिष्ठ**

गेल्या दहा वर्षांचा आलेख पाहिला तर शेती सातत्याने घाटात चालतेय; अनेक पिकांना भाव मिळत नाही, उत्पादनखर्च अत्यंत वाढला आहे आणि शेतकऱ्याला नफा मिळणे हे अवघड झालंय. सरकारी धोरणे जरी घोषणेत पुढे येतात, परंतु अंमलबजावणीमध्ये अनेक वेळा कुचराई होते.

योजनांची घोषणा होते, अनुदाने जाहीर होतात, पण प्रत्यक्षात त्यांचा प्रभाव कमी दिसतो. हे सगळं मिळून शेती, शेतकरी आणि अपेक्षित विकास यात विसंगती निर्माण करतात. एकेकाळी एक एकर ते शंभर एकरपर्यंत मालमत्ताधारक शेतकरी शेतीवर अवलंबून होते. परंतु आज गावागावळील सुपीक जमीन प्लॉटिंगसाठी मोडतेय. नदी-नाले सांडपाणी शेतीला पोषण देत असत; आज त्याच मातीवर औद्योगिक वसाहती उभ्या राहतात.

पूर्वी वर्षातून एकदा पीक चांगले लागले तर कर्ज फेडता येई; आज जमिनीचे बाजारमूल्य इतके वाढले की त्याची विक्री जास्त फायद्याची वाटते. म्हणून शेती उत्पन्नाचे साधन नाही, जमीन विकणेच फायदेशीर ह्या वृत्तीने शेतकरी कमजोर झाला आहे.

महाराष्ट्रात एकीकडे उत्पादनात अव्वल राहिले, तर दुसरीकडे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची संख्या चिंताजनक आहे. हा विरोधाभास भारत आणि इंडिया ह्या दोन वास्तवांची दरी दाखवतो.

पारंपारिक भारतातील शेतकरी आणि आधुनिक काळातील भांडवलाधारित शेती करणाऱ्या वर्गात जमीन, तंत्रज्ञान, संसाधनांमध्ये मोठी असमानता आहे. नेहमी लहान शेतकरी कर्ज, अनिश्चितता आणि भावांच्या फरकामुळे तुटतो.

१९९० नंतरच्या जागतिकीकरणानंतर बियाणे कंपन्या, करारशेती, रासायनिक खत व्यापारी इत्यादी घटक शेतीत आले. काहींना फायदा झाला, पण बहुतेकांकडून उत्पादनखर्च वाढला, बाजारभाव कोसळले आणि परदेशी अवलंबित्व वाढले.

आज भारतात ५५% लोकसंख्या शेती आणि संबंधित कामांवर अवलंबून आहे. २०१५-१६ च्या कृषिजनगणनेनुसार ८९.४% कृषी कुटुंबं अशी आहेत ज्यांच्याकडे २ हेक्टरांखालील जमीन आहे. शिवाय, भारतातील शेतकऱ्यांच्या ८६% भागात त्यांच्या मालकीच्या जमिनीच्याच स्वरूपात छोटे व अल्पल शेती असतात, पण ते अखंड्या शेतीच्या क्षेत्रफळाचे सुमारे ४७% व्यवस्थापित करतात.

महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्या दर अत्यंत गंभीर आहे. २०२३ मध्ये राज्यात २,८५१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली, तर २०२४ मध्ये ती संख्या २,६३५ पर्यंत खाली आली आहे. परंतु २०२५ मध्ये फक्त पहिले तीन महिने पहाता राज्यात ७६७ आत्महत्यांची नोंद आहे, म्हणजे दर तासाला जवळपास एक शेतकरी आत्महत्या; विक्रमी आकडा.

हे आकडे दर्शवतात की शेतकरी न फक्त आर्थिक दृष्ट्या संकटात आहेत; त्यांचे जीवन, मनोबल आणि अस्तित्व सर्व संकटात आहे.

मी वाशिममध्ये शेतीची पाहणी करीत होतो, तिथे असणारा शेतकरी संग्राम माळी मला सांगत होते, दरवर्षी पीक घेतो, पण भाव मिळत नाही, आयती रकम फक्त खर्च भागवायला पुरते. कर्जाचं ओझा शारीरिक आणि मानसिक दोन्ही पटीवर जाणवत आहे.

संग्रामच्या मनात प्रचंड बैचेनी होती. मी जेव्हा धाराशिवला गेलो तिथे मला अत्याधुनिक शेती करणाऱ्या उच्चशिक्षित शेतकरी सविता पाटील भेटल्या त्या म्हणाल्या तापमान, पाऊस, बियाणे सगळं बदलतेय, पण धोरणं जुनीच राहतात. बाजारात जाताना बेचैनी भरते. म्हणूनच विचार करतो, जर जमिनीवर प्रेमाने शेत करतोय पण भवितव्य असेल का? विकणार का तुम्हाला?

तर बीड मधले शिक्षक आणि शेतकरी असलेले संदीप चव्हाण यांना शेती म्हणजे आपली आई वाटते आणि त्या आईला घेऊन ते म्हणतात.... माझ्या मुलांना शिक्षण द्यायचं होतं, पण जमीनच व्यापाराने विकावी लागतेय, हा विचार बेचिन करतो.

या संवेदनशील प्रतिक्रिया हे सांगतात की शेतकऱ्यांच्या मनाचे राग, तणाव आणि निर्भरता किती खोलवर आहे.

शेतीचे उत्पादन आणि विक्री हे दोन्ही टप्पे एकत्र मजबूत नसल्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था अस्थिर झाली आहे. जर हमीभाव, सिंचन सुविधा, अनुदाने, थेट विक्री चॅनेल्स, धोरणातील पारदर्शकता आणि शेतकरी सक्षमीकरण अशा सुधारणांचा अवलंब झाला तर पिकवायची की विकायची ह्या प्रश्नाचे उत्तर सकारात्मक होऊ शकेल.

शेती हे फक्त अन्नाच्या उत्पादनाचे साधन नाही तर देशाच्या सामाजिक, आर्थिक आणि स्वाभिमानाचा पाया आहे, जो जपायलाच हवा.

# आवश्यक आहे... अजून एक गांधी !

## (एक उपरोधिक व्यंग्य)

३ ऑक्टोबरची सकाळ.... फुले कोमेजली आहेत, माळा उतरल्या आहेत, कॅमेऱ्यांची चमक मावळली आहे आणि नेतेमंडळी पुन्हा सत्तेच्या गल्लीबोळात व्यस्त झाली आहेत. काल साबण-पाण्याने धुऊन चमकवलेली गांधींची मूर्ती आज पुन्हा धूळ, दुर्लक्ष आणि उदासीनतेने झाकली गेली आहे. जणू ती विचारत आहे, एका दिवसाच्या आरतीने माझा विचार जगणार आहे का ?

२ ऑक्टोबर संपताच समाज, राजकारण आणि प्रशासनाचा गांधीमय मुखवटा गळून पडतो. सत्य हे आहे की आपण गांधींना एका वार्षिक कार्यक्रमात रूपांतरित केले आहे. दरवर्षी दोन दिवस पुतळ्यांवर फुले, भाषणांत आदर्श, आणि कॅमेऱ्यासमोर चरखा; त्यानंतर सगळं पुन्हा जुन्या रुळावर.

गांधीजी म्हणाले होते, सत्य हेच ईश्वर आहे. पण आजचा भारत पोस्ट-ट्रुथ युगात जगतो आहे. येथे खोटं इतक्या सफाईने सांगितलं जातं की ते राष्ट्रीय हित ठरतं आणि सत्य बोलणाऱ्याला देशद्रोही ठरवलं जातं. अहिंसेचा देश आता द्वेषाच्या वादळात अडकला आहे, कधी धर्माच्या, कधी जातीयतेच्या, कधी आरक्षणाच्या, तर कधी भाषेच्या नावाखाली हिंसा सामान्य झाली आहे.

गांधीजींनी मिठाचा सत्याग्रह केला होता.

आज ते असते तर कदाचित डेटा सत्याग्रह केला असता. कारण आज लोकशाहीवर मिठापेक्षा जास्त नियंत्रण माहिती आणि डेटावर आहे.

राजकारणाला त्यांनी जनसेवेचं माध्यम म्हटलं. आज ते सेवा नव्हे तर सेल्फीचं व्यासपीठ बनलं आहे. नेते गरीबांच्या झोपडीत दोन घास खात कॅमेऱ्यासमोर म्हणतात.... पाहा, आम्ही गांधींच्या मार्गावर चालतो! आणि दुसऱ्या दिवशी त्यांच्या मालमत्तेच्या शपथपत्रात हजारो कोटींची नोंद दिसते. सादगीच्या जागी दिखावा आला आहे, गांधींच्या पुतळ्यावर १००० ची माळ चढवून १००० कोटींचा घोटाळा करायला निघतात.

गांधीजी म्हणाले होते की, भारताची आत्मा गावात वसते. पण आज गावातून ती आत्माच स्थलांतरित झाली आहे.



**डॉ. प्रवीण डबली**
**ज्येष्ठ पत्रकार**
**9422125656**

शेतकरी कर्जात बुडून आत्महत्या करतोय, आणि फार्महाऊसमध्ये बसलेले नेते व उद्योगपती शेती सुधारण्याचे नारे देतात. गांधीजी असते तर कदाचित ग्रामस्वराज्याऐवजी कर्जमुक्त शेतकरीसाठी सत्याग्रह केला असता.

आज गांधींची सर्वाधिक गरज कदाचित सोशल मीडियावर आहे. जिथे ट्रोल आर्मी त्यांना कमकुवत आणि अप्रासंगिकह्व म्हणत शिव्या घालेल आणि कदाचित #Gandhi2_0 असा ट्रेंड चालवून त्यांना 'antinational' घोषित करेल.

गांधीजींनी दारूबंदी आणि स्वच्छतेबद्दल बोललं. आज हे दोन्ही मुद्दे निवडणूक व्यासपीठांवर जोरात मांडले जातात. प्रत्यक्षात मात्र प्रत्येक गल्लीबोळात दारूच्या दुकानांच्या पाट्या लागल्या आहेत आणि रस्ते-कडे कचऱ्याने भरलेले आहेत. गांधींच्या नावाने स्वच्छ भारत अभियान सुरू झालं, पण सडकेपेक्षा आधी राजकारण आणि प्रशासनाचं मन स्वच्छ करण्याची गरज आहे.

खरी समस्या हीच आहे, आपण गांधींच्या पुतळ्यांची पूजा करतो, पण त्यांच्या विचारांना गाडून टाकतो. गांधी आज फक्त नोटांवर छापलेला चेहरा उरलाय. नेते त्यांच्या कोट्या सांगतात पण आदर्शांपासून दूर राहतात.

म्हणून आज प्रश्न हा नाही की २ ऑक्टोबरला आपण काय केलं? तर हा आहे की ३ ऑक्टोबरनंतर आपण काय करणार?

आपल्याला खरंच अजून एक गांधी हवा आहे का? की प्रत्येक नागरिकाने आपल्या आतल्या त्या छोट्या गांधीला जागं करायला हवं, जो सत्य बोलेल, अन्यायाविरुद्ध उभा राहील आणि द्वेषाच्या जागी प्रेम पेरू शकेल. नाहीतर दरवर्षी फुलांनी सजलेल्या पुतळ्यांमध्ये आणि कॅमेऱ्यांच्या झगमगाटात गांधी मरत राहतील आणि आपण केवळ घोषणाच देत राहू...... गांधी अमर राहो!

■ ■ ■

# आवरा तुमचा 'फुकाचा' कळवळा!

**वाचक लिहितात**

परतीचा (?) पाऊस राज्याला अनपेक्षित असा झोडपत आहे. मुख्यतः मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र या ठिकाणी सतत ३ दिवस 'ढगफुटी'सदृष्य पाऊस होऊन होत्याचे नव्हते झाले. परिस्थिती पूर्वपदावर येत नाही तोच पुन्हा एकदा पावसाने थैमान घातले आहे. पदरचा पैसा खर्च करून, रात्रं-दिवस घाम गाळून बळीराजाच्या हाताशी आलेली पिके कमरेइतक्या पाण्यात दिसेनाशी झाली.

काहींचे दुभते पशूधन जागेवरच गतप्राण झाले. तर, अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले. बहुसंख्य शेतकरी अक्षरशः देशोधडीला लागले आहेत. त्यांचे हे दुःख बघवत नाही. एकिकडे अनेक गावांत शेतकरी धाय मोकळून रडत आहेत. तर, दुसरीकडे असंवेदनशील कारभारी, (विशेषतः विरोधक) मात्र एकमेकांवर घोटाळ्यांच्या आरोप-प्रत्यारोपाची 'चिखलफेक' करण्यात मश्गुल आहेत. बाराही महिने आणि दिवसाचे २४ तास हे हेच काम करत असतात. पण, आज वेळ काय आहे? परिस्थिती किती गंभीर आहे? याचे साधे भानही यांना नसावे, याचा फार संताप होतो.

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच अनेक मंत्री तातडीने शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले. मात्र विरोधकांनी 'उंटावरून शेळ्या हाकणेच' पसंत केले. एकनाथ शिंदे हे नेहमीप्रमाणेच तातडीने मदत घेऊन घटनास्थळी दाखल झाले. त्यांच्या उत्साही कार्यकर्त्यांनी मदतीच्या किटस्वर त्यांचे फोटो चिटकवले. वेळेवर न जाणाऱ्या आणि नंतर रिकाम्या हाताने जाणा-या 'टिक्कोजीरावां'ना हे पाहवले नाही. त्यांनी लगेच फोटोवरून राजकारण करत, सरकारवर तोंडसुख घेण्यास सुरुवात केली.

ईर्शाळवाडी, समृद्ध महामार्ग, विमान, पहलगाम आदी असंवेदनशील घटनांचांही विरोधकांनी राजकारण करून आपली राजकीय पोळी भाजून घेतली. मोदी सरकारने तातडीने 'ऑपरेशन सिंदूर' राबवून पाकिस्तानचे कंबरडे मोडले. साऱ्या जगाने या यशस्वी ऑपरेशनचे कौतुक केले. पण, सत्तेसाठी हापापलेल्या आपल्याच काही 'नतद्रष्ट्यांनी' यावरही विविध शंका उपस्थित करून पीडित कुटुंबे व जवानांचा घोर अपमान केल्याचे पातक केले.

आज शेतकऱ्यांच्या जीवन-मरणाचा अतिशय गंभीर प्रश्न 'आ वासून' समोर उभा आहे. सरकारच्या पाठीशी उभे राहून, शेतकऱ्याला लवकरात लवकर व जास्तीत जास्त मदत कशी करता येईल, यावर उपाययोजना करण्याऐवजी काही 'पाताळयंत्री' विरोधक पत्रकार परिषदा घेऊन, सरकारला सल्ले आणि रस्त्यावर उतरण्याचे इशारे देत आहेत. एकिकडे 'माझा शेतकरी भाऊ' म्हणत, पाहणी दौऱ्याचा 'फार्स' करायचा. दुसरीकडे रुपयाची मदत न करता सरकारवर तोंडसुख घ्यायचे. यावरूनच शेतकऱ्यावरचे तुमचे प्रेम हे 'पुतणा मावशीचे' आहे, हे तर सिद्ध होतेच. पण, तुम्ही किती 'उलट्या काळजाचे' आहात, हेही अधोरेखित होते. मदत करायची नसेल तर करू नका. पण, किमान 'फुकाचा पुळका' तरी दाखवू नका. सरकारने 'हाथी चलता है, कुत्ते भोंकते हैं' यानुसार त्यांच्या आरोपांना उत्तरे न देता, 'जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही' हे डोळ्यासमोर ठेवून मदतकार्यात लक्ष आणि वेळ घालवावा.

**■ प्रदीप व्ही. खोलमकर**
**नाशिक. ८७६७५९२९८०**

# शरद पौर्णिमा (कोजागिरी)

कोजागिरी पौर्णिमा, जी शरद पौर्णिमा म्हणूनही ओळखली जाते, आश्विन महिन्याच्या शुक्ल पक्षातील पौर्णिमेला साजरी केली जाते.ह्या वर्षी सोमवारी ६ ऑकटोबर ला आहे. पौराणिक कथेनुसार, समुद्र मंथनातून देवी लक्ष्मीचा जन्म झाला, म्हणून हा दिवस लक्ष्मीच्या पूजेसाठी महत्त्वाचा मानला जातो. या दिवशी धन आणि समृद्धीची देवी लक्ष्मीची विशेष पूजा केली जाते. या रात्री चंद्र पृथ्वीच्या सर्वात जवळ असतो. या दिवशी रात्री देवी लक्ष्मी पृथ्वीवर फिरते आणि को‍ऽजार्गति? (कोण जागे आहे?) असे विचारते, म्हणून या पौर्णिमेला कोजागिरी पौर्णिमा म्हणतात. या रात्री लोक आनंद आणि उत्साहात एकत्र येतात, चंद्रप्रकाशात दूध पितात आणि देवी लक्ष्मीचा आशिर्वाद घेतात.

लक्ष्मीची पूजा केल्याने धनप्राप्ती होते आणि घरात सुख-समृद्धी येते, अशी श्रद्धा आहे. या दिवशी चंद्र पृथ्वीच्या अगदी जवळ असल्याने, त्याच्या किरणांचा औषधी गुणधर्म असतो. या चंद्राच्या प्रकाशात दूध प्यायल्याने शरीराला आरोग्यवर्धक फायदे मिळतात, असे मानले जाते. शरद पौर्णिमा हा केवळ एका उत्सवापेक्षा जास्त आहे . तो जीवन, निसर्ग आणि दैवी उजेर्चा उत्सव आहे. पौराणिक परंपरांचा सन्मान हा दिवस अध्यात्मिक महत्त्वाचे प्रतिनिधित्व करतो.या शरद पौर्णिमेचा सण साजरा करा, देवीचे ध्यान करा,आणि तुमचा उत्साह वाढवा!

**■ सौ. वर्षा आवदे, नागपूर.**

# अभिजात मराठी..

संपूर्ण महाराष्ट्राला व जगभरात पसरलेल्या मराठी जणांना अभिमान वाटावा अशी बातमी मागील वर्षी म्हणजे २०२४ च्या ३ ऑक्टोबर रोजी आली आणि महाराष्ट्रातीलच नव्हे तर जगभरातील मराठी जणांचा ऊर अभिमानाने भरून आला.

ती बातमी होती मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याची. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा हे महाराष्ट्रातील तेरा कोटी जनतेचे स्वप्न होते. हे स्वप्न साकार होण्यासाठी कैक दशकांची वाट पाहावी लागली. मात्र उशिरा का होईना हे स्वप्न साकार झाले.

आता दरवर्षी ३ ऑक्टोबर हा दिवस अभिजात मराठी भाषा सन्मान दिन म्हणून साजरा केला जातो. तसेच ३ ते ९ ऑक्टोबर दरम्यान अभिजात मराठी भाषा सप्ताह घोषित करण्यात आला आहे. अभिजात मराठी भाषा दिनाच्या जगभरातील मराठी जणांना मनापासून शुभेच्छा त्यासोबतच भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी संघर्ष करणा?या हजारो ज्ञात - अज्ञात व्यक्तींनाही सलाम. ३ ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्र सरकारने मराठीसह पाली, प्राकृत, आसामी आणि बंगाली या भाषांना देखील अभिजात भाषेचा दर्जा दिला. त्याआधी संस्कृत, तमिळ, तेलगू, कन्नड, उडिया, मल्ल्याळम या भाषांना अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. आता मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याने मराठीच्या श्रेष्ठत्वावर शिक्कामोर्तब झाले आहे. अर्थात मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्याचा प्रवास सोपा नव्हता. एक हजार वर्ष जुनी व पाच हजार बोलीभाषेपासून तयार झालेली अमृतातही पैज जिंकणारी मराठी भाषा अभिजात भाषेसाठी लागणारे सर्व निकष पूर्ण करत असूनही मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळत नव्हता. मराठी भाषा ही मराठी संस्कृतीचा अस्सल आधार आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी शासकीय पातळीवर अनेकदा प्रयत्न झाले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा अशी मागणी राज्य सरकारने केंद्र सरकारकडे केली होती, त्यासाठी आवश्यक असणारे सर्व पुरावे राज्य सरकारने केंद्र सरकारकडे ९ वर्षापूर्वीच सोपवली होती. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यासाठी प्राध्यापक रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली १० जानेवारी २०१२ रोजी अभिजात मराठी भाषा समिती स्थापन करण्यात आली होती. मराठी भाषेचे संशोधन करून व सूक्ष्म अभ्यास करून पुरावे गोळा करण्याचे काम या समितीकडे सोपवण्यात आले होते. प्रा रंगनाथ पठारे यांच्यासमवेत प्रा हरी नरके आणि व अन्य काही सदस्य या समितीत होते. या समितीने अतिशय सूक्ष्म अभ्यास करून मराठी भाषा अभिजात भाषेसाठी कशी पात्र आहे याचे सर्व पुरावे गोळा करून शासनाकडे सोपवले होते. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळण्यास विरोध करणारी याचिकाही उच्च न्यायालयाने फेटाळली होती तरीही मराठी भाषा अभिजात दर्जापासून वंचित होती. आता मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यावर मराठा भाषेच्या संवर्धनासाठी केंद्राकडून जास्तीचा निधी मिळेल त्यामुळे मराठी भाषेची उंची आणखी वाढेल.



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने मराठी भाषेची प्रतिष्ठा आणखी वाढेल. आता मराठी भाषेच्या श्रेष्ठत्वावर राज्यमान्यतेची मोहर उमटली आहे. मुख्य म्हणजे आता मराठी भाषेच्या विकास कार्याला अधिक चालना मिळणार आहे. भारतातील सर्व ४५० विद्यापीठांमध्ये मराठी शिकवण्याची सोय होणार आहे. महाराष्ट्रातील सर्व ग्रंथालयांना सशक्त करण्यासाठी केंद्र सरकारकडून अधिकचा निधी मिळणार आहे त्यामुळे प्राचीन ग्रंथ अनुवादित करणे सुलभ होणार आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने दरवर्षी मराठी भाषेतील दोन विद्वानांना राष्ट्रीय पुरस्कार मिळतील. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने मराठी भाषेचे श्रेष्ठत्व सिद्ध झाले आहे याचा महाराष्ट्रातीलच नव्हे तर जगभरातील मराठी जणांना अभिमान आहे. म्हणूनच अभिमानाने म्हणावेसे वाटते

*लाभले भाग्य आम्हास...*
*बोलतो मराठी....*

■ ■ ■



# रक्त तपासण्यापूर्वी काय काळजी घ्यावी?

रक्त तपासणी ही एक सोपी आणि आवश्यक चाचणी आहे. हे घरी बसून सहजपणे केले जाऊ शकते. रक्ताचा नमुना घेतल्यानंतर ही चाचणी प्रयोगशाळेत केली जाते. तपासणीत शरीरात कोणत्याही प्रकारचा रोग, संसर्ग आढळतो. रक्त तपासणीचा अहवाल एका दिवसात येतो. म्हणूनच याला सोपी चाचणी म्हणतात. परंतु रक्त तपासणी करण्यापूर्वी अनेक गोष्टींची काळजी घेणे महत्वाचे आहे, ज्याची प्रत्येकाला माहिती नसते.

रक्ताची तपासणी करून, शरीरातील अनुवांशिक रोगाबद्दल देखील जाणून घेता येते. रक्ताची कमतरता, रक्तातील कोणत्याही प्रकारचा संसर्ग, रक्तातील ग्लुकोजची तपासणी, लाल आणि पांढऱ्या रक्तपेशींचे प्रमाण, प्लेटलेटची संख्या आणि प्लाज्मा इत्यादी शोधण्यासाठी रक्त तपासणी केली जाते. रक्त चाचणीपूर्वी काही विशेष गोष्टींची काळजी घेणे महत्वाचे आहे कारण जर खबरदारी घेतली गेली नाही तर अहवाल चुकीचे असू शकतात आणि डॉक्टरांना योग्य निदान करण्यात त्रास होऊ शकतो.

तज्ज्ञांच्या मते, शुगर टेस्ट, लिपिड प्रोफाइल टेस्ट किंवा थायरॉईड टेस्ट यासारख्या काही रक्त चाचण्या रिकाम्या पोटी केल्या पाहिजेत. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, चाचणीपूर्वी म्हणजे चाचणीच्या ८ ते १२ तास आधी पाण्याशिवाय काहीही खाऊ नये. चहा, ज्यूस, कॉफी पिणे देखील चुकीचे नोंदवले जाऊ शकते.

**डॉक्टरांना औषधांबद्दल सांगा** : जर तुम्ही रक्त तपासणी करण्यापूर्वी कोणत्याही प्रकारची औषधे घेत असाल तर त्याबद्दल डॉक्टरांना आधी सांगा. रक्ताची तपासणी करण्यापूर्वी रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग इत्यादींसाठी औषधे घ्यायची की नाही याबद्दल डॉक्टरांना आधीच विचारा.

**चाचणीपूर्वी व्यायाम करू नका** : जर आपली साखर किंवा कोलेस्टेरॉल जास्त असेल तर रक्त तपासणीपूर्वी जड व्यायाम करू नका किंवा चालू नका. असे केल्याने साखर किंवा कोलेस्टेरॉलचे परिणाम बदलू शकतात. म्हणून, रक्त तपासणीपूर्वी कमीतकमी २४ तास जड व्यायाम टाळला पाहिजे.

**पुरेशी झोप घ्या** : रक्त तपासणीपूर्वी झोप घेणे देखील महत्वाचे आहे. जर आपल्याला पुरेशी झोप मिळाली नाही तर आपल्या हार्मोन्स आणि साखरेच्या पातळीवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे हा अहवाल योग्य ठरणार नाही. रक्त तपासणीपूर्वी चांगले झोपण्याचा प्रयत्न करा.

**मद्यपान आणि धुम्रपानापासून दूर राहणे** : रक्त तपासणीपूर्वी कमीतकमी २४ तास अल्कोहोल किंवा धूम्रपान करू नका. विशेषतः यकृत कार्य, लिपिड प्रोफाइल आणि साखर चाचणीवर त्यांचा परिणाम होऊ शकतो.

**पाणी प्या पण जास्त पिऊ नका** : रक्त तपासणीपूर्वी हलके पाणी पिणे फायद्याचे आहे. त्यातून रक्त सहजपणे काढले जाऊ शकते . परंतु हे लक्षात ठेवा की जास्त पाणी पिण्यामुळे अहवालातही फरक पडू शकतो. ■ ■

## अशोकायन

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



# फुलासंगे मातीस ..!

**मैत्री करावी पारखून**
**अन्यथा होईल घात**
**वाण नाही पण गुण लागले**
**म्हणण्याचा आहे प्रघात..!**

**संगतीचा पडतो प्रभाव**
**बदलतो व्यक्तिचा स्वभाव**
**अवती भवती दिसते दृश्य**
**खोटं आहे का राव?**

**टाळूनी संयमाने मोह**
**करावा मनाचा निग्रह**
**कुटूंबवत्सल व्यक्तिसाठी**
**हेच असे सर्वदा हितावह..!**

# सद्गुरु श्री शिवकृपानंद स्वामीजी यांच्या मंगल वाणीचा हजारो साधकांनी घेतला लाभ

## ध्यानस्थली नागपूर येथील महानवरात्री अनुष्ठानाचा समारोप

**नागपूर, दि. ०३ ऑक्टोबर:** सहसा आपण ज्याला धर्म समजतो ती उपासना पद्धती असून त्यातून आंतरिक बदल घडून येत नाही. आंतरिक बदल घडवण्याकरिता आत्मानुभूतीचे संस्कार आवश्यक असून हे अमूल्य संस्कार समाजातील माणसांपर्यंत पोचावे ह्या उद्देशानेच हिमालयातील सद्गुरूंनी स्वामीजींना ह्या आत्मज्ञानाचा प्रचार प्रसार करण्यास अधिकृत केले, असे आशीर्वचन हिमालयीन सद्गुरु श्री शिवकृपानंद स्वामीजी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित भक्तांना दिले.

ध्यानस्थली नागपूर, मध्यभारत समर्पण आश्रम, ठाणा (पादरी), बुटीबोरी-उमरेडरोड, येथे २२ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर दरम्यान नवरात्री अनुष्ठानाचे आयोजन करण्यात आले होते ज्या अंतर्गत येथे बांधण्यात आलेल्या भव्य श्री गुरुशक्तिधाम येथे श्री मंगल मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली व दिनांक २ ऑक्टोबर रोजी त्याचा भव्य लोकार्पण सोहोळा आयोजिण्यात आला. त्यावेळी सद्गुरु श्री शिवकृपानंद स्वामीजींच्या आध्यात्मिक सत्संगाचा दस-याच्या शुभमुहूर्तावर हजारो साधकांनी लाभ घेतला.

लोकार्पण सोहोळ्याचा प्रारंभ सुरुवातीला अतिरिक्त पोलिस महासंचालक श्री अजेय रानडे, नागपूर रेंजचे पोलिस महानिरीक्षक श्री संदीप पाटील, राणा शिपिंग कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक श्री राणा सुर्यवंशी, रुबी हॉल पुणेचे अध्यक्ष डॉ. परवेझ ग्रांट, योग प्रभा भारती सेवा संस्था ट्रस्टच्या व्यवस्थापकीय विश्वस्त श्रीमती शीना ओमप्रकाश, लॉईड एनर्जी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्री प्रभाकरण, व कार्यकारी संचालक श्री व्यंकटेशन, गंगाधर इन्फोटेकचे व्यवस्थापकीय संचालक श्री आशीष फडणवीस, बेल लॅब कॅलिफोर्निया विद्यापीठाचे श्री नरसिम्हा रेड्डी, आयसीएआरचे उपसंचालक डॉ. सुरेश चौधरी, गुजरातचे निवृत्त पोलिस महासंचालक श्री एस. एस. खांडवाला यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आला. त्यानंतर पुजनीय गुरुमाँ च्या हस्ते श्री गुरुशक्तीधामचे लोकार्पण करण्यात आले. हे भव्य श्री गुरुशक्तीधाम अवघ्या ९ महिन्यात तयार करण्यात आले आहे. साधकांच्या जयघोषात सद्गुरु श्री शिवकृपानंद स्वामीजींचे मंचावर आगमन झाले.

स्वामीजींनी हिमालयातील त्यांची साधना आणि आत्मसाक्षात्काराच्या अनुभूतीचे आपल्या ऊर्जात्मक वाणीतून साधकांना दर्शन घडवले. ते म्हणाले, ज्ञान जितके वाटले तितके ते वाढत असते. प्राप्त झालेले अनुभव, संस्कार आणि ज्ञान पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे.

श्री मंगल मूर्ती मध्ये अंतर्मुख शक्ती स्थापित केले असून त्याचा सान्निध्यात येणाऱ्या साधकांना आत्मसाक्षात्काराची सर्वश्रेष्ठ अनुभूती होऊ शकते. आत्मसाक्षात्काराच्या माध्यमातून आत्मधर्म जागृत होत असून त्यानंतर साधक बाह्य प्रभावांमधून मुक्त होत असून स्वतःच्या आत्म्याचा मार्गदर्शनाखाली सशक्त जीवन जगू शकतात, असे ह्या प्रसंगी सद्गुरू श्री शिवकृपानंद स्वामीजी म्हणाले

# नागपूरमध्ये वाढती चिंता हृदयाच्या आरोग्याकडे दुर्लक्ष धोकादायक

**नागपूर, दि. ०३ ऑक्टोबर:** ऑरेंज सिटी म्हणून ओळखला जाणारा नागपूर आज एका शांत पण गंभीर आव्हानास सामोरा जात आहे वाढती हृदयविकारांची समस्या. वर्ल्ड हार्ट डे जवळ येत असताना, शहरातील डॉक्टरांनी नागरिकांना आवाहन केले आहे की दैनंदिन सवयींचा हृदयावर होणारा परिणाम आता गांभीर्याने घ्यावा.

डॉक्टरांचे म्हणणे आहे की नागपूरमध्ये जीवनशैली झपाट्याने बदलत आहे आणि हा बदल हृदयासाठी अपायकारक ठरत आहे. वाढते प्रदूषण, जड वाहतूक, बाहेरचे तेलकट व फास्टफूड, तणावपूर्ण नोकऱ्या आणि दिवसभर बसून राहण्याची सवय हे सगळे घटक मिळून हृदयावर अनावश्यक ताण आणत आहेत. ही समस्या फक्त वयस्करांपुरती मर्यादित राहिलेली नाही, तर तरुणांमध्येही लक्षणं लवकर दिसू लागली आहेत.

बेलसरे हॉस्पिटल, नागपूरचे हृदयरोगतज्ज्ञ डॉ. किरण बेलसरे म्हणाले, हृदयाचं आरोग्य ही नागपूरमध्ये वाढती चिंता आहे आणि लोकांनी याकडे दुर्लक्ष करणं परवडणारं नाही. रोज मी अशा रुग्णांना बघतो ज्यांना वाटतं की छातीतला त्रास किंवा थकवा हा फक्त तणाव आहे, पण खरं तर त्यांचं हृदय दबावाखाली असतं. खरी समस्या ही आहे की आपण कृती करतच नाही, जोपर्यंत ती आपत्कालीन स्थिती होत नाही. माझा नागपूरकरांना सरळ सल्ला आहे उपचारापेक्षा प्रतिबंध हा नेहमीच प्रभावी ठरतो. घरगुती संतुलित जेवण



घ्या, तेलकट पदार्थ टाळा, दररोज अर्धा तास चालणे किंवा योगाला द्या, तणाव कमी ठेवा आणि नीट झोप घ्या. हे उपाय साधे वाटतात, पण एकत्रितपणे ते ठरवतात की तुमचं हृदय मजबूत राहील की कमकुवत होईल. कुटुंबाने या छोट्या गोष्टी दैनंदिन आयुष्याचा भाग केल्या तर काही वर्षांत नागपूरचं आरोग्यचित्र बदलू शकतं.

डॉक्टर सांगतात की प्रश्न फक्त औषधोपचारांचा नाही, तर जागरूकता आणि वेळेवर केलेल्या कृतींचाही आहे. थकवा, श्वास लागणे किंवा नीट झोप न लागणे यांसारखी साधी लक्षणं लोक सहज दुर्लक्ष करतात. हीच लक्षणं गंभीर हृदयविकाराचे सुरुवातीचे इशारे असू शकतात. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की नागपूरच्या बदलत्या जीवनशैलीला दुरुस्त करण्यासाठी ठराविक प्रयत्न आवश्यक आहेत. घरचे ताजे अन्न बाहेरच्या तेलकट खाण्याच्या ऐवजी निवडणे, अंबाझरी तलाव किंवा जपानी गार्डनमध्ये चालणे, आणि दररोज थोडा वेळ योग व ध्यानासाठी राखणे या साध्या पण प्रभावी पायऱ्या आहेत.

# अनिता भाभी आणि तिवारीजी यांनी मुंबईतील गरबा नाइटमध्ये उत्साहाची भर केली



**मुंबई, दि. ०३ ऑक्टोबर:** भारतातील भव्य सणांपैकी एक नवरात्री सण जगभरात जल्लोषात साजरा केला जातो. या वर्षी एण्ड टीव्हीवरील मालिका भाबीजी घर पर है'मधील लोकप्रिय जोडी अनिता भाबी (विदिशा श्रीवास्तव) व मनमोहन तिवारी (रोहिताश्व गौड) यांनी मुंबईतील प्रसिद्ध गरबा नाइटमध्ये उतसाहाची भर केली आणि चाहत्यांसोबत उत्सवी उत्साहाचा आनंद घेतला. हे साजरीकरण दुप्पट आनंदाचे ठरले, जेथे एण्ड टीव्ही लवकरच नवीन अलौकिक शक्तीसंदर्भातील विनोदी मालिका घरवाली पेडवाली' सूरू करण्यास सज्ज आहे,ज्यामुळे प्रेक्षकांना अधिक मनोरंजन मिळणार आहे.

उत्सवी उत्साहाची भर करत रोहिताश्व गौड ऊर्फ मनमोहन तिवारी म्हणाले, तिवारीजीचे अनिता भाबीसोबत गरबा खेळण्याची संधी मिळण्याचे स्वप्न होते. आणि या वर्षी ते स्वप्न पूर्ण झाले आहे (हसतात). माझ्या लाडक्या अनिता भाबीसोबत (विदिशा) गरबा खेळताना एकाच रात्री दिवाळी व होळी असल्यासारखे वाटले. मालिकेमध्ये मी नेहमी तिचे मन जिंकण्याचा प्रयत्न करतो, पण पडद्यामागे मुंबईतील गरबा मंचावर तिच्यासोबत गरबा नृत्य करण्याचा आनंद पूर्णत: वेगळा होता.''

आपला आनंद व्यक्त करत विदिशा श्रीवास्तव ऊर्फ अनिता भाबी म्हणाल्या, नवरात्रीचे माझ्या मनात खास स्थान आहे आणि माझ्या कुटुंबामध्ये मोठ्या भक्तीभावासह साजरा केला जातो. दरवर्षी आम्ही नऊ दिवसांच्या रंगांची परंपरा पाळतो आणि दुर्गामातेची आराधना करतो. यंदा नवरात्री सण अधिक खास ठरला, जेथे मी वेळात वेळ काढून माझे सह-कलाकार रोहिताश्व गौड (मनमोहन तिवारी) यांच्यासोबत कला केंद्र, बोरीवली येथे मुंबईतील प्रतिष्ठित गरबा नाइटचा आनंद घेतला.''

विदिशा श्रीवास्तव यांना अनिता भाबीच्या भूमिकेत आणि रोहिताश्व गौड यांना मनमोहन तिवारीच्या भूमिकेत पाहण्यासाठी पाहत राहा मालिका भाबीजी घर पर है' दर सोमवार ते शुक्रवार रात्री १०.३० वाजता फक्त एण्ड टीव्हीवर!

# टाटा कॅपिटललिमिटेडची प्राथमिक समभाग विक्री सोमवार ०६ ऑक्टोबर २०२५ पासून होणार सुरू




**मुंबई, दि. ०३ ऑक्टोबर:** टाटा कॅपिटललिमिटेड (टीसीएल किंवा कंपनी)च्या इक्विटी शेअरसाठी प्राथमिक समभाग विक्री सोमवार ०६ ऑक्टोबर २०२५रोजी खुली करण्याचा प्रस्ताव आहे.

प्रति इक्विटी शेअरसाठी ३१०रुपये ते ३२६रुपये पर्यंतचा किंमतपट्टा निश्चित करण्यात आला आहे. बोली किमान ४६इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ४६इक्विटी शेअर्सच्या पटीत लावता येईल.

कंपनीच्या प्राथमिक समभाग विक्री ऑफरमध्ये ४७५,८२४,२८० पर्यंतच्या इक्विटी शेअर्सचा समावेश आहे. (एकूण ऑफर साईज) त्यामध्ये २१०,०००,००० पर्यंतच्या इक्विटी शेअर्सचे फ्रेश इश्यू आणि ऑफर फॉर सेल मध्ये २६५,८२४,२८० पर्यंतचे इक्विटी शेअर्स (ऑफर फॉर सेल) आहेत.

विक्री समभागधारक टाटा सन्स प्रायव्हेट लिमिटेड (प्रवर्तक विक्री समभागधारक)असून २३०,०००,००० पर्यंतच्या इक्विटी शेअर्सची तर इंटरनॅशनल फायनान्स कॉर्पोरेशन (गुंतवणूकदार विक्री समभागधारक) ३५,८२४,२८० पर्यंतच्या इक्विटी शेअर्सची विक्री करत आहे.

प्रमुख गुंतवणूकदाराच्या बोलीचा दिनांक शुक्रवार, ०३ ऑक्टोबर २०२५आहे. बोली/ऑफर बुधवार, ०८ ऑक्टोबर २०२५रोजी बंद होईल.

फ्रेश इश्यू मधून मिळणाऱ्या निव्वळ उत्पन्नाचा उपयोग ऑनवर्ड लेंडीगसह कंपनीच्या भविष्यकालीन भांडवली गरजा पूर्ण करण्यासाठी टियर १ भांडवल आधार वाढविण्याकरता वापरण्याचा कंपनीचा प्रस्ताव आहे.

हे इक्विटी शेअर्स कंपनीच्या दिनांक२६सप्टेंबर २०२५ रोजीच्या रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस द्वारे सादर करण्यात येत असून महाराष्ट्रातील मुंबई येथील रजिस्ट्रार ऑफ कंपनीज यांच्याकडे दाखल करण्यात आले आहेत. कंपनीचे हे इक्विटी शेअर्सरेड हेअरिंग प्रोस्पेक्टसद्वारेबीएसई लिमिटेड (बीएसई) आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड (एनएसई) वर सूचीबद्ध करण्याचे प्रस्तावित आहे.

# गौतम अदाणी यांनी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची पाहणी केली



**मुंबई, दि. ०३ ऑक्टोबर:** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आपल्या औपचारिक उद्घाटनाच्या आधी अंतिम टप्प्यात पोहोचला आहे.बुधवार, ८ ऑक्टोबर २०२५ रोजी होणाऱ्या उद्घाटनापूर्वी अदाणी समूहाचे चेअरमन गौतम अदाणी यांनी विमानतळाला भेट देऊन तयारीची पाहणी केली.

गौतम अदाणी यांनी विमानतळाच्या तांत्रिक प्रगती आणि संचालनाची सखोल तपासणी केली. पूर्ण क्षमतेने कार्यरत झाल्यानंतर हा विमानतळ दरवर्षी ९ कोटी प्रवाशांची सोय करू शकेल, ज्यामुळे तो जगातील सर्वात मोठ्या आणि अत्याधुनिक विमानतळांमध्ये गणला जाईल.

या प्रसंगी गौतम अदाणी यांनी विमानतळ घडवणाऱ्या विविध गटांशी संवाद साधला. त्यांनी बांधकाम कामगार, अभियंते, प्रकल्प टीम, अग्निशमन दलाचे कर्मचारी आणि टर्मिनलमधील रिटेल आउटलेटमध्ये काम करणाऱ्या दिव्यांग कर्मचाऱ्यांशी देखील भेट घेतली.

या वेळी गौतम अदाणी म्हणाले येथील प्रत्येक धावपट्टी, प्रत्येक टर्मिनल आणि प्रत्येक गेट हजारो हात आणि हृदयांशी जोडलेले आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हा फक्त एक इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्प नाही, तर भारताच्या भावनेचे आणि सामूहिक प्रयत्नांचे प्रतीक आहे भारताच्या लोकांनी, भारताच्या लोकांसाठी घडवलेला.

पंतप्रधानांच्या हस्ते ८ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या उद्घाटनापूर्वीच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ मुंबईतील हवाई वाहतुकीवरील गर्दी कमी करण्यासाठी, प्रादेशिक आणि राष्ट्रीय आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी आणि भारताच्या भविष्याचे प्रवेशद्वार ठरण्यासाठी पूर्णतः सज्ज झाला आहे.

# सोनी सबचे कलाकार वाईटावर चांगल्याचा विजय साजरा करत आहेत

**मुंबई, दि. ०३ ऑक्टोबर:** दसरा म्हणजे विजयादशमी हे वाईटावर चांगल्याच्या विजयाचे पर्व आहे, तो सदाचरणाच्या विजयाचा उत्सव आहे. देशभरात हा सण रामलीला सादर करून, रावणाच्या पुतळ्याचे दहन करून सहकुटुंब साजरा केला जातो. या सणाचा उत्सवी सुगंध वातावरणात दरवळू लागलेला असताना सोनी सबचे कलाकार करुणा पांडे, ऋषी सक्सेना, गौरी टोंक आणि समृद्ध बावा त्यांच्या लेखी दसऱ्याचे काय महत्त्व आहे, हे सांगत आहेत. लहानपणी बघितलेल्या रावण-दहनाच्या आठवणींपासून ते आत्ममंथन करून नवी सुरुवात करण्यासाठी सुयोग्य दिवस मानणारे हे कलाकार या दिवसाचे माहात्म्य सांगत आहेत. आजही हा सण ते कसा साजरा करतात हे ऐकू या त्यांच्याकडूनच.

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत पुष्पाची भूमिका करणारी करुणा पांडे म्हणते, दसरा आपल्याला हे स्मरण देतो की, चांगल्या गोष्टींचा नेहमीच विजय होतो. मग, प्रवास कितीही खडतर असला तरी! लहान असताना मला रामलीला आणि रावणाचे दहन बघायला फार आवडायचे. रावण-दहननेहमी प्रतीकात्मक असल्याचा आभास व्हायचा-वाटायचे की जणू, आपण आपल्या आयुष्यातील सारे काही नकारात्मक ते जाळून टाकत आहोत. आजही, माझ्यासाठी दसरा एक असा दिवस असतो, जेव्हा मी थोडे थांबून सरलेल्या वर्षाचा विचार करते आणि मला अडकवून ठेवणाऱ्या गोष्टी मुक्त करते.

# विश्वराज एनव्हीरॉनमेंट लिमिटेडने २२५० कोटी रु.च्या आयपीओसाठी अर्ज केला दाखल

**मुंबई, दि. ०३ ऑक्टोबर:** पाणी सुविधा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पांची आघाडीची विकासक कंपनी विश्वराज एनव्हीरॉनमेंट लिमिटेडने औद्योगिक वापरासाठी प्रक्रिया केलेल्या मैलापाणी पुनर्वापरावर लक्ष केंद्रित केले असून कंपनीने आपला ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस (डीआरएचपी)बाजार नियामक सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी)कडे दाखल केला आहे.

कंपनीच्या प्राथमिक समभाग विक्री प्रस्तावामध्ये (आयपीओ) १,२५० कोटी रु. पर्यंतचे फ्रेश इश्यू आणि प्रवर्तक विक्री समभागधारक प्रीमियर फायनान्शीयल सर्व्हिसेस लिमिटेड कडून १,००० कोटी रु. पर्यंतचा विक्री प्रस्ताव (ऑफर फॉर सेल) समाविष्ट आहे.

बीआरएलएमएस सोबतच्या सल्लामसलतीनुसार, वीईएल आपले आरएचपी दाखल करण्यापूर्वी २५० कोटी रु. पर्यंतचा पूर्व आयपीओ विचारात घेऊ शकते. जर हे करण्यात आलेतर उभारलेली रक्कम फ्रेश इश्यू मधून कमी केली जाईल.

विश्वराज एनव्हीरॉनमेंट लिमिटेड (वीईएल)ही भारतातील पाणी सुविधा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पांची आघाडीची विकासक कंपनी आहे. कंपनीने औद्योगिक वापरासाठी प्रक्रिया केलेल्या मैलापाणी पुनर्वापरावर लक्ष केंद्रित केले आहे. राज्य व केंद्र सरकार संस्था, स्थानिक नागरी संस्था आणि वीज वितरण कंपन्यांचा मजबूत ग्राहकवर्ग विकसित केला आहे.

मजबूत प्रमोटर टीमच्या नेतृत्वाखाली, वीईएल पीपीपी (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप), एचएएम (हायब्रिड न्युइटीमॉडेल), ईपीसी (इंजिनिअरिंग प्रोक्योरमेंट अँड कन्स्ट्रक्शन)आणि ओ अँड एम (ऑपरेशन्स अँड मेंटेनन्स)या वैविध्यपूर्ण व्यवसाय मॉडेलवर कार्यरत आहे.

नागपूर महानगरपालिका, महाराष्ट्र स्टेट पॉवर जनरेशन कंपनी, महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी डिस्ट्रीब्युशन कंपनी लिमिटेड, नागपूर मेट्रोपॉलिटन रीजन डेव्हलपमेंट अथॉरिटी, बंगळुरू वॉटर सप्लाय अँड सीवरेज बोर्ड, तापी इरिगेशन डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन, कर्नाटक रुरल ड्रिंकिंग वॉटर अँड सॅनिटेशन डिपार्टमेंट, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणआणि पिंपरी-चिंचवड म्युनिसिपल कॉर्पोरेशन यांचा कंपनीच्या काही ग्राहकांमध्ये समावेश आहे.

# प्रसिद्ध टीव्ही कलाकार यांनी शिव परिवाराकडून काय शिकण्यासारखे आहे याबाबत आपले मत मांडले





**मुंबई, दि. ०३ ऑक्टोबर:** काही कथा अशा असतात, ज्यांना काळ, परंपरा यांचे बंधन नसते. त्यातून मिळणारी शिकवण चिरंतन असते, जी अनेक शतकांनंतर आजही तितकीच संबद्ध वाटते. सोनी सबवरील गाथा शिव परिवार की गणेश कार्तिकेय या मालिकेत अशीच एक कथा सांगितली आहे. यामध्ये भगवान शंकर (मोहित मलिक) आणि देवी पार्वती (श्रेनु परीख) आणि त्यांची मुले गणेश आणि कार्तिकेय यांचा प्रवास केवळ देवता म्हणून नाही, तर प्रेमाने एकमेकांशी निगडीत कुटुंबाचा प्रवास म्हणून रेखाटला आहे. त्यांच्या या कहाणीतून मिळणारी शिकवण आजही शिरोधार्य आहे. ६ ऑक्टोबर रोजी रात्री ८ वाजता सुरू होत असलेली ही मालिका प्रेक्षकांना कुटुंब, पराक्रम आणि निःस्वार्थीपणा या कालातीत मूल्यांची उजळणी करून देईल.

या कहाणीचे गुणगान करताना नकुल मेहता, सुधांशु पांडे, शक्ती अरोरा आणि शिवांगी जोशी यांनी एकत्र येऊन एकमुखाने सांगितले की गणेश कार्तिकेयची कहाणी त्यांना खूप व्यक्तीगत वाटते. त्या सर्वांनी सांगितले की आजही नाती, कुटुंब आणि आयुष्यात आपण जी निवड करतो, यावर भगवान शिव, पार्वती, गणेश आणि कार्तिकेय यांचा कसा प्रभाव दिसतो. देशभरातल्या लोकांना ही मालिका खूप आवडेल असे त्यांना का वाटते हे ऐकू या त्यांच्याकडूनच.

आपले विचार व्यक्त करताना नकुल मेहता म्हणाला, मुंबईतच राहात असल्याने मी अनेकदा सिद्धिविनायक मंदिरात गेलो आहे. उत्तराखंडात शूटिंग करत असताना मला एकदा कर्तिकेय स्वामी मंदिरात जाण्याची संधी मिळाली होती. एक वेगळाच अनुभव मला मिळाला. तेथील शांत वातावरणात मला जणू देव हा संदेश देत होता की, जरा सावकाश, धीर ठेव, सारे काही ठीक होईल.

# शब्दकोडे क्रमांक २२३१



**आडवे शब्द :-**
१) --- -- --- --- नाचरे मोरा नाच 'एक बालगीत
८) लोखंड गुळगुळीत करण्याचे हत्यार
१०) महिला
११) रानरेडा
१२) उगाच
१४) पारद
१७) कालवा
१८) शहर
२०) हिंमत, धैर्य
२२) दुसऱ्याच्या मनातील विचार ओळखणारा
२४) होकारच्या विरुद्ध
२५) वाद्य वाजविणारा
२६) कावळा
२७) समशेर
२९) विमान
३१) स्वाद
३२) गाय
३३) मगज
३५) पद्धत
३६) लहान मूल
३८) गवताचे पान
३९) नशा आणणारा एक पदार्थ
४०अ) अवघड, कडक
४१) मगरींचे अस्तित्व असलेला समुद्र
४४) ताडाच्या झाडीचा रस
४५) सरळ लांब वासा
४७) एक पालेभाजी
४८) सत्ता
५०) पर्वत
५१) युद्धाची गाणी
५५) छोटा पर्वत
५७) भारताचे चलन
५९) दोन मैलाचे अंतर
६०) लक्ष्मीचे एक नाव
६१) रुपेरी मुलामा
६४) कंटाळा आणणारी लाबंलचक बडबड, जाड दोरखंड
६५) वांग्याचा एक लोकप्रिय पदार्थ
६७) मज्जाव
६८) नेत्रकोणाने पाहणे
६९) धपाटा
७१) शंकर
७२) वाल्मिकीऋषींचे पहिले नाव
७३) ख्रिश्चनांचा प्रमुख सण
७४) देणारा
७५) चांदी
६७) सडेतोड उत्तर
७७) बारा वर्षांचा काळ

**उभे शब्द :-**
१) अनेक प्रकार
२) खंदक
३) एक सुगंधी पांढरे फूल
४) पोपट
५) संकट
६) अरण्य
७) जिवंत असे पर्यंत
८) अक्षरापुढची उभी रेघ
९) नक्कल करणारा
१३) हात
१४) पवित्र
१५) सीतेच्या वडिलांचे नाव
१६) कावळ्याचे ओरडणे
१९) सोन्याचा चागा
२१) कैफी
२२) मोगऱ्याची एक जात
२३) टपाल
२४) बाज विणण्याची सुती पट्टी
२५) व्यर्थ
२८) निकट
३०) शंभर
३१) छोटी लढाई
३४) कापडाला पडलेले भोक बुजविण्याची क्रिया
३७) वरवधूची मिरवणूक
३८) पैंजण
३९) अत्यंत अडचणीच्या वेळेला
४०) घराचा मागचा दरवाजा
४१) अग्नीचा कण
४३) गीत, गाणे
४६) राघव
४९) हिस्सेदार
५२) प्रजा
५३) युवती
५४) विशेष
५६) उणीव, न्यूनता
५८) विनंती, मागणी
५९) पराकाष्ठेचा लाभ
६२) वडील, जन्म देणारा
६३) वरपांगी
६५) खाद्य
६६) नुकसान
६७) साह्य
७०) हालचालीवर ठेवलेली नजर
७१) सदोदित
७२) गंध, मुक्काम
७३) मुलाची वा मुलीची मुलगी

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# गुंगीचे औषध देऊन महिलेवर अत्याचार

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ३ :
चॉकलेटमधून गुंगीचे औषध देऊन महिलेवर अत्याचार केला. तिचे फोटो काढण्यात आले. महिलेला लग्नासाठी जबरदस्ती करीत फोटो व्हायरल करण्याची धमकी देण्यात आली. ही घटना गाडगेनगर ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली. या प्रकरणी पीडित महिलेच्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. आकाश प्रकाश गोमकाळे (२८) रा. वडाळी असे गुन्हा दाखल केलेल्या आरोपीचे नाव आहे. पीडित महिला व आकाश हे एकमेकांच्या परिचयातील आहेत. आकाश हा महिलेच्या पतीचा मित्र होता. त्यामुळे त्याचे महिलेकडे नेहमी येणे-जाणे होते. तो महिलेसोबत मोबाइलवरसुद्धा बोलत होता. या काळात पीडित महिला व आकाश हे एकमेकांच्या प्रेमात पडले. दरम्यान, या प्रकाराबाबत महिलेच्या पतीला माहित झाले. त्यामुळे महिला व तिच्या पतीचा वाद झाला. त्यामुळे महिला ही तिच्या माहेरी निघून गेली. दरम्यान, एक दिवस आकाशने महिलेला कॉल केला. त्याने तिला भेटण्याची इच्छा व्यक्त केली. त्यामुळे महिला ही आकाशला भेटायला गेली. त्यावेळी आकाशने तिला मित्राच्या खोलीवर नेले. त्या ठिकाणी त्याने महिलेला चॉकलेट खाऊ घातले. चॉकलेट खाल्ल्यानंतर महिलेला गुंगी आली. ती बेशुद्ध झाली. त्या अवस्थेत आकाशने तिच्यासोबत शारीरिक संबंध प्रस्थापित केले. तसेच त्याचे फोटोसुद्धा काढले. त्यानंतर आकाश हा महिलेला लग्न करण्यासाठी जबरदस्ती करू लागला. त्याला महिलेने नकार दिला. त्यावर आकाशने तिला तिचे आक्षेपार्ह फोटो व्हायरल करण्याची धमकी दिली. या प्रकरणी महिलेच्या तक्रारीवरून आकाशविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

## १४२० गावांपैकी ५८८ गावांची पैसेवारी पन्नास पेक्षाही कमी
### खरीप हंगामाची नजर अंदाज पैसेवारी जाहीर



**बुलडाणा:** एक ते दीड लाख हेक्टरवरील पिकांची पावसामुळे नासाडी झाल्यानंतर सप्टेंबर अखेर येणारी नजर अंदाज पैसेवारी जाहीर झाली आहे. १४२० गावांपैकी ५८८ गावांची पैसेवारी पन्नास पेक्षा कमी आहे. दुसरी पैसेवारी निघण्यास अजून एक महिन्याचा कालावधी बाकी आहे. त्या पैसेवारीची वाट न बघता राज्य सरकारने दुष्काळी योजना घोषित करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे. ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी निघालेल्या ठिकाणी दुष्काळ जाहीर करुन सवलती लागू करण्यात याव्या, अशाही अपेक्षा आता व्यक्त होत आहे. यंदाच्या सन २०२५-२६च्या खरीप हंगामातील जिल्ह्यातील एकूण १४२० गावातील नजर अंदाज पैसेवारी जिल्हा प्रशासनाने जाहीर केली आहे. त्यानुसार सरासरी नजर अंदाज पैसेवारी ५२ पैसे इतकी जाहीर करण्यात आली आहे. जिल्ह्यात एकूण १४२० गावे असून ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी असलेल्या गावांची संख्या ५८८ आहे. तर ५० पैशांपेक्षा जास्त पैसेवारी असलेल्या गावांची संख्या ही ८३२ आहे. सुरुवातीपासून अस्मानी संकट जिल्ह्यावर दिसून येत होते. जून मध्ये होणारी खरिपाची पेरणी बहुतांश ठिकाणी उशिरा जुलै मध्ये झाली. त्यानंतर ऑगस्ट मध्ये अतिवृष्टीने पिकांचे नुकसान झाले. या नुकसानीची भरपाई नुकतीच मदत व पुनर्वसन मंत्री यांनी जाहीर करुन अवघे आठ दिवसही झाले नाही तो सप्टेंबर महिन्यात पुन्हा अतिवृष्टीने तडाखा दिला. एवढेच नव्हे तर चार युवकांचा मृत्यूही याच दरम्यान झाला आहे. अवघ्या कोणतेही पीक हातात आले नसून पिवळी पडलेली सोयाबीन पासून उत्पन्नाची शक्यताच कमी आहे. त्यात आता दुष्काळ जाहीर करण्याऐवजी शासनाचा वेळकाढूपणा सुरु आहे. अनख अशात पहिला अंदाजानुसार आणेवारी जाहीर करण्यात आली आहे. बुलडाणा तालुक्यातील ९८ गावांची सरासरी पैसेवारी ५४ पैसे, देऊळगावराजा ६४ गावांची सरासरी पैसेवारी ५२ पैसे, सिंदखेडराजा ११४ गावांची सरासरी पैसेवारी ५५ पैसे, मोताळा १२० गावांची सरासरी पैसेवारी ५६ पैसे, नांदुरा तालुक्यात ११२ गावांची सरासरी पैसेवारी ५७ पैसे, खामगाव १४६ गावांची सरासरी पैसेवारी ५९ पैसे, शेगाव ७३ गावांची सरासरी पैसेवारी ५३ पैसे, संग्रामपूर १०५ गावांची ५७ पैसे इतकी आहे.

# स्मशानभूमीअभावी मृतदेहाची अवहेलना

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :
महागाव तालुक्यातील बारभाई (तांडा) येथे जागेअभावी स्मशानभूमी नसल्याने मृतदेहाची अवहेलना होत आहे. ग्रामस्थांना अंत्यसंस्कारासाठी दुसऱ्या गावाच्या स्मशानभूमीचा आधार घ्यावा लागत आहे. त्यामुळे अंत्यविधीसाठी मृतदेह घेऊन जाणे आणि तेथे अंत्यसंस्कार पार पाडणे, हा एक वेदनादायी अनुभव बनला आहे. मृत्यू नंतरही मृतदेहाची अवहेलना होत असल्याची तीव्र भावना बारभाई (तांडा) येथील नागरिक व्यक्त करीत आहेत. लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने तातडीने या समस्येकडे लक्ष देऊन स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून द्यावी आणि बांधकाम करण्याची मागणी केल्या जात आहे. महागाव तालुक्यातील हिवरा (संगम) गट ग्रामपंचायतअंतर्गत असलेल्या व जवळपास ११०० लोकसंख्या असलेल्या बारभाई (तांडा) येथे स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा नंतरही स्मशानभूमीसाठी अद्याप जागा उपलब्ध झाली नाही. डोंगराच्या बाजुला असलेल्या उघड्या जागेवर अंत्यसंस्कार केल्या जात आहेत. परंतु पावसाळ्याच्या दिवसात तांड्यातील कोणाचा मृत्यू झाल्यास मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्याची मोठी समस्या निर्माण होत आहे. त्यामुळे अंत्यसंस्कारासाठी लागत असलेल्या लेवा या गावाच्या स्मशानभूमीचा आधार घ्यावा लागत आहे. शुक्रवारी दि. २६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता येथील झिंगुजी जाधव यांचे निधन झाले. शनिवारी दि. २७ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार होते. परंतु, रात्रीपासूनच मुसळधार पाऊस सुरू असल्याने सकाळी अंत्यसंस्कार कसे करायचे हा मोठा पेच नातेवाईक व गावकऱ्यांसमोर निर्माण झाला होता. त्यावेळेवी गावकऱ्यांनी लेवा येथील पोलिस पाटील गणेश देशमुख यांच्याशी संपर्क करून तेथील स्मशानभूमीतील दहन शेडमध्ये अंत्यसंस्कार करू देण्याची विनंती केली. देशमुख यांनी गावकऱ्यांशी चर्चा करून तत्काळ मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्याची परवानगी दिली. एकीकडे नागरिक आपल्या जवळच्या व्यक्तीच्या निधनाच्या दुःखात असताना, दुसरीकडे स्मशानभूमीच्या अभावामुळे होणारी ही धावपळ त्यांच्या दुःखात भर घालत आहे. मृतदेहाला सन्मानाने अखेरचा निरोप देणे हा त्यांचा मूलभूत हक्क आहे. परंतु, प्रशासन व लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे तो हिरावला जात आहे. प्रशासनाने बारभाई (तांडा) येथे तातडीने स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून द्यावी आणि लवकरात लवकर त्याचे बांधकाम पूर्ण करावे, अशी मागणी होत आहे.

# अकोटमध्ये ५९ मंडळांचा दुर्गा विसर्जन मिरवणुकीमध्ये सहभाग



**अकोट:** अकोट शहरात विसर्जन शांततेत पार पडले. ५९ मंडळांनी या विसर्जन मिरवणुकीमध्ये सहभाग नोंदवला होता. गेल्या दहा दिवस शहरात भक्तिमय वातावरणात आदी शक्तीची भक्तिभावाने पूजाअर्चा करण्यात आली होती. दरम्यान जड अंतकरणाने भक्तांनी आदिशक्तीला निरोप दिला. या वेळी मानाची देवी असलेल्या कबुतरी मैदान येथील नवदुर्गा विसर्जन मिरवणुकीला अग्रस्थानी होती. २२ सप्टेंबरपासून अतिशय धार्मिक व उत्साहपूर्ण वातावरणात सुरू असलेल्या नवरात्र महोत्सवाची १ ऑक्टोबर रोजी विसर्जन मिरवणुकीने सांगता झाली. नवरात्र महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंडळांनी शहरात विविध धार्मिक तसेच सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. काही मंडळांनी देवीसमोर गरबा नृत्यासह विविध स्पर्धांही आयोजित केल्या होत्या. संपूर्ण नवरात्रात शहर भक्तिरसात न्हाऊन निघाले होते. १ ऑक्टोबर रोजी सकाळपासूनच विसर्जन मिरवणुकीला प्रारंभ होऊन मिरवणुकीत एकूण ५९ सार्वजनिक नवदुर्गा मंडळांनी सहभाग घेतला होता. विसर्जन मिरवणूक मार्गावर ठिकठिकाणी तगडा पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता. विसर्जन मिरवणुकीत मंडळांनी विविध ठिकाणांवरून बँडपथक, पारंपरिक भजनी मंडळांना आमंत्रित केले होते.गुलालाची व फुलांची उधळण करीत वाद्यांच्या तालावर भक्त थिरकत होते. विसर्जन मिरवणूक रथांवर मंडळांनी आकर्षक विद्युत रोषणाई केली तर काही मंडळांनी विविध प्रकारचे देखावे सादर केले होते. यावर्षी बहुतांश मंडळांनी डिजेला ला फाटा देत पारंपरिक वाद्य आणि भजनी मंडळांना आमंत्रित केल्याचे दिसून आले होते.

# दुकान जळून खाक



■ महासागर प्रतिनिधी
उमरखेड, दि. ३ :
शहरातील राजे छत्रपती संभाजी उद्यानासमोर असलेल्या नगर पालिकेच्या चौपाटी दुकानात अचानक आग लागून आगीत दुकानातील हजारो रुपयाचे सर्व साहित्य जळून खाक झाले. ही घटना सकाळी ८ वाजता दरम्यान घडली असून ही आग तात्काळ आटोक्यात आणण्याचा नगर पालिका अग्निशमन दलाच्या पथकामुळे मात्र पुढील अनर्थ टळला.
उमरखेड शहरातील राजे छत्रपती संभाजी उद्यानासमोर नगर पालिकेने लहान लहान व्यवसायीकांना चौपाटी स्वरूपात दुकाने उभी करून दिले आहे.
उद्यानाच्या गेट जवळच असलेल्या लक्ष्मी भेळ भांडार या दुकानाला सकाळी ८ वाजता दरम्यान अचानक दुकानाला आतून आग लागली.
पाहता पाहता आगीने रौद्ररुप धारण केले परंतु तेथे असणाऱ्या काही नागरिकांनी नगरपालिका अग्निशमन दलाला व दुकान मालक बालाजी कुंभारे यांना या आगीबाबत कळवले. लगेच अग्निशमन दलाच्या पथकाने हि आग आटोक्यात आणली मात्र तोपर्यंत दुकानातील सर्व साहित्य जळून खाक झाले होते. विशेष म्हणजे ही दुकान आगीत जळत असतांना दुकानात दोन सिलेंडर होते वेळीच अग्निशमन दलाने आग आटोक्यात आणल्याने पुढील अनर्थ टळला आहे. घटनेची नोंद केली आहे.

# विद्यापीठात राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी



■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ३ :
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्र-कुलगुरुडॉ. महेंद्र ढोरे व कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन व राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.

## पुणे करार आरक्षणाचे फलित
### डॉ. विकास जांभुळकर



**अमरावती:** राजकारणातून नैतिकता पाळली गेली असती, तर अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ मिळाले असते. मात्र तसे झाले नाही आणि त्याचेच फलित आरक्षणात झाले, असे मत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर येथील राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. विकास जांभुळकर यांनी मांडले. संतगाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्यावतीने पुणे करार दिनानिमित्त आयोजित व्याख्यानमाला प्रसंगी 'पुणे करार : नैतिकता व राजकीय प्रतिनिधित्व' या विषयावर व्याख्यान देतांना ते बोलत होते. विचारपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, प्रमुख अतिथी म्हणून परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड उपस्थित होते. डॉ. जांभुळकर म्हणाले, भारतीय राजकारणाचे मूळ शोधण्याची आजगरज आहे. संख्याबळ अधिक असते, तर त्यांच्याकडून न्याय मिळेलच याची शाश्वती देता येत नाही. अस्पृश्यांचे प्रतिनिधित्व सुध्दा अस्पृश्यांनीच करावे अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ठाम भूमिका होती. जाती व्यवस्थेतून बाहेर पडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सतत लढा सुरू होता. १९३२ च्या करारातून अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची संकल्पना पुढे आली मात्र, त्याला महात्मा गांधींनी विरोध केला. महात्मा गांधी आणि मदनमोहन मालवीय यांच्या विरोधानूनच पुणे करार झाला व आरक्षण ही नवी संकल्पना पुढे आली, असेही ते म्हणाले. प्रमुख अतिथी डॉ. नितीन कोळी म्हणाले, १९१९ च्या कायद्याचे दर दहा वर्षांनी पुनरावलोकन होणे गरजेचे होते.

# 'मानस'ने बांधल्या एकल महिलांच्या रेशीमगाठी



■ महासागर प्रतिनिधी
बुलडाणा, दि. ३ :
दुर्गा देवी उत्सवात यंदा चक्क विधवा विवाह सोहळा पार पडला. पाच विधवा भगिनींनी आपल्या जोडीदारासोबत आयुष्यभराची रेशीमगाठ बांधली. दुर्गेच्या साक्षीने पार पडलेला हा सोहळा समाज परिवर्तनाची नांदी ठरला, असे प्रतिपादन अप्पर पोलिस अधीक्षक अमोल गायकवाड यांनी केले. नवरात्रौत्सवानिमित्त मानस फाउंडेशन व शिवसाई परिवार यांच्या वतीने एकल महिलांचा मेळावा आणि पुनर्विवाह सोहळा डी. एस. लहाने यांच्या संकल्पनेत २७ सप्टेंबर रोजी समता नगर शिवसाई ज्ञानपीठ येथे पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शिवसाई परिवाराचे संस्थापक अध्यक्ष डॉ. वसंतराव चिंचोले होते. तर मुख्य अतिथी पोलिस उपायुक्त पिंपरी चिंचवड श्वेता खेडकर, प्रमुख मार्गदर्शक अप्पर पोलिस अधीक्षक अमोल गायकवाड, मानस फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. डी एस लहाने, प्रा. शाहिना पठाण, प्रा.राहुल हिवाळे, बबन पाटील, सरपंच पवार, अश्विनी सोनुने आदी उपस्थित होते.
प्रास्ताविकात प्रा.डी. एस. लहाने यांनी विधवा महिलांना आत्मबळ देणे हा उद्देश ठेवून मानस फाउंडेशनची वाटचाल सुरू आहे. महाराष्ट्रभर लोकचळवळ म्हणून हे काम नेटाने पुढे नेण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.
सुरेश साळुंखे व रंजना परिहार चिखली, हरिभाऊ धुरंदर बरखेड व रमा जाधव रायपूर, प्रताप क्षीरसागर धामणगाव बढे व वंदना मोरे चांडोळ, राजू गणेश सुरडकर धामणगाव बढे व नंदा खडसे वर्धा, प्रशांत मोरे शेलापूर व प्रियंका मोरे यांचा विवाह पार पडला. विवाह सोहळा सत्यशोधक पद्धतीने शिक्षक अशोक गोरे यांनी पार पडला.
समानतेचा विचार हा संवैधानिक अधिकार समाजात सधवा विधवा शब्दच नसावा, समता हीच आपली मूलतत्वे आहे.
समानतेचा विचार हा संवैधानिक अधिकार आहे. आपण या कार्यासाठी सदैव सोबत असल्याची ग्वाही अपर पोलिस अधीक्षक गायकवाड यांनी दिली.

# विद्यापीठात संस्कृत भाषावबोधन वर्गाचा समारोप

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ३ :
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या संस्कृत विभागाच्यावतीने विद्यापीठातील मुलींच्या वसतिगृहातील विविध विद्याशाखेतील विद्यार्थीनींसाठी राबविण्यात आलेल्या दहा दिवसीय संस्कृत भाषावबोधन वर्गाचा समारोप उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. विद्यार्थीनींना दहा दिवसात सोप्या व आनंददायी पध्दतीने संस्कृत भाषेत संभाषण, दैनंदिन वस्तूंची संस्कृत नावे, गाणी, श्लोक, प्रार्थना, संख्या, घड्याळातील वेळ, संस्कृत भाषेत कसे बोलावे आदींचे मार्गदर्शन करण्यात आले. अध्यक्षस्थानी विभागाच्या समन्वयक डॉ. संयोगिता देशमुख, प्रमुख अतिथी म्हणून विदर्भ ज्ञानविज्ञान महाविद्यालयाच्या डॉ. रुपाली कविश्वर, आदर्श विद्यालयाच्या शिक्षिका डॉ. कीर्ती राम पिंजरकर, रसायनशास्त्र विभागाच्या डॉ. जागृती बारब्दे, राम पिंजरकर यांची उपस्थिती होती. प्रा. रुपाली कविश्वर यांनी यावेळी संस्कृत भाषावबोधन वर्गाच्या यशस्वी आयोजनाबद्दल विभागाचे विशेष कौतुक विद्यार्थीनींना शुभेच्छा दिल्या.
डॉ. कीर्ती पिंजरकर यांनी संस्कृत भाषेचे महत्त्व अधोरेखित करताना संस्कृत भाषा ही भारतीय ज्ञानपरंपरेची जननी असून संस्कृत अभ्यासामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे नवे दालन उघडत असल्याचे सांगितले. डॉ. जागृती बारब्दे यांनीही संस्कृत विभागाचे विशेष कौतुक करून असे उपक्रम अधिकाधिक घेण्यात यावेत, असे मत व्यक्त केले. राम पिंजरकर यांनीही विद्यार्थीनींना मोलाचे मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणातून डॉ. संयोगिता देशमुख यांनी विद्यार्थीनींना मार्गदर्शन करुन शुभेच्छा दिल्या.
सांस्कृतिक सत्रात विद्यार्थीनींनी मनमोहक असे सादरीकरण केले. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन, दीपप्रज्वलनाने करण्यात आली. प्रास्ताविक प्रा. स्वप्ना यावले, पाहुण्यांचा परिचय प्रा. प्रियंका मोहोड यांनी करून दिला, तर उत्कृष्ट सूत्रसंचालनाची जबाबदारी प्रा. श्वेता अशोक बडगुजर यांनी पार पाडली. प्रा. आकाश हरणे यांनी आभारप्रदर्शन केले. घेण्यात आलेल्या परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थिनींना दोन क्रेडिट प्रदान करणारी प्रमाणपत्रे आभासी पध्दतीने प्रदान करण्यात आली.
कार्यक्रमाला विद्यापीठाच्या विविध विद्याशाखांतील विद्यार्थी-विद्यार्थीनी, प्राध्यापकवृंद, अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शांती मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट मदतीची मागणी

### राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

■ महासागर प्रतिनिधी
चांदूर बाजार , दि. ३ :
मागील काही दिवसापासून सुरू असलेल्या पावसामुळे चांदूर बाजार तालुक्यातील खरीप व रब्बी प्रवर्गातील सर्व पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. त्यामुळे चांदूरबाजार तालुक्यातील नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ सरसकट मदत द्या. अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस तर्फे उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव यांना निवेदन देऊन केली आहे.
यावेळी तहसीलदार सोनल सूर्यवंशी यादेखील उपस्थित होत्या. तालुक्यातील अति पावसामुळे बाधित झालेल्या शेत जमिनीतील पिकाच्या उत्पन्नामध्ये मोठ्या प्रमाणात घट झालेली आहे.
त्याच प्रमाणे नदी व नाल्याकाठील शेतकऱ्यांच्या शेतातील माती सुध्दा खरडून गेलेली आहे. या झालेल्या नुकसानीच्या अनुषंगाने चांदूर बाजार तालुक्यातील सरसकट बाधित क्षेत्र घोषित करून शेतकऱ्यांना न्याय देण्यात यावा अशी मागणी या निवेदनामध्ये करण्यात आली आहे. यावेळी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सुरेखा ठाकरे यांच्या नेतृत्वात देण्यात आले. यावेळी निखिल ठाकरे, दिलीप धोंडे, संजय गुजर, प्रवीण भुजाडे, डॉ. सुमन कांडलकर, अमित भाई, अजय गोमकाळे ,अनिल हिवसे, वसीम सौदागर, सुनील ठाकरे , अभिजीत गावंडे, बाळासाहेब ठाकरे, राहुल ठाकरे, रोहित विधळे, सुनील बासनकर, अब्दुल जाकीर, अशोक निंभोरकर, जावेद खान, अनुज घावर, सुभाष यावतकर, राजेश आढाऊ याचबरोबर शकलो कार्यकर्ते उपस्थित होते.

# दोन युवकांचा पाण्यात बुडून मृत्यू

**वर्धा:** दोन दिवसापासून जिल्ह्यात नवरात्र उत्सवातील देवीच्या विसर्जनाची धामधूम सूरू आहे. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सार्वजनिक देवी उत्सव साजरा केल्या जात असतो. पण यावेळी विसर्जन सोहळ्यास गालबोट लागले. वर्ध्याच्या हिंगणघाट तालुक्यातील दारोडा गावातील दोन युवकांचा वणा नदीत बुडून मृत्यू झाला आहे. मात्र एकाला वेळेत वाचविण्यात यश आले आहे. हर्षल नथुजी चाफले, वय २४ तर विशाल मनोहर पोहाणे, वय २५ असे मृतकाचे नाव आहे. हे दोघेही दारोडा येथील रहिवासी असून देवी विसर्जनासाठी नदीकाठी गेले होते. मात्र विसर्जनाच्या वेळी पाण्यात तोल जाऊन दोघेजण वाहून गेले. आज सकाळी शोध मोहीम सूरू झाली. तेव्हा घटनास्थळापासून दोन किलोमीटर अंतरावर टेम्बा शिवारात दोन्ही युवकांचे मृतदेह हाती लागले.सोबत असलेला भोजराज मेश्राम याला मात्र ग्रामस्थांनी वाचवले. गुरुवारी रात्रभर शोधाशोध सूरू होती. दसऱ्याच्या दिवशी दोन तरुणांचे प्राण गेल्याने दारोडा गावावर शोककळा पसरली आहे.


## Change Of Name

MY OLD NAME WAS **RESHMA PARVEEN**. NOW MY NEW NAME IS **RESHMA SUMSUDDIN KURESHI.**
**ADD :** PLOT NO 86, BHOLE NAGAR, PARDI, NAGPUR 440035

MY OLD PASSPORT NO, **H0362702**. MY OLD NAME WAS **NOOR MOHAMMAD**. NOW MY NEW NAME IS **NOOR MOHAMMAD FATEH MOHAMMAD PATHAN.**
**ADD :** PLOT NO 65 TUKARAM NAGAR NAGPUR 440026

MY OLD NAME WAS **SHEIKH MAHIR NAZIR SHEIKH**. NOW MY NEW NAME IS **MAHIR NAZIR SHEIKH.**
**ADD :** GALLI NO.2, MAMA CHOWK, GONDIA - 441601

MY OLD NAME WAS **MADEENA BEGUM MOHAMMAD NISAR**. NOW MY NEW NAME IS **MADEENA MAHIR SHEIKH.**
**ADD :** NEAR MAKKA MASJID, GOVINDPUR RAZA CHOWK, GONDIA - 441601

MY OLD NAME WAS **SUKHCHAIN KUMAR YADAV**. NOW MY NEW NAME IS **SUKHCHAIN YADAV.**
**ADD :** TIWARI NAGAR, BHILGAON, KAMPTEE ROAD, NAGPUR- 440026

MY OLD PASSPORT NO, **K6778897**. MY OLD NAME WAS **SHAILA KHAN**. NOW MY NEW NAME IS **SHAILA JABIN FIROZ KHAN.**
**ADD :** GANDHI CHOWK KIRATPURA SADAR NAGPUR 440001

MY OLD NAME WAS **PATEL SHIVAM PARESH**. NOW MY NEW NAME IS **PATEL SHIVAM PARESHBHAI.**
**ADD :** PATEL KHADKI, ANKHDOL, TAL- NADIAD, DIST- KHEDA, 387355.

MY OLD NAME WAS **PARESHKUMAR RAMANBHAI PATEL**. NOW MY NEW NAME IS **PARESHBHAI RAMANBHAI PATEL.**
**ADD :** PATEL KHADKI, ANKHDOL, TAL- NADIAD, DIST- KHEDA, 387355.

MY OLD NAME WAS **RAHENUMA PAIKAR HAROON KHAN**. NOW MY NEW NAME IS **RAHENUMA TABISH RAZA.**
**ADD :** F.NO.102,FIRST FLOOR, NEAR BLUE DIAMOND SCHOOL, BORGAON ROAD AMAN VISTA,YOGENDRA NAGAR, NAGPUR - 440013.

MY OLD NAME WAS **AQUIB SHEIKH MATIN SHEIKH MOBIN**. NOW MY NEW NAME IS **SHEIKH AKIB SHEIKH MATIN.**
**ADD :** NAGPUR PIN CODE 440035

MY OLD NAME WAS **FIRDOSH PARVEEN**. NOW MY NEW NAME IS **FIRDOSH PARVEEN RAYEEN MOHAMMED HAROON RAYEEN.**
**ADD :** PLOT NO 98 NEW SHUKRAWARI NEAR SHIV MANDIR MAHAL NAGPUR 440032

MY OLD NAME WAS **MOHAMMAD HAROON NIYAZ AHMED**. NOW MY NEW NAME IS **MOHAMMED HAROON RAYEEN NIYAZ AHMED RAYEEN.**
**ADD :** PLOT NO 98 NEW SHUKRAWARI NEAR SHIV MANDIR MAHAL NAGPUR 440032



## -: जाहीर सूचना :-

**विद्यमान कोर्ट २ रे सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, रामटेक**

प्रकरण क्रमांक : M.J.C. No. 16/2025
प्रक्रिया क्र. २२२४ निश्चित दिनांक : ३१/१२/२९२५
अर्जदार : श्री. सतीश बंडु भरडे, वय-२६ वर्षे, व्यवसाय - शेती, रा.पो. बोरडा, ता. रामटेक, जि. नागपूर
प्रतिवादी : नाही
मृत व्यक्तिचे नांव : दिवंगत अनुसया बंडु भरडे, ज्यांचे निधन दिनांक ०६/०६/२०१३ रोजी रा. बोरडा, ता. रामटेक, जि. नागपूर येथे झाले.

वरील अर्जदाराने बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट तखखख च १८२७ अंतर्गत या माननीय न्यायालयाकडे वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. अर्जदार हा मृतक अनुसयाबाई भरडे यांचा कायदेशीर वारस असल्याचे नमूद करण्यात आले आहे.
ही जाहीर सूचना सर्वांना कळविण्यात येते की, जर कोणास या अर्जदाराच्या हक्काबाबत हरकत असेल, तर त्यांनी दिनांक ३/११/२०२५ रोजी, वेळ ११ वाजता, २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, रामटेक येथे हजर राहून आपली हरकत दाखल करावी.
जर ठरलेल्या तारखेपर्यंत कोणतीही समाधानकारक हरकत दाखल झाली नाही, तर अर्जदाराच्या दाव्याची चौकशी करून योग्य वाटल्यास व कायद्यानुसार पात्र असल्यास अर्जदारास वारस प्रमाणपत्र मंजूर करण्यात येईल.
माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिनांक १/१०/२०२५

अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर रामटेक



## जाहिरनामा / सायटेशन नोटीस

**कोर्ट विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश क- स्तर कामठी यांचे न्यायालय, कामठी, जि. नागपूर**

एम.जे.सी. क्र. ७५/२०२५ प्रोसेस क्र. १२८२/२०२५
पे.ता. ०१-११-२०२५ दिनांक ०१/१०/२०२५

Applicant : 1) Darpan S/o Naaresh Parashar, Aged 27 years, Occu. Private, R/o. Suman Vihar, Bhilgaon, Tah. Kamptee, Dist. Nagpur.
V/S Non Applicant : NIL

मयत Late Shri Shashi s/o Naresh Parashar, मयत दि. १४/०१/२०२५ R/o. Suman Vihar Society, Bhilgaon, Tah. Kamptee, Dist.
सदरहू अर्जदारांने वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरिता बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये मयत Late Shri Shashi s/o Naresh Parashar, मयत दि. १४/०१/२०२५ R/o. Suman Vihar Society, Bhilgaon, Tah. Kamptee, Dist. Nagpur. यांचे वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरिता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्या अर्जाच्या सुनावणीची तारी कोर्ट विद्यमान सहदिवाणी न्यायाधीश क. स्तर कामठी यांनी दि. ०१/११/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजत ठरविली आहे. या जाहीर नोटीसद्वारे सर्व संबंधितांना नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, जर अर्जदार कळवाव्या आणि ह्या लेखवरुन असे कळविण्यात येते की जर सदरहू मुदतीत कोणी योग्य त कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदारास Late Shri Shashi s/o Naresh Parashar मयत दि. १४/०१/२०२५ R/o. Suman Vihar Society, Bhilgaon, Tah. Kamptee, Dist. Nagpur. यांचे वारसान प्रमाणपत्र मजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
आज दि. ०१/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, कामठी


# विद्यापीठ कर्मचारी संघटनेची उच्च शिक्षण सहसंचालकांसोबत बैठक

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ३ :
संयुक्त संघर्ष कृती समिती तर्फे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ परिक्षेत्रातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत स्थानिक उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. अभय खांबोरकर यांच्या दालनात बैठक पार पडली. बैठकीत शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या प्रलंबित मागण्या तातडीने पूर्ण कराव्यात, अशी मागणी यावेळी समितीतर्फे उच्च शिक्षण सहसंचालकांना करण्यात आली.महाविद्यालयीन शिक्षकांच्या स्थान निश्चिती व वेतन निश्चिती बाबत कार्यवाही करणे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित वेतन प्रकरणांवर तोडगा काढणे, डीसीपीएस/एन. पी. एस. धारक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कपातीसंदर्भातील हिशेबाच्या पावत्या देणे, विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या थकबाकी व प्रलंबित सेवानिवृत्ती प्रकरणे तातडीने निकाली काढणे, विद्यापीठातून सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना उपदानाची देय रक्कम तत्काळ मंजूर करणे, विद्यापीठातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे रजारोखीकरण प्रकरणे तात्काळ निकाली काढणे, विद्यापीठातून सेवानिवृत्त शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ८०% ग्रॅज्युटी रक्कम तात्काळ अदा करणे, शासन निर्णय दिनांक २२ सप्टेंबर २०२४ अन्वये प्रयोगशाळा सहाय्यकांना लागू करण्यात आलेल्या ४२०० व ४३०० वेतनश्रेणींची अंमलबजावणी करणे आदी मागण्या सदर बैठकीत मांडण्यात आल्या. यावेळी उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. अभय खांबोरकर यांनी देखील सर्व मागण्यांवर तातडीने कार्यवाही करून प्रलंबित प्रश्न मार्गी लावले जातील, असे आश्वासन दिले. बैठकीला सहसंचालक कार्यालयातील प्रशासन अधिकारी डॉ. प्रभु दवणे, श्री. राठोड, सौ. पूजा बुल तसेच संयुक्त संघर्ष कृती समिती तर्फे अध्यक्ष डॉ. आर. डी. सिकची, सचिव डॉ. प्रवीण सूर्यवंशी, निमंत्रक श्री. अजय देशमुख, डॉ. संतोष ठाकरे, डॉ. नितीन चांगोले, डॉ. रविंद्र मुन्द्रे, श्री. राजाभाऊ बढे, श्री. नरेंद्र घाटोळ, डॉ. सुभाष गावंडे, डॉ. रॉय, श्री. शेख, श्री. विजय चवरे, श्री. संतोष मालधुरे, श्री. इंगोले उपस्थित होते.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९१२२९७००२३/७४४७७३५८५३

# अस्मिता

## कामाचे नियोजन

सगळ्या कामाचा बोजा तुम्ही एकट्याच उचलता आहात असे तुम्हाला वाटते का?आणि त्यामुळे तुम्हाला शारिरीक आणि मानसिक थकवा जाणवतो का ? तुम्ही सतत कामाच्या तणावाखाली असता का ? कामांबद्दल आणि कामे कधी पूर्ण होतील याची चिंता तुम्हाला सतत वाटते का ?असे असेल तर तुमच्या वेळापत्रकातला किती वेळ अनावश्यक जातो, याचा डोळे उघडे ठेवून शोध घ्या. कामांचे स्वरुप आणि ती कामे करण्यासाठी आवश्यक असणारे वेळेचे गणित यांचा ताळमेळ बसवा. साधीसोपी कामे चटकन् आवरुन घ्या. ताबडतोब करावी लागणारी कामे आणि नंतर केली तरी चालणारी कामे यांची वर्गवारी करा. काही कामे इतरांनी म्हणजे कुटंबातील सदस्यांनी वा ऑफिसमधील सहका-यांनी वा हाताखालच्या लोकांनी करण्यासारखी असतील ती त्यांना वाटून टाका. प्रत्येक काम आपल्या अंगावर घ्यायची सवय फारशी चांगली नाही.

**स्किल डेव्हलपमेंट**

दुसऱ्यांवर विश्वास ठेवून कामे करुन घेणे आवश्यक आहे. व्यवस्थापनशास्त्रातील ते एक महत्त्वाचे तंत्र आहे. प्रत्येक लहानसहान काम स्वतः करीत राहिलात तर त्याचा ताण येतो. त्यामुळे कामांची नीट वाटणी करा आणि सोपवलेल्या कामांचा पाठपुरावा करुन ती कामे नीट होत आहेत किंवा नाही याकडे लक्ष द्या. तुम्ही असे केले तर तुम्हाला स्वतःलाच खूप मोकळे वाटेल. ही गोष्ट तुम्ही स्वयंप्राकघरातही तुम्ही



अमलात आणू शकता.अशा पर्यायी व्यवस्थेचा उपयोग करताना थोडा अधिक खर्च करायला किंवा प्रसंगी वरिष्ठांशी किंवा कुटुंबियांशी बोलून दुसरी व्यवस्था करायला मागेपुढे पाहू नका. सर्वात महत्त्वाचे म्हणजे कामे करणा-या माणसाचे अगदी मोकळ्या मनाने कौतुक करा. कौतुक केल्यामुळे काम करणारी व्यक्ती दुप्पट जोमाने कामाला लागेल हे कधीही विसरु नका.





**१९९० मध्ये चंद्रशेखर सरकार असताना भारतावर सोने गहाण ठेवण्याची वेळ आली होती. ते वाचताना गीता यांना धक्का बसला आणित्यांनी अर्थतज्ज्ञ होण्याचे निश्चि त केले. गीता यांनी पदवीपर्यंतचे शिक्षण भारतातच घेतले. दि स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून त्यांनी एम.ए.ची पदवी घेतली. पुढे प्रिन्स्टन विद्यापीठातून अर्थशास्त्रात पीएच.डी. केली.**

## भारतीय अर्थतज्ज्ञ

**मानिनी**

गीता गोपीनाथ यांचा जन्म कर्नाटकात झाला. परंतु हे कुटुंब मूळ केरळचे.लहानपणापासूनच गीताअत्यंत अभ्यासू आणि बुद्धिमान होत्या. १९९० मध्ये चंद्रशेखर सरकार असताना भारतावर सोने गहाण ठेवण्याची वेळ आली होती. ते वाचताना गीता यांना धक्का बसला आणित्यांनी अर्थतज्ज्ञ होण्याचे निश्चि त केले. गीता यांनी पदवीपर्यंतचे शिक्षण भारतातच घेतले. दि स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून त्यांनी एम.ए.ची पदवी घेतली. पुढे प्रिन्स्टन विद्यापीठातून अर्थशास्त्रात पीएच.डी. केली. त्यांच्या शिक्षणाच्या काळातच त्यांनी जागतिक अर्थशास्त्र आणि वित्तीय धोरणे या विषयावर विशेष लक्ष केंद्रित केले होते.करिअरच्या सुरुवातीला त्यांनी अमेरिकेतील विविध प्रतिष्ठित विद्यापीठांमध्ये प्राध्यापक म्हणून काम केले.त्या काळात त्यांनी जागतिक आर्थिक विकास, चलनवाढ, वित्तीय स्थिरता आणि जागतिक बाजार यावर संशोधन केले. त्यांच्या संशोधनात जागतिक आर्थिक संकटे कशी टाळता येतील याविषयीचे संशोधन अत्यंत महत्वाचे ठरले. तसेच कोरोना जागतिक महामारीनंतरचे आर्थिक पुनरुत्थान या विषयांवरीलत्यांचे संशोधन जागतिक आर्थिक धोरणासाठी मार्गदर्शक ठरले. २०१४ मध्ये जगातील निवडक २५ तरुण अर्थतज्ज्ञांमध्ये गीता यांची निवड झाली होती.२०२२ मध्येगीता गोपीनाथ यांचीआंतरराष्ट्रीय नाणेनिधी मध्ये मु'य अर्थशास्त्रज्ञ म्हणून नियुक्ती झाली. या पदावर बसलेल्या त्या पहिल्या भारतीय महिला आहेत.



जागतिक नाणेनिधीमध्ये काम करीत असताना त्यांनी जगातील १९० पेक्षा जास्त देशांच्या आर्थिक धोरणांचे विश्लेषण केलेआणि जागतिक आर्थिक धोरणात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली नाणेनिधीने अनेक देशांसाठीकर्ज धोरण, चलनवाढ नियंत्रण, आर्थिक पुनरुत्थान योजनातयार केल्या. त्यामुळे जागतिक आर्थिक संकटे टाळता आली.गीता वेगवान आर्थिक सुधारणांना अग्'क्'म देतात. त्यांचे काम केवळ आर्थिक विश्लेषणापुरते मर्यादित नाही. जागतिक आर्थिक धोरणावर स'ा देणे, वित्तीय स्थिरता सुनिश्चित करणे आणि जागतिक बाजारातील अस्थिरतेवर उपाय शोधणे यामध्ये त्यांचे मोठे योगदान आहे. त्यांच्या या कार्यासाठी त्यांना जागतिक स्तरावर अनेक सन्मान मिळाले आहेत. गीता गोपीनाथ या आर्थिक क्षेत्रातीलस्त्रियांसाठी प्रेरणास्थान मानल्या जातात.

## तेलकट त्वचा असेल तर...

**ब्युटी टॉक**

विशेष प्रसंगी प्रत्येकीलाच मेक अप करावासा वाटतो. पण तेलकट त्वचेवर मेक अप फार टिकत नाही. या महिलांनी तेलकट त्वचेसाठी योग्य अशी सौंदर्यप्रसाधनं खरेदी करायला हवीत. इतकंच नाही, तर त्वचा मेक अपच्या दृष्टीने तयार करायला हवी. विशिष्ट तंत्राचा वापर केल्यास मेक अप पसरणार नाही. तेलकट त्वचा असणाऱ्यांसाठी या मेक अप टिप्स...

- त्वचेला मेक अप रेडी करण्यासाठी क्लिंजिंग, टोनिंग, मॉइश्चरायझिंगचा फॉर्म्युला वापरा. सॅलिसिलिक ॲसिडयुक्त क्लिंजरचा वापर योग्य ठरतो. यामुळे त्वचेतलं अतिरिक्त तेल शोषलं जातं. तुम्ही वॉटरबेस्ड मॉइश्चरायझरचा वापर करा.



- कोणतीही कॉस्मेटिक प्रोडक्ट्स लावण्याआधी प्रायमरचा वापर करायला विसरू नका. क्लिंजिंग, टोनिंग आणि मॉइश्चरायझिंग या टप्प्यांनंतर चेहऱ्याला प्रायमर लावा. प्रायमरमुळे त्वचेचा तेलकटपणा कमी व्हायला मदत होते.
- बाजारात विविध प्रकारची फाउंडेशन्स मिळतात. तेलकट त्वचेसाठी योग्य फाउंडेशन विकत घ्या. स्कीन टाईप आणि स्कीन टोन या दोन्ही गोष्टी विचारात घेऊन फाउंडेशन विकत घ्या. क्रीम बेस्ड फाउंडेशन वापरु नका. फाउंडेशन लावण्याआधी त्यात थोडं मॉईश्चरायझर मिसळा. फाउंडेशन लावल्यानंतर ओलसर स्पंजने ब्लेंडिंग करा.
- फाउंडेशन लावल्यानंतर कॉम्पॅक्ट पावडरचा वापर करायला हवा. पावडरमुळे मेक अप नीट सेट होतो. कॉम्पॅक्ट पावडर खरेदी करताना स्कीन टोन आणि स्कीन टाईपचा विचार करा.
- सगळा मेक अप पूर्ण झाल्यानंतर मेक अप सेटिंग स्प्रेचा वापर करा. या स्प्रेमुळे मेक अप बराच काळ टिकून राहतो.

## ट्रेंडी डेनिम स्टाईल

**स्टाईल स्टेटमेंट**

कम्फर्ट आणि स्टायलिंग या दोहोंचा संगम डेनिम्समुळे साधता येतो. एके काळी डेनिम्स म्हणजे फक्त जीन्स होत्या. मग फॅशनच्या क्षेत्रात बदल झाले. डेनिम्सपासून विविध प्रकारचे पेहराव तयार केले जाऊ लागले. महिलांसाठी जीन्ससह डेनिम जॅकेट, कुर्ता, स्कर्ट असे पर्याय उपलब्ध झाले. डेनिम्स फक्त कॅज्युअल ऑकेजनलाच नाही तर पार्टी, मिटिंग अशा प्रसंगी कॅरी करता येतात. डेनिम्ससोबत तुमचा लूक खुलू शकतो. डेनिम्स कॅरी करण्याच्या या खास टिप्स...

- ऑफिसमध्ये स्मार्ट आणि कॉन्फिडंट दिसण्यासाठी व्हाईट फॉर्मल शर्ट आणि ब्लू जीन्स घाला. त्यावर बॉक्स ब्लेझर कॅरी करा. आपल्या लूकला चार चांद लावण्यासाठी ब्लॉक हिल्स घाला. ऑफिसमधल्या कॅज्युअल डे ला जीन्स टी शर्ट किंवा टॉप तसंच डेनिम जॅकेट घाला. जीन्स टी शर्ट जास्तच कॅज्युअल वाटत असेल तर डेनिम कुर्त्यावर पलाझो किंवा पँट घाला.
- एखाद्या पार्टीतही डेनिम कॅरी करता येईल. डेनिम ड्रेसेसही मिळतात. मित्रमैत्रिणींची पार्टी असेल तर तुम्ही लाँग डेनिम शर्ट ड्रेस कॅरी करु शकता. हा शर्ट ड्रेस लेगिंग्जसोबत पेअर करता येईल. ऑफिस पार्टीमध्ये डेनिम जंपसूट घालता येईल. सध्या पूर्ण बाह्यांच्या जंपसूटपासून ऑफ स्लीव्ह जंपसूट ट्रेंडमध्ये आहे. थंडीत जंपसूटसोबत ओव्हरसाईज्ड डेनिम जॅकेट कॅरी करता येईल.
- भटकंतीला जायचं असेल तर जीन्स आणि डेनिम जॅकेट कॅरी करा. जीन्सवर राउंड नेक टी शर्ट घाला. त्यावर ओव्हरसाईज्ड डेनिम जॅकेट किंवा लाँग शर्ट घाला.



## अननसाच्या पाण्यामुळे...

**डाएट अँड न्यूट्रिशन**

आहाराचा, आहारपद्धतीचा शरीरावर, आरोग्यावर परिणाम होत असतो. वेगवेगळ्या पद्धतींनी तंदुरुस्त राहता येतं. अननसाचं पाणी पिऊन तुम्ही निरोगी राहू शकता. एका भांड्यात पाणी घ्या. त्यात अननसाचे तुकडे घाला. थोडी पुदिन्याची पानं घाला. हे पाणी आठ ते दहा तास किंवा रात्रभर ठेऊन द्या. सकाळी पाणी गाळून घ्या. अननसाचं पाणी प्यायल्याने बरेच लाभ होतील.

- अननसातल्या आयोडिन आणि ब्रोमेलेनमुळे थायरॉइड ग्रंथींचं कार्य सुधारतं.
- अननसामुळे शरीरातलं अतिरिक्त पाणी बाहेर पडतं. शरीरात पाणी साचून रहात नाही. तसंच यामुळे चयापचय क्रिया सुधारते. शरीरातली अतिरिक्त चरबी कमी व्हायलाही मदत होते. त्यामुळे वजन कमी करणाऱ्यांनी अननसाचं पाणी प्यायला हवं.
- अननसाच्या पाण्यात बिटा-केरोटिन हा घटक असतो. यामुळे दृष्टी सुधारते.
- या पाण्यामुळे आतड्यातले किडे, जंतू मरून जातात आणि आतड्यांचं आरोग्य सुधारतं.



- यातल्या कॅल्शियममुळे हाडांना आणि दातांना बळकटी मिळते.
- अननसातल्या ब्रोमोलेन या घटकामुळे पचनशक्ती सुधारते.



## तिळाचं पुडिंग

**रसगंधा**

आपण तिळाच्या वड्या, लाडू खातो. यासोबतच तिळाचा वापर करून अजून एक चविष्ट पदार्थ बनवता येईल. पाहुण्यांसाठी किंवा सहज म्हणून एखादं डेझर्ट बनवायचं असेल तर तिळाचं पुडिंग करून बघायला हरकत नाही.

**साहित्य:** अर्धा कप भाजलेले तीळ, अर्धा कप दाण्याचं कूट, अर्धा कप ब्राउन शुगर, एक चमचा व्हॅनिला इसेन्स, अर्धा कप नारळाचं दूध, दोन चमचे कॉर्न फ्लोर, पाव कप किसलेलं खोबरं आणि मीठ


**कृती:** एका भांड्यात दोन कप पाणी घ्या. त्यात थोडं मीठ घाला. हे पाणी गरम करून घ्या. यात तीळ आणि दाण्याचं कूट घालून पाच मिनिटं उकळून घ्या. यात ब्राउन शुगर आणि व्हॅनिला इसेन्स घाला. एका वाटीत थोडं पाणी घ्या. त्यात कॉर्न फ्लोर घालून पेस्ट करून घ्या. हे कॉर्न फ्लोर भांड्यातल्या साहित्यात घाला. हे साहित्य घट्ट होईपर्यंत दहा मिनिटं शिजवून घ्या. थोडं थंड होऊ द्या. तिळाचं पुडिंग तयार आहे. पुडिंगचे त्रिकोणी किंवा चौकोनी तुकडे करा. त्यावर खोबरं घाला आणि मस्तपैकी खा.

## मुलालाही मानसिक आजार असेल का?

**काय करू?**

मी ४३ वर्षांची विवाहित महिला आहे. माझ्या पतीला स्किझोफ्रेनिया आहे. लग्नाआधी मला या गोष्टीची कल्पना नव्हती. बऱ्याच तपासण्या केल्यानंतर त्यांना 'स्किझोफ्रेनिया' असल्याचं निदान झालं. मधल्या काळात आम्हाला मुलगा झाला. आता तो वयात आला आहे. पतीच्या मानसिक स्थितीमुळे मी खूप तणावाखाली असते. पण आता माझा मुलगाही विचित्र वागू लागला आहे. तो बरेचदा स्वतःला खोलीत बंद करून घेतो. काही तास बाहेर येतच नाही. किशोरवयीन मुलं असं वागतात, म्हणून सुरुवातीला मी त्याच्या वागण्याकडे दुर्लक्ष केलं. पण स्किझोफ्रेनिया हा विकार अनुवंशिक असल्याचं कळल्यानंतर मी खूप घाबरून गेले आहे. मी काय करू?

- स्किझोफ्रेनिया अनुवंशिक आहे. पण तुमच्या मुलाला हा आजार आहे किंवा नाही याचं निदान मानसोपचार तज्ज्ञच करू शकेल. मानसिक आजार जडलेल्या सदस्याला सांभाळणं खूप कठीण असतं. तुम्ही मुलासोबत एखाद्या मानसोपचार तज्ज्ञांना भेटा. त्यांच्याकडून तुम्हाला योग्य मार्गदर्शन मिळेल. स्किझोफ्रेनिया अनुवंशिक असला तरी तुमच्या मुलाला ही समस्या असेलच असं नाही. तुम्ही एखाद्या मनसोपचार तज्ज्ञाला भेटून सद्य परिस्थिती हाताळण्याचं मार्गदर्शनही घेऊ शकता. मानसिक आजारांबाबत जागरूकता निर्माण करणाऱ्या हेल्पलाईन्स आहेत. त्यांचीही



मदत घेता येईल. उपचार आणि थेरपी या दोन बाबी सर्वात महत्त्वाच्या आहेत हे लक्षात ठेवा. तसंच स्वतःची काळजी घ्यायला विसरू नका.

## करा मशरूम्सची लागवड

**परसबाग**

मशरूम्स सध्या बरेच लोकप्रिय झाले आहेत. तुम्ही घरी मशरूम्सची शेती करू शकता. यातून उत्पन्नही मिळवता येतं. मशरूम्सची लागवड करण्यासाठी काय करायला हवं याविषयी...

पहिल्यांदाच मशरूम्सची लागवड करणार असाल किंवा घरी मशरूम्स लावायचे असतील तर प्राथमिक टप्प्यापासून सुरुवात करा. ऑयस्टर मशरूम्सपासून सुरुवात करा. ऑयस्टर मशरूम्समध्ये भरपूर पोषक घटक असतात. यातून तुम्हाला आवश्यक ती प्रथिनंही मिळू शकतात. ऑयस्टर मशरूम्सना खूप कमी जागा लागते. त्यामुळे घरातही त्यांची लागवड करता येते. अंधाऱ्या खोलीत किंवा एखाद्या कपाटातही मशरूम्सची लागवड करता येईल.

मशरूम्सची लागवड फार खर्चिक नसते. अगदी कमी खर्चात मोठ्या प्रमाणावर मशरूम्सची



लागवड करता येईल. फक्त ३०० रुपये खर्च करून दोन ते अडीच किलो मशरूम्सची लागवड करता येईल. एवढे मशरूम्स बाजारातून आणण्यासाठी १२०० रुपये मोजावे लागतील. मशरूम्समध्ये भरपूर प्रमाणात प्रथिनं, खनिजं आणि पोषक घटक असतात. तुमच्याकडे पुरेसा वेळ आणि संयम असेल तर मशरूम्सची लागवड करायला हरकत नाही.

**हेअर केअर**

### केस करा काळे

केस गळणं आणि पांढरे होण्याची समस्या असेल तर कॉफी हेअर मास्क वापरून बघा. दही, कॉफी पावडर आणि खोबरेल तेल अशा तीन घटकांनी हा मास्क तयार करता येईल. त्यासाठी तीन ते चार चमचे दही घ्या. त्यात दीड कप कॉफी आणि एक चमचा खोबरेल तेल घाला. हे सर्व घटक नीट मिसळून घ्या. हा हेअर मास्क केसांवर लावा. दही आणि खोबरेल तेलामुळे केसांना लाभ होतो. शिवाय कॉफीमधलं कॅफेन कोंडा कमी करतं. तसंच केस छान वाढू लागतात. या मास्कमुळे केस छान मुलायम आणि चमकदार दिसतात.



**लाईफस्टाईल**

### आंघोळ राजेशाही थाटाची!

तुम्हाला राजेशाही थाटात किंवा एखाद्या सेलिब्रिटीप्रमाणे आंघोळ करायची असेल तर बाथ बम्सचा वापर करता येईल. घरातच स्पाची अनुभूती घ्यायची असेल तर हे बम्स विकत आणा. हे बम्स वेगवेगळे रंग, आकार आणि प्रकारांमध्ये मिळतात. हे बम्स पाण्यात टाकल्यानंतर पाण्याचा रंग बदलू लागतो. पाण्यात रंगीबेरंगी बुडबुडे तयार होतात. हे बम्स मॉईश्चरायझिंग ऑईल्स तसंच त्वचेला पोषण देणाऱ्या घटकांनी बनलेले असतात. त्यामुळे याचे कोणतेही दुष्परिणाम होत नाहीत.



**स्मार्ट शॉपिंग**

### कोणते ओट्स घ्यावेत?

ओट्स हे धान्य मोठ्या प्रमाणावर वापरलं जातं. ओट्सपासून विविध पदार्थ तयार करता येतात. बाजारात वेगवेगळ्या प्रकारचे ओट्स मिळतात. त्यामुळे कोणते ओट्स घ्यावेत असा प्रश्न तुम्हाला पडतो. स्टील कट ओट्स तांदळाच्या तुटलेल्या दाण्यासारखे दिसतात. त्यावर फार प्रक्रिया केलेली नसते. रोल किंवा होल ओट्सवर थोडी प्रक्रिया केलेली असते. इन्स्टंट ओट्सवर सर्वाधिक प्रक्रिया केली जाते. पण या ओट्समधले पोषक घटक अजिबात कमी होत नाहीत. सकाळच्या वेळी काही तरी झटपट खायचं असेल तर तुम्ही हे ओट्स विकत घेऊ शकता.



**किचन टिप्स**

### वापरा ही भांडी

अन्न शिजवण्यासाठी विविध धातूंच्या भांड्यांचा वापर होतो. अगदी स्टीलपासून ॲल्युमिनियमपर्यंत तसंच नॉन स्टीक भांड्यांपर्यंत विविध प्रकारच्या भांड्यांमध्ये अन्नपदार्थ शिजवले जातात. स्टील, ॲल्युमिनियमसोबतच तुम्ही लाकूड, तांब्याच्या भांड्यांचा वापर करू शकता. लाकडी चमचे तसंच कटलरी वापरता येईल. लाकडावर बॅक्टेरिया अधिक वेगाने आणि लवकर नष्ट होतात. तसंच नॉनस्टीक भांड्यांसाठी लाकडी चमचे वापरणं योग्य ठरतं. पाणी ठेवण्यासाठी तांब्याची भांडी वापरता येतील. लोखंडी कढया, तवे यातून तुम्हाला लोह मिळू शकतं. शारीरिक क्षमता आणि प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी पितळी भांडी वापरता येतील.



# देशासाठी जे हवे ते बनले पाहिजे

## संघाच्या विजयादशमी उत्सवात मोहन भागवत यांची अपेक्षा
## देश विदेशातील पाहुणे उपस्थित

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :** भाषणे देणाऱ्यांनाही त्यांचे जीवन बदलावे लागेल. त्यांना एक आदर्श ठेवावा लागेल. आपल्याला असे नेतृत्व हवे आहे जे समाजाला स्वतःचे मानते. वैयक्तिक विकासामुळे सामाजिक बदल घडतात आणि सामाजिक बदलामुळे व्यवस्था बदलते हे आरएसएसने अनुभवले आहे. सवयी बदलल्याशिवाय बदल येऊ शकत नाही. तुम्हाला तुमच्या देशासाठी जे हवे आहे ते बनले पाहिजे. आरएसएसची शाखा ही सवयी बदलण्याचा एक मार्ग आहे, असे प्रतिपादन आरएसएस प्रमुख मोहन भागवत यांनी केले. संघाच्या विजयादशमी उत्सवात ते बोलत होते.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, घाना आणि इंडोनेशियातील पाहुणे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह निमंत्रीत मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी, भागवत यांनी संघाचे संस्थापक डॉ. हेडगेवार यांना श्रद्धांजली वाहिली आणि नंतर शस्त्रपूजन केले. आपल्या ४१ मिनिटांच्या भाषणात त्यांनी समाजात होत असलेले बदल, सरकारांचा दृष्टिकोन, लोकांमधील अशांतता आणि शेजारील देशांमध्ये सुरू असलेल्या अशांततेचा उल्लेख केला.

ते म्हणाले, प्रत्येक राष्ट्राची स्वतःची जीवनशैली होती. समाज सर्वत्र संपला आहे, परंतु तो अजूनही भारतात सुरू आहे. समाजाच्या कृतींमुळे मानव आकार घेतात. आरएसएसने १०० वर्षांत सर्वकाही पाहिले आहे, राजकारणात प्रवेश करण्यासाठी त्यांना आमंत्रित केले गेले होते, परंतु ते तसे झाले नाही. स्वयंसेवकांनी नेहमीच शाखा चालवली आहे. सवयी तयार केल्या पाहिजेत, परंतु त्या सोडल्या जाऊ नयेत.

मोहन भागवत यांनी सांगितले की, पहलगाम हल्ल्यात दहशतवाद्यांनी हिंदूंना त्यांचा धर्म विचारून मारले. आमच्या सरकारने आणि सैन्याने त्यांना प्रत्युत्तर दिले. या घटनेने आम्हाला मित्र आणि शत्रू यांच्यात फरक करायला शिकवले.

आम्हाला आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये विवेकी राहावे लागेल. या घटनेने आपल्याला शिकवले की आपल्या मनात सर्वांबद्दल मैत्रीपूर्ण भावना असल्या तरी, आपल्याला स्वतःच्या सुरक्षेसाठी अधिक सतर्क आणि सक्षम राहावे लागेल.

आरएसएस प्रमुख म्हणाले, शाखा स्वयंसेवकांमध्ये राष्ट्रभक्ती वाढवतात. कोणत्याही देशाला हे साध्य करण्यासाठी, समाजात एकता असणे आवश्यक आहे. आपला देश विविधतेचा देश आहे. पूर्वी परकीयांनी भारतावर आक्रमण केले. येथील लोकांनी त्यांच्या परंपरा स्वीकारल्या. ब्रिटिश निघून गेले, परंतु काही परंपरा कायम राहिल्या. आता आपण त्या परंपरांचा आदर करतो. आपण त्यांना परके मानत नाही.

आपण जगातील सर्व परंपरांचे स्वागत करतो. आज आपल्या देशात या विविधतेचे विभाजनात रूपांतर करण्याचा प्रयत्न केला जात आहे. आपण एक आहोत; एकतेसाठी आपल्यात आदरयुक्त संवाद आवश्यक आहे.

प्रत्येकाचे स्वतःचे प्रार्थनास्थळ आहे. त्यांचा आदर केला पाहिजे. येथे, प्रत्येकजण एकत्र राहतो; जसे एकत्र ठेवलेली भांडी आवाज करतात. समाजात इतके लोक आहेत की, जर छोट्या छोट्या गोष्टींवरून काही घडले आणि ते रस्त्यावर पडले तर ते योग्य नाही.

सरकार आणि प्रशासन पक्षपात न करता त्यांचे काम करत असतात, परंतु समाजातील तरुण पिढीने जागरूक राहिले पाहिजे, कारण हे अराजकतेचे व्याकरण आहे आणि ते थांबवले पाहिजे. आपल्या एकतेचा आधार आपली विविधता आहे. भारताचे वैशिष्ट्य म्हणजे तो सर्वांचा समुदाय आहे.

भागवत म्हणाले, जगात अशांतता आणि अशांतता आहे आणि या दरम्यान, जग भारताकडून अपेक्षा करत आहे. नियतीलाही भारताने उपाय शोधण्याची इच्छा आहे. भारत त्यांना मार्गदर्शन करेल.

जगाच्या व्यवस्थेत बदलाची आवश्यकता आहे, परंतु प्रत्येकजण पुढे जात आहे. जर आपण अचानक मागे वळलो तर वाहन उलटेल. म्हणून, आपण हळूहळू, टप्प्याटप्प्याने मागे वळले पाहिजे. तरच ही व्यवस्था योग्यरीत्या कार्य करेल.

व्यवस्था जशी आहे तशीच चालेल. म्हणून, व्यवस्था बदलू शकेल म्हणून समाजाने बदलले पाहिजे. समाजाने नवीन वर्तनाशी जुळवून घेतले पाहिजे, असेही ते म्हणाले.








राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विजयादशमी उत्सवाला माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिले. संघाच्या शताब्दी स्थापना दिनानिमित्त त्यांचे व्यासपीठावर आगमन हे फक्त औपचारिकतेपुरते मर्यादित नव्हते, तर त्यातून एक मोठा सामाजिक व राजकीय संदेश देण्यात आला.

नागपूरात दाखल झाल्यानंतर त्यांनी प्रथम दीक्षाभूमीला भेट देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन केले. १९५६ मध्ये डॉ. आंबेडकरांनी बौद्ध धर्म स्वीकारलेली हीच ती ऐतिहासिक भूमी. कोविंद यांनी या ठिकाणी प्रार्थना करून नंतर आरएसएसच्या कार्यक्रमाला उपस्थिती लावली.

आपल्या भाषणात त्यांनी आंबेडकर, हेडगेवार, संत तुकाराम, संत रविदास, बिरसा मुंडा आदी समाजसुधारक आणि दलित–महात्म्यांचा उल्लेख करत एकात्मतेचा संदेश दिला.

रामनाथ कोविंद यांनी व्यासपीठावरून सर्वांत जास्त भर दिला तो म्हणजे जातिवाद आणि छुआछूत नसलेला संघ यावर. त्यांनी आपल्या भाषणात संघाने कधीही जातिवादाला खतपाणी घातले नाही, उलट सर्व समाजघटकांना एकत्र आणण्याचे कार्य केले आहे, असा ठाम दावा केला. संघात ऊंच–नीच नाही, छुआछूत नाही. येथे सर्व एकसमान आहेत, असे ते म्हणाले. त्यांनी संघप्रमुख मोहन भागवत यांना दूरदर्शी सामाजिक वैज्ञानिक संबोधत त्यांचे विशेष कौतुक केले.

त्यांनी अटल बिहारी वाजपेयींच्या २००१ च्या लाल किल्ल्यावर झालेल्या दलित संगम रॅलीचा उल्लेख करत सांगितले की, आमचे सरकार मनुस्मृतीवर नाही तर भीमस्मृतीवर म्हणजेच संविधानावर चालते. हा संदेश समाजात पोहोचणे ही आजच्या राजकीय समीकरणात भाजप व संघासाठी अत्यंत महत्त्वाची बाब ठरणार आहे. कोविंद यांचे भाषण हे केवळ औपचारिक नव्हते, तर सामाजिक समरसतेचा आणि राजकीय भविष्याचा संदेश होते. दलित, मागासवर्गीय आणि उपेक्षित घटकांना थेट संबोधित करत त्यांनी संघातील सर्वसमावेशकतेचा गौरव केला. संघ समाजसुधारणेसाठी कायम काम करीत आला आहे आणि पुढेही करीत राहील, असे त्यांनी ठामपणे सांगितले.





## : साप्ताहिक संवाद :
## कर्करोगासाठी महाकेअर फाउंडेशन

लोकरंग

राज्यातील कर्करोगग्रस्तांना दर्जेदार उपचार उपलब्ध व्हावेत, यासाठी सर्वसमावेशक कर्करोग सेवा धोरण निश्चित करण्यात आले असून त्यासाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र कॅंसर केअर अँड एजुकेशन फाउंडेशन अर्थात महाकेअर फाउंडेशन कंपनी स्थापन करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. या कंपनीच्या मध्यमातून राज्यातील १८ रुग्णालयातून कर्करोगाशी निगडित विशेषोपचार उपलब्ध केले जाणार आहेत. यामुळे राज्यात कर्करोगाशी संबंधित दे केअर केंद्रांच्या संख्येत मोठी वाढ होणार आहे. यशाचं अनुषन्गाने राज्य सरकारचे या कँसर प्रकल्पाचे सल्लागार **डॉ. कैलास शर्मा** यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

**महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या महाकेअर फाउंडेशन ची रचना कशी असणार आहे?**

■ महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार कर्करोग रुग्णालयांची संख्या एल १ , एल २, एल ३, अशी त्रिस्तरीय रचना केली आहे. या केंद्राच्या माध्यमातून रेडिओथेरपी, किमोथेरपी तसेच पदव्युत्तर आणि अतिविशेषोपचार शिक्षण सर्व प्रकारच्या कर्करोगाचे निदान शस्त्रक्रिया, भौतिकोपचार, मानसिक आधार आणि उपचार संशोधन यासह पालेटिव्ह उपचार, औषध सुविधा यांची उपलब्धता केली जाणार आहे. यात टाटा स्मारक रुग्णालय हि संस्था एल १ स्तरावरील शिखर संस्था म्हणून निश्चित केली आहे.

छत्रपती संभाजी नगर, चंद्रपूर, नागपूर, जे जे वैद्यकीय महाविद्यालय आणि छत्रपती शाहू महाराज शासकीय रुग्णालय, छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय, बी जे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तसेच आंशिक आणि पुण्यातील ६ शासकीय रुग्णालय एल २ म्हणून निश्चित केली आहेत.

**महाकेअर फाउंडेशनसाठी शासनाने १०० कोटींची तरतूद केलेली आहे त्याबद्दल?**

■ महाकेअर फाऊंडेशनला भागभांडवल म्हणून सुरवातीला १०० कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत कर्करोग रुग्णालयांना मिळणाऱ्या शुल्कापैकी २० टक्के शुल्क महाकेअर फाऊंडेशनला देण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे.

याशिवाय फाउंडेशन क्लिनिकल ट्रायलमधून निधीची उभारणी करण्यात येणार आहे. तसेच या फाऊंडेशनला आवश्यतेनुसार आंतरराष्ट्रीय संस्थामार्फत तसेच देणग्या, अनुदाने, कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी अंतर्गत निधी उभारता येणार आहे. यामुळे फाऊंडेशनला कर्करोगा व्यतिरिक्त वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्य विभागाअंतर्गत इतर प्रकल्पासाठी देखील निधी उभारता येईल.

**राज्यातील कर्करोगग्रस्तांची संख्या किती आणि उपचारांची स्थिती कशी आहे?**

■ वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन विभागातून मिळालेल्या माहितीनुसार राज्यात प्रत्येक वर्षी नव्या १ ते दीड लाख कँसर ग्रस्त रुग्णांची नोंद केली जाते. या रुग्णांना वैद्यकीय उपचार देण्यासाठी सर्वाधिक संख्येने जे कँसर रुग्ण दिसून येतात त्यांच्यासाठी रुग्णालयांमध्ये वैद्यकीय उपचार देण्यात येणार आहेत. राज्यात मुख, गर्भाशय, स्तन व कोलन स्वरूपाच्या कॅन्सरचे रुग्ण सर्वाधिक दिसून येतात. त्यांच्यासाठी वैद्यकीय सुविधांची सोय या रुग्णालयांमध्ये केली जाणार आहे. ■ ■

## इंडियन स्ट्रीट प्रीमियर लीग सीझन ३ भव्य पुनरागमनासाठी सज्ज

सलग दोन यशस्वी हंगामांनंतर, इंडियन स्ट्रीट प्रीमियर लीग (आयएसपीएल) ही भारताची मोठी, चांगली आणि धाडसी अग्रगण्य टेनिस–बॉल टी१० स्पर्धा तिसऱ्या आवृत्तीसाठी परत येत आहे.. आठ संघांचा समावेश असलेली ही स्पर्धा ९ जानेवारी ते ६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत सुरत येथे होणार आहे.




आगामी हंगामातील प्रमुख आकर्षणांपैकी, मोस्ट व्हॅल्युएबल प्लेअर (एमव्हीपी) ला एक नवीन पोर्श ९११ मिळेल, जी जागतिक क्रीडा स्पर्धा आणि बेंचमार्कशी जुळण्यासाठी लीग कशी वाढली आहे हे दर्शवेल.आयएसपीएलच्या कोअर कमिटीचे सदस्य सचिन तेंडुलकर, आशिष शेलार, मीनल अमोल काळे, सूरज समत, लीग ऑपरेशन्सचे अध्यक्ष दीपक चौहान आणि नवीन अहमदाबाद संघाचे मालक सुपरस्टार अजय देवगण यांच्या उपस्थितीत झालेल्या पत्रकार परिषदेत ही घोषणा करण्यात आली.

२०२४ मध्ये स्थापनेपासून, आयएसपीएलने पहिल्या दोन हंगामात उल्लेखनीय यश मिळवले आहे, प्रेक्षकसंख्या आणि स्टेडियममधील उपस्थिती दोन्ही दरवर्षी लक्षणीयरीत्या वाढत आहे. लीगने असे तरुण नायक देखील निर्माण केले आहेत जे पुढे राष्ट्रीय स्टार बनले आहेत. अभिषेक दलहोर, सागर अली, रजत मुंढे, केतन म्हात्रे, जगन्नाथ सरकार आणि फरदीन काझी यांसारखे प्रतिभावान खेळाडू दरवर्षी प्रसिद्धीचे केंद्र बनले.

सीझन ३ मध्ये एक विस्तारित स्पर्धा असेल ज्यामध्ये विद्यमान रोस्टरमध्ये दोन नवीन संघांचा समावेश असेल. अहमदाबाद आणि दिल्ली आयएसपीएल कुटुंबात सामील झाले आहेत, सुपरस्टार अजय देवगण आणि सलमान खान हे संबंधित संघ मालक आहेत. चाचण्यांचे वेळापत्रक देखील जाहीर करण्यात आले, ज्यामुळे हजारो इच्छुक खेळाडूंना त्यांची प्रतिभा दाखवण्यासाठी, स्पर्धा करण्यासाठी आणि लीगमध्ये स्थान मिळविण्यासाठी एक व्यासपीठ मिळाले.

या कार्यक्रमात अधिकृत गट सोडतींचे अनावरण देखील करण्यात आले, ज्यामुळे एका तीव्र आणि मनोरंजक स्पर्धेसाठी पाया तयार झाला. सीझन ३ मध्ये आधीच ४.३ दशलक्षाहून अधिक खेळाडू नोंदणी नोंदल्या गेल्या आहेत. ■ ■




## गोव्याचे म्हापसा मार्केट

गोवा त्याच्या समुद्रकिनाऱ्यांसाठी जगभरात प्रसिद्ध आहे, त्यातील प्रमुख आर्थिक स्त्रोत पर्यटन आहे. उत्तर गोवा हे पार्टीचे केंद्र आणि हिप्पी नंदनवन मानले जाते. तथापि, त्या क्षेत्रापेक्षा बरेच काही आहे . पंजीममधील या क्षेत्राच्या लक्षवेधी मुल्यामुळे अलिकडच्या वर्षांत लोकप्रियतेत वाढ झाली आहे.

गोव्यातील सर्वात छान, रंगीबेरंगी इमारतींनी नटलेल्या अरुंद गल्ल्यांचा हा एक गजबजलेला परिसर आहे, जो राज्याच्या स्थापत्य कलेवर पोर्तुगीज स्थापत्यशास्त्राच्या प्रभावाचे वास्तविक जिवंत प्रतिनिधित्व आहे. दिवसभर, येथे फोटो काढणारे तरुण छायाचित्रकार मोठ्या संख्येने असतील. म्हणूनच, जर तुम्हाला तुमच्या सोशल मीडियासाठी आदर्श फोटो हवा असेल तर हे ठिकाण आहे. अंजुना बीचवरील हा फ्ली मार्केट प्रत्येक बुधवारी जिवंत होतो आणि संपूर्ण गोव्यातील सर्वात मोठ्या बाजारपेठांपैकी एक मानला जातो.

या समुद्रकिनारी असलेल्या बाजारपेठेसाठी, तुम्ही नेपाळी आणि तिबेटी हस्तकला तसेच स्मृतीचिन्हे, निक्कनॅक, दागिने, बीचवेअर, वॉल हँगिंग्ज आणि इतर वस्तू नाममात्र किमतीत मिळवू शकता.

याव्यतिरिक्त, बाजार आणि त्याच्या आजूबाजूच्या परिसरात अनेक खाद्यपदार्थ विक्रेते, शरीर छेदन करणारी दुकाने, थेट संगीत आणि इतर प्रकारचे मनोरंजन देखील समाविष्ट आहे.

म्हापसा मार्केट हा संपूर्ण गोव्यातील सर्वात महत्त्वाचा व्यावसायिक आणि किरकोळ जिल्हा आहे आणि आहे. शुक्रवारी, हे स्थान गजबजलेल्या बाजारपेठेत बदलते जेथे ग्राहकांना गोव्याच्या बाजारात खरेदीचे अस्सल आकर्षण अनुभवता येते. या ठिकाणी तुम्ही ताजी फळे आणि भाज्यांपासून फॅशनेबल ॲक्सेसरीज आणि कपड्यांपर्यंत विविध प्रकारच्या वस्तू खरेदी करू शकता. ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## जरांगे मनोरुग्ण
### लक्ष्मण हाकेंची टीका

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ३ :** ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी शुक्रवारी पुन्हा एकदा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्यावर निशाणा साधला आहे. मनोज जरांगे हा एक मनोरुग्ण माणूस आहे. मराठा समाजाने असा मूर्ख माणूस आपला नेता म्हणून कसा निवडला हेच समजत नाही, असे ते म्हणालेत.



हाके म्हणाले, रुग्णालयात असणारा माणूस नारायण गडावर जातो आणि तास दीड तास भाषण करतो. तो तिसरी - चौथी शिकलेला माणूस आहे. मुख्यमंत्र्यांनी त्याला पाचवी - सहावीला मुक्तविद्यापीठात वगैरे सोय करावी. मग त्याला महाराष्ट्र म्हणजे काय? कळेल, असा टोला हाकेंनी लगावला.

## माझ्या भाजप प्रवेशाच्या चर्चा अफवा
### काँग्रेस आमदार विकास ठाकरे यांचा खुलासा

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :** काँग्रेसचे आमदार व शहराध्यक्ष विकास ठाकरे यांनी त्यांच्या भाजपमध्ये जाण्याबद्दल भूमिका स्पष्ट करतानाच मी भाजपमध्ये जाण्याचा प्रश्नच येत नाही. पण काही लोक गेल्याने अनेक वर्षांपासून मला भाजपमध्ये पाठवत आहेत, असा टोलाही त्यांनी त्यांच्या पक्षांर्गत विरोधकांना लगावला.



शहर काँग्रेसतर्फे नागपूर पत्रकार क्लब येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत ठाकरे यांनी आगामी नागपूर महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या तयारीची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, जानेवारी महिन्यात महापालिकेच्या निवडणुका होण्याची शक्यता आहे, आणि त्यासाठी शहर काँग्रेसने आतापासूनच नियोजन सुरू केले आहे.

यंदा काँग्रेसकडून महापालिका निवडणुकीसाठी प्रभागनिहाय ६० बुथांमधील सुमारे ९०० पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन उमेदवार निश्चित केले जाणार आहेत. आवश्यक वाटल्यास, याच पदाधिकाऱ्यांमध्येच निवडणूक घेऊन अंतिम उमेदवार ठरवला जाईल. सध्या हा प्रयोग पश्चिम नागपूरमधील झिंगाबाई टाकळी प्रभागात सुरू झाला असून लवकरच तो संपूर्ण नागपूर शहरात राबवण्यात येणार आहे. हा फॉर्म्युला काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याकडे सुपूर्द करण्यात येणार असून, यामुळे पक्ष संघटनेला बळकटी मिळेल, तसेच उमेदवाराच्या मागे संपूर्ण बुथस्तरीय यंत्रणा उभी राहील, असा विश्वास आमदार ठाकरे यांनी व्यक्त केला.

महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी देताना पक्ष निष्ठेची खातरजमा करण्यासाठी उमेदवारांकडून लेखी शपथपत्र घेण्यात येणार असल्याचेही ठाकरे यांनी स्पष्ट केले. कोणताही उमेदवार काँग्रेसच्या तिकिटावर निवडून आल्यानंतर थेट भाजपमध्ये जाऊ नये, यासाठी ही खबरदारी घेतली जात आहे, असे सांगत त्यांनी अरविंद गजभिये यांचा संदर्भ दिला. गजभिये यांना काँग्रेसने संधी दिली, ते प्रकाशझोतात आले आणि नंतर भाजपमध्ये जाऊन जिल्हाध्यक्षही झाले. अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी शपथपत्र अनिवार्य आहे, असे ते म्हणाले.

भाजपमध्ये जाण्याच्या चर्चेविषयी ठाकरे म्हणाले, ही अफवा नवीन नाही. १९९७ पासून काही नेते आणि कार्यकर्ते अशा वावड्या पसरवत आहेत. मी काँग्रेसमध्ये जन्माला आलो, वाढलो आणि काम करतो आहे. त्यामुळे पक्ष बदलण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

ठाकरे यांनी भाजपमध्ये जाण्याच्या चर्चांना पूर्णविराम दिल्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये स्पष्टता आणि विश्वास निर्माण झाला आहे.

## अभिजात मराठी भाषा सप्ताहाला सुरुवात

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :** मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त झाला असल्याने या वर्षीपासून ३ ऑक्टोबर हा अभिजात मराठी भाषा सन्मान दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्याचबरोबर, ३ ते ९ ऑक्टोबर हा सप्ताह अभिजात मराठी भाषा सप्ताह म्हणून साजरा करण्यात येत आहे. अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त मुंबई, नागपूर व अमरावती येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.




मुंबई प्रभादेवी येथील रवींद्र नाट्य मंदिरात आज ३ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता अभिजात मराठी भाषा सन्मान दिनानिमित्त सप्ताहाचे उद्घाटन झाले. कार्यक्रमात विशेष टपाल तिकिट व विशेष आवरणाचे अनावरण करण्यात आले. तसेच अभिजात मराठी भाषा विषयक विविध ग्रंथ, पुस्तके व विशेष अंकांचे प्रकाशन करण्यात आले.

शनिवार ४ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई येथे ऑनलाईन मराठी : स्थिती व गती या विषयावरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. ९ ऑक्टोबर रोजी दुपारी ४.३० वाजता पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई येथे शिव-शक्ती संप्रदायाची लोक-गान परंपराद्ध या पुस्तकाच्या अनुषंगाने चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

नागपूर येथील वनामती सभागृह येथे ६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता माझ्या मराठीचा टिळा या निवडक कवितांचा गीत गायनाचा कार्यक्रम होणार आहे.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे ६ आणि ७ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता अभिजात भारतीय भाषातज्ज्ञ परिषद २०२५ होणार आहे. तर ८ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता अमरावती शहराजवळील ऐतिहासिक स्थळांना भेटी देण्यात येणार आहे.

या सप्ताहामध्ये राज्य मराठी विकास संस्था, मुंबई यांच्या यू-ट्यूब चॅनेलवरून ७ ऑनलाईन कार्यक्रम प्रसारित करण्यात येणार आहेत. ३ ऑक्टोबर रोजी आपल्याला अभिजात भाषेचा दर्जा कसा मिळाला, त्याची एकूण प्रक्रिया कशी होती आणि अभिजात भाषा सप्ताहामागची भूमिका हा कार्यक्रम दाखविला जाईल. मराठी भाषेची उत्पत्ती आणि अभिजातता हा कार्यक्रम ४ ऑक्टोबर रोजी, मराठी भाषेतील म्हणी, वाक्यप्रचार आणि भाषेचे व्याकरण हा कार्यक्रम ५ ऑक्टोबरला, मराठी भाषेतील वृत्त आणि त्यांचे सौंदर्य हा कार्यक्रम ६ ऑक्टोबरला दाखविण्यात येईल. बोलीभाषा आणि प्रमाणभाषा हा कार्यक्रम ७ ऑक्टोबर रोजी, मराठी भाषा अर्थार्जनाची भाषा हा कार्यक्रम ८ ऑक्टोबरला तर नव्या पिढीची मराठी भाषा हा कार्यक्रम ९ ऑक्टोबर रोजी यू-ट्यूबवरून प्रसारित होणार असल्याचे मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी यांनी कळविले आहे.

## तीन विमानतळांची नावे बदलली

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :** महाराष्ट्रातील तीन शहरांच्या विमानतळांची नावे बदलण्यात आली आहेत. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दिनकर बाळू पाटील अर्थात दि. बा. पाटील यांचे नाव देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

त्यानंतर छत्रपती संभाजीनगर विमानतळाचे नाव छत्रपती संभाजी महाराज विमानतळ असे नाव ठेवण्यात आले आहे. तर पुणे लोहगाव विमानतळाचे नाव जगद्गुरु संत तुकाराम महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ असे नाव देण्यात आले आहे.

नुकत्याच झालेल्या बैठकीत विमानतळांच्या या नावांवर शिक्कामोर्तब झाले आहे. याबाबत अधिकृत घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लवकरच करणार आहेत. तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नावासाठी एकच नाव केंद्राकडे पाठवण्यात आले होते आणि ते म्हणजे दिनकर बाळू पाटलांचे.

नवी मुंबई येथील या भव्य विमानतळाची तुलना लंडनच्या आंतरराष्ट्रीय विमानतळाशी होत आहे. या विमानतळाचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. अनेक दशके रायगड आणि नवी मुंबईसाठी लोकनेते दिनकर बाळू पाटील यांनी संघर्ष केला होता. त्यांच्या कार्याचा गौरव व्हावा म्हणून विमानतळाला त्यांचे नाव देण्यात यावे अशी मागणी केली जात होती. अखेर ही मागणी मान्य झाली.

महासागर
नागपूर
# वृत्तसागर
■ शनिवार, दि. ४, ऑक्टोबर २०२५ ■

## मेट्रोच्या प्रवाशांमध्ये विक्रमी वाढ

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :**

दसरा व धम्मचक्र प्रवर्तन दिन या पवित्र दिवसानिमित्त नागपूर मेट्रोमध्ये प्रवाशांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली असून, एका दिवसात १,५०,५९९ प्रवाशांनी मेट्रोसेवा वापरली. या दिवशी होणारी गर्दी लक्षात घेता नागपूर मेट्रोने आपल्या सेवा २ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजेपासून रात्री १२ वाजेपर्यंत सुरू ठेवल्या. विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी येणाऱ्या नागरिकांची व भक्तांची गैरसोय होऊ नये म्हणून सेवा वाढवण्यात आल्या.

दिवसभरात प्रवाशांचा उदंड प्रतिसाद पाहता नागपूर मेट्रोवरील नागरिकांचा विश्वास अधिक दृढ झाल्याचे दिसून येते. प्रवासाच्या सुरक्षितता, वेगवान सेवा आणि आरामदायक प्रवासासाठी नागरिक मेट्रोचा अधिकाधिक वापर करत आहेत. आता आपल्या सोयीसाठी आणि आरामदायक प्रवासासाठी वापर करत आहेत. इतक्या मोठ्या प्रमाणावर मिळालेला प्रतिसाद हा नागपूर मेट्रोच्या यशाचे प्रतीक आहे व शहराच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहे.

शाश्वत आणि पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या दिशेने सुरू असलेल्या प्रयत्नांना बळकटी देणारी असून रस्त्यावरील वाहतूक सुरळीत होण्यास मदत होत आहे. सणासुदीच्या नागरिकांना एक विश्वासार्ह पर्याय उपलब्ध झाला आहे. नागपूर मेट्रो आपल्या प्रवाशांना जागतिक दर्जाच्या सेवा देण्यास सदैव कटिबद्ध असून भविष्यातही प्रवाशांच्या सोयीसाठी नवनवीन सुविधा उपलब्ध करून देत राहणार आहे.

## जीवनातील प्रत्येक गोष्टीत आनंद शोधा



नितीन गडकरी यांचे आवाहन : जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त साधला संवाद

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ३ :**

कोण काय म्हणतो, कोण आपल्याबद्दल काय विचार करतो, याची चिंता करण्यापेक्षा आपल्या आयुष्यातील प्रत्येक छोट्या गोष्टीत आनंद शोधण्याचा प्रयत्न करा, असे आवाहन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज (शुक्रवार, दि. ३ ऑक्टोबर २०२५) ज्येष्ठ नागरिकांना केले.

ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठानच्या वतीने संताजी सभागृहात जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. तेली समाज सभेच्या सौजन्याने आयोजित या ज्येष्ठ नागरिक संमेलनाच्या उद्घाटन सोहळ्याला प्रतिष्ठानचे अध्यक्ष दत्ता मेघे, प्रा. अनिल सोले, राजू मिश्रा, बाबासाहेब नंदनपवार, नाना ढगे, अशोक मानकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

नितीन गडकरी म्हणाले, ज्याचा जन्म झाला, त्याचा मृत्यू अटळ आहे. याला कुणीही अपवाद नाही. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक म्हणायचे, एखादी व्यक्ती किती जगली, त्यापेक्षा ती कशी जगली, हे अधिक महत्त्वाचे असते. त्यामुळे आपल्याला मिळालेले जीवन आनंदात घालविण्याचाच विचार करावा. त्यासाठी आपले व्यक्तित्व, विचार करण्याची पद्धत, आपला स्वभाव हे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यातूनच आनंद निर्माण होऊ शकतो.

छोट्या छोट्या गोष्टी मनाला लावून घेतल्याने आपण अस्वस्थ होत असतो. अश्याने जीवनाचा आनंद घेता येणार नाही. कारण आनंद कुठल्याही बाजारात मिळत नाही. तो तुम्हाला प्रत्येक छोट्या गोष्टींमध्ये शोधावा लागणार आहे, असेही गडकरी म्हणाले. दत्ता मेघे म्हणाले, अनुभवाने समृद्ध असलेले ज्येष्ठ नागरिक समाजाला दिशा देणारे असतात. त्यादृष्टीने तरुण पिढीला ज्येष्ठांचा आदर करण्याचा संदेश देणारे आजचे आयोजन आहे.

बाबासाहेब नंदनपवार म्हणाले, वृद्धत्व हा जगाचा नियम आहे. पण वृद्ध होणे हा नियम नाही. आपल्याला ज्येष्ठ व्हावे लागते. ज्येष्ठांनी जगण्याची वृत्ती बदलली पाहिजे.



■ नागपूर : येथील कस्तुरचंद पार्कमैदानावर गुरूवारी विजयादशमीनिमित्त रावणदहन करण्यात आले. यावेळी प्रचंड गर्दी उसळली होती.

## २ मुलांसह महिलेची राजस्थानात विक्री

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :**

पतीपासून त्रस्त एका महिलेला तिच्याच नातेवाईकाने दुसरे लग्न लावून देण्याची बतावणी करून जाळ्यात अडकवले. नंतर तिला तिच्या दोन मुलांसह राजस्थान येथील दोन भावांना विकले. दोघांनीही महिलेचे शारीरिक शोषण केले. याबाबत माहिती मिळताच गुन्हे शाखेच्या मानवी तस्करी विरोधी पथकाने राजस्थानला जाऊन महिला आणि तिच्या मुलांची सुटका केली. या प्रकरणात ७ जणांविरुद्ध गुन्हा नोंदवून एका महिलेला अटक करण्यात आली आहे. वर्षा राजकुमार राकेश (३१) रा. जगदंबानगर, म्हसाळा असे अटकेतील महिलेचे नाव आहे. इतर आरोपींमध्ये अवधेश देवानसिंह ठाकूर (२७), रवी देवानसिंह ठाकूर (३५), शकून अवधेश ठाकूर (२६) तिन्ही रा. रायपुरा, राजस्थान, लक्ष्मण देवानसिंह ठाकूर (४०) रा. छपरा, शिवनी, माधवसिंह ठाकूर (६०) आणि हिरासिंह ठाकूर (७५) दोन्ही रा. राजाखेडा धोलपूर, राजस्थान यांचा समावेश आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिला श्रद्धा (बदललेले नाव) कपिलनगर ठाण्यांतर्गत पती आणि दोन मुलांसोबत राहते. तिचा पती दारूच्या आहारी गेला आहे आणि कोणताही कामधंदा करीत नाही. त्यामुळे श्रद्धा त्रस्त होती. आरोपी वर्षा ही तिची जवळची नातेवाईक आहे. इतर आरोपींसोबत मिळून वर्षाने श्रद्धाला राजस्थानमध्ये दुसरे लग्न लावून देण्याची बतावणी केली. मे महिन्याच्या शेवटी ती श्रद्धाला आपल्यासोबत घेऊन गेली. पतीने श्रद्धा आणि त्याची २ व ४ वर्षांची दोन्ही मुले बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली. या दरम्यान वर्षाने इतर आरोपींसोबत मिळून श्रद्धाची माधवसिंह आणि हिरासिंह यांना २ लाख रुपयात विक्री केली. मात्र आरोपींनी तिच्याशी लग्न केले नाही आणि घरात डांबून ठेवले. दोन्ही भाऊ तिचे शोषण करीत होते. संधी मिळताच श्रद्धाने पतीशी संपर्क करून राजस्थानमध्ये असल्याची माहिती दिली. पतीने मानवी तस्करी विरोधी पथकाशी संपर्क केला. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात एक पथक राजस्थानला रवाना झाले. माधव आणि हिराच्या घरी धडक देऊन श्रद्धाची सुटका केली. नागपूरला परतल्यानंतर श्रद्धाचा जबाब नोंदविण्यात आला. तिने वर्षाने जाळ्यात अडकवून राजस्थानला विकल्याची माहिती दिली. शारीरिक शोषणाबाबत सांगितले. पोलिसांनी सर्व आरोपींवर विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे. इतर आरोपींना अटक करण्यासाठी लवकरच एक पथक राजस्थानसाठी रवाना होईल.

## मिहानच्या समस्यांवर कारवाई होणार पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

■ **महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर, दि. ३ :**

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज फर्स्ट सिटी परिसराला भेट दिली. यावेळी अध्यक्ष शौर्य सीलोदिया यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.यानंतर हेमंत अंबासेलकर यांनी मिहानमधील विविध समस्यांबाबत निवेदन सादर केले. यात MADC सोबत बैठक, घनकचऱ्याची व्यवस्था, बसस्टॉपची सुविधा, जन्म-मृत्यू नोंदणी तसेच मिहानमधील 5000 रहिवाशांच्या अडचणी यांचा समावेश होता.



पालकमंत्री बावनकुळे यांनी या सर्व मागण्यांवर सकारात्मक प्रतिसाद देत तातडीने आवश्यक ती कारवाई करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. प्रसंगी खापरचे माजी सरपंच सोनटक्के यांची विशेष उपस्थिती होती.

## संघ कार्यालयाला संविधानाची प्रत देण्याचा प्रयत्न पोलिसांनी हाणून पाडला

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ३ :**

एकीकडे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ त्यांच्या स्थापनेचा शताब्दी महोत्सव साजरा करत असताना युवक काँग्रेसने संघाला संविधानाची प्रत भेट देण्याचा प्रयत्न केला. युवक काँग्रेसचे कार्यकर्ते रेशीमबागेतील संघाच्या कार्यालयात जाऊ नये म्हणून पोलिसांनी त्यांना सक्करदरा चौकातून ताब्यात घेतले.

महात्मा गांधी जयंतीनिमित्त सेवाग्राम आश्रमातील बापू कुटी येथे एक ऐतिहासिक घडामोड घडली. युवक काँग्रेसने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला संविधानाचा सन्मान करण्याचे आवाहन केले. या प्रसंगी महात्मा गांधींचे पणतू तुषार गांधी व काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भारतीय संविधानाची प्रत युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय भान चिब, प्रदेश युवक काँग्रेस अध्यक्ष शिवराज मोरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांना सन्मानपूर्वक सुपूर्द केली. ही संविधान प्रत संघाच्या रेशीमबाग येथील कार्यालयाला सुपूर्द करण्यासाठी युवक काँग्रेसने शांततामय व अहिंसक आंदोलनाचा निर्धार केला होता. यामागचा उद्देश एकच देश हा मनुस्मृतीनुसार नव्हे, तर संविधानानुसार चालतो हे ठामपणे सांगणे.

संघ कार्यालयाला संविधानाची प्रत देण्याचा प्रयत्न कार्यकर्त्यांनी केला असता, पोलिसांनी त्यांना अडवले आणि आंदोलनाला आळा घातला. कार्यकर्त्यांनी शांततेत संविधानाची प्रत देण्याचा मानस व्यक्त केला होता, मात्र पोलिसांनी ताब्यात घेतले आणि अजनी पोलीस ठाण्यात नेले. या कारवाईमुळे संविधानाच्या मूल्यांची



पायमल्ली झाल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. घटनात्मक अधिकारांचा अवमान होत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. पोलिसांच्या या कठोर भूमिकेचा अनेकांनी निषेध केला असून, लोकशाहीत असा प्रकार योग्य नसल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

युवक काँग्रेसच्या मते, संघाच्या १०० वर्षांच्या इतिहासात संविधानाचा आदर करण्याऐवजी मनुस्मृती व बंच ऑफ थॉट्स सारख्या विचारांचा पुरस्कार करण्यात आला आहे, जे भारतीय लोकशाही व समतेच्या मूल्यांविरोधात आहेत. या पार्श्वभूमीवर युवक काँग्रेसने संविधान सत्याग्रह सुरू केला असून, संघाने आता तरी संविधान मान्य करावे, असा स्पष्ट संदेश या आंदोलनातून देण्यात आला.

## रस्ते अपघातांत दाम्पत्यासह ५ जखमी

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ३ :**

वाडी, कामठी आणि महादुला ठाण्यांतर्गत घडलेल्या हिट अ‍ॅन्ड रनच्या घटनांमध्ये एका दाम्पत्यासह ५ जण गंभीर जखमी झाले आहेत. पहिल्या घटनेत उपचारार्थ नागपुरात आलेल्या दाम्पत्याला भरधाव पिकअप वाहनाच्या चालकाने उडविले, तर दुसऱ्या घटनेत ई-रिक्षा चालकाने एका पादचाऱ्याला उडवून पळ काढला. तिसऱ्या घटनेत दुचाकीच्या धडकेत दोनजण जखमी झाले.

पहिली घटना वाडी पोलिस ठाण्यांतर्गत अमरावती मार्गावर घडली. बालाघाट येथील रहिवासी सुनील पटले (४०) हे पत्नीच्या उपचारासाठी नागपुरात राहणाऱ्या नातेवाईकाकडे आले होते. पत्नीला घेऊन मोटारसायकलने दवाखान्यात जात होते. या दरम्यान अज्ञात पिकअप वाहनाच्या चालकाने भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवून त्यांच्या मोटारसायकलला जबर धडक दिली. पती-पत्नी वाहनासह खाली पडून गंभीर जखमी झाले. अपघातानंतर आरोपी पिकअप वाहन चालक घटनास्थळावरून पसार झाला. वाडी पोलिसांनी आरोपी चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

दुसरी घटना कामठी पोलिस ठाण्यांतर्गत अब्दुल शहा दर्गाजवळ रात्रीच्या सुमारास घडली. ई-रिक्षा चालकाने एका पादचाऱ्याला जबर धडक दिली आणि पळून गेला. संतोष मसराम (४५) असे जखमीचे नाव आहे. घटनेच्या वेळी संतोष पायदळ घरी जात होते. या दरम्यान ई-रिक्षाच्या चालकाने निष्काळजीपणे वाहन चालवत त्यांना धडक दिली आणि पळून गेला.

आसपासच्या लोकांनी संतोष यांना जखमी अवस्थेत उपचारार्थ रुग्णालयात भरती केले. पोलिसांनी त्यांच्या तक्रारीवरून अज्ञात ई-रिक्षा चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

### दुचाकीच्या धडकेत दोघे जखमी

अपघाताची तिसरी घटना कोराडी पोलिस ठाण्यांतर्गत महादुला टी-पॉइंटजवळ घडली. दुचाकीने जात असलेल्या दोघांना भरधाव मोटारसायकलस्वाराने जबर धडक दिली. सुरेंद्र लक्ष्मणदास शाहू (५३) आणि मनोज कळंबे दोन्ही रा. ढेंगरे लेआऊट, महादुला अशी जखमींची नावे आहेत. पोलिसांनी आरोपी मोटारसायकलस्वार संदेश भाऊदास मेश्राम (३०) रा. नांदा गाव, कामठी विरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. गुरूवारी सकाळी ८ वाजताच्या सुमारास सुरेंद्र हे मित्र मनोज यांच्या एमएच-४०/एक्वी-५४३१ क्रमांकाच्या दुचाकीवर बसून जात होते. महादुला टी पॉइंट ते देवी मंदिर मार्गावर फुलेनगर कटिंगजवळ भरधाव असलेल्या मोटारसायकल क्र. एमएच-४०/एझेड-४४१८ चा चालक संदेश याने त्याचे वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालवून मनोज यांच्या दुचाकीला जबर धडक दिली.

## ९ ऑक्टोंबरपासून विद्युत कर्मचारी संपावर

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ३ :**

राज्यातील तिन्ही शासकीय वीज कंपन्यांतील अधिकारी-कर्मचारी विविध कामातील खासगीकरणाविरोधात संतापले आहे. या खासगीकरणाला विरोधासह इतर मागणीसाठी विद्युत क्षेत्रातील सात वेगवेगळ्या संघटनांनी महाराष्ट्र राज्य वीज कर्मचारी अभियंता, अधिकारी कृती समितीच्या नेतृत्वात एकत्र येत ९ ऑक्टोबरपासून ७२ तास संपावर जाण्याची नोटीस तिन्ही कंपन्यांतील प्रशानसासह मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांना बजावली आहे. त्यामुळे या काळात वीज यंत्रणा सलाईनवर असणार आहे. पूर्वी हा संप दिवसभर राहणार होता.

महाराष्ट्र राज्य वीज कर्मचारी अभियंता, अधिकारी कृती समितीने ९ ऑक्टोबरपासून ७२ तासांचा राज्यव्यापी संप पुकारला आहे. मागील दोन वर्षांपासून वीज कंपन्यांमधील प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी कर्मचारी सातत्याने आंदोलने करत असूनही व्यवस्थापनाकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही, असा आरोप करत समितीने नाईलाजाने आंदोलन करावे लागत असल्याचा दावा केला आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी गेल्या काही वर्षांत वाढत्या ग्राहकसंख्येनुसार नवीन वितरण केंद्रे, उपविभाग व विभाग निर्माण करण्यात अपयशी ठरली आहे.

राज्यात २०२१ मध्ये राज्यातील वीज ग्राहकांची संख्या २ कोटी ८९ लाख होती, ती २०२५ मध्ये ३ कोटी १७ लाखांवर पोहोचली. मात्र उपविभागांची संख्या केवळ ६३४ वरून ६४८ वर एवढीच वाढली, तर कर्मचारी संख्या फक्त ८१ हजार ९६६ वरून ८१ हजार ९१८ इतकीच राहिली. त्यामुळे वाढत्या ग्राहकसंख्येच्या तुलनेत कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी असल्याने सेवा वसुलीवर परिणाम होत आहे. कृती समितीने व्यवस्थापनाला २२ हजार रिक्त पदे तातडीने भरण्याची, देखभाल व वसुली कामे सुलभ करण्यासाठी केंद्र व उपविभागांचे पुनर्गठन करण्याची मागणी केली होती. दरम्यान या मागणीवर योग्य कार्यवाहीचे आश्वासन दिल्याबरही काही झाले नाही. त्यातच आता महावितरणच्या क्षेत्रात खासगी कंपन्यांना वीज वितरणाचा समांतर वीज वितरण परवाना, प्रीपेड स्मार्ट मीटर, जलविद्युत प्रकल्पांचे खासगीकरण आणि महाट्रान्सकोच्या २०० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे खासगी कंपन्यांकडे सुपूर्द करण्याचा घाट रचला जात आहे. या सगळ्या कामांना कृती समितीचा तीव्र विरोध असल्याचे महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनचे सरचिटणीस कृष्णा भोयर यांचे प्रसिद्धीपत्रकातून म्हणने आहे.

## कर्नाटकातील मतचोर शोधण्यासाठी एसआयटी

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :**

भारतीय जनता पक्षाने मतचोरीसाठी तंत्रज्ञानाचा पद्धतशीर वापर चालवला आहे. कर्नाटकमधील अलंद विधानसभेत मतदार गायब करण्याचा प्रकार झाला आहे. ही मतचोरी सापडली आहे, परंतु मतचोर सापडलेला नाही. त्याचा शोध घेण्यासाठी कर्नाटक सरकारने विशेष तपास पथक (एसआयटी) नेमले आहे, अशी माहिती अलंदचे आमदार व कर्नाटक राज्य धोरण व नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष बी.आर. पाटील यांनी शुक्रवारी नागपुरात आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

पाटील म्हणाले, कर्नाटक सरकारने माझ्या विधानसभेत झालेल्या मतचोरी प्रकरणात विशेष तपास पथक (एसआयटी) नेमले आहे. पण एसआयटीने मागवलेली माहिती अजूनही निवडणूक आयोगाने दिलेली नाही. माहितीच दिली जात नसेल तर एसआयटी तपास पुढे जाऊ शकणार नाही. यापूर्वी या प्रकरणाचा तपास सीआयडीकडे होता.

सीआयडीने आयोगाला १८ महिन्यांत १८ पत्रे पाठवली. तरीही आयोगाने आयपी अ‍ॅड्रेस, डिव्हाइस पोर्ट आणि ओटीपी ट्रेल्सची माहिती दिली गेलेली नाही. मी काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी देशभर मांडलेल्या मतांची



बी.आर. पाटील यांची माहिती

चोरी प्रकरणातील साक्षीदार आहे. मतांची चोरी झाली आहे, पण चोर अजूनही सापडलेला नाही, असेही ते म्हणाले. या पत्रकार परिषदेला काँग्रेसचे आमदार विकास ठाकरे, शहर काँग्रेसचे उपाध्यक्ष प्रा. दिनेश बानाबाकोडे उपस्थित होते.

२०२३ मधील कर्नाटक विधानसभेच्या निवडणुकीत त्यांना पराभूत करण्यासाठी षडयंत्र रचण्यात आले, असा आरोप त्यांनी केला.

माझ्या आलंद मतदारसंघात सुमारे ६००० मतदार हटवण्याचा प्रयत्न झाला. यासाठी बनावट अर्ज सॉफ्टवेअरच्या माध्यमातून ऑनलाईन भरले गेले, असे त्यांनी सांगितले.

### निवडणूक आयोगाकडून पोलीस तक्रार

काँग्रेस उमेदवार म्हणून मतचोरी उघडकीस आणली. त्यानंतर या प्रकरणात निवडणूक आयोगाच्या प्रतिनिधीने पोलीस तक्रार दाखल केली. आयोगाने स्वतः हे लक्षात आणले नाही. एखाद्याने मत वगळण्यासाठी १४ मिनिटात १२ अर्ज भरले, ही गोष्ट आयोगाला कळायला हवी होती, असेही पाटील म्हणाले.

### काँग्रेससमोर दोन पर्याय

याप्रकरणी न्यायासाठी आयोगाच्या कार्यालयासमोर आंदोलन करावे लागेल किंवा उच्च न्यायालयात याचिका दाखल करावी लागेल, असे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना सुचवले आहे. अशाप्रकारे पद्धतशीरपणे मतचोरी होत असल्याने लोकशाहीचा गळा आवळला जात आहे. आणि मतदारांची फसवणूक होत आहे. या प्रकरणात दोन वर्षांहून काही घडलेले नाही. मतचोर कोण आहे, असे अद्याप पुढे आलेले नाही, अशी खंतही पाटील यांनी व्यक्त केली.

# सावनेरच्या कान्हा धवडने मारली संस्कृत बालनाट्य स्पर्धेत बाजी

■ **महासागर प्रतिनिधी**
**सावनेर, दि. ३ :**

स्थानिक रहिवासी कान्हा चंद्रशेखर धवद या बाल कलाकाराने खासदार सांस्कृतिक महोत्सवातील संस्कृत बाल नाट्य स्पर्धेमध्ये उत्कृष्ट ॲक्टरचा मान पटकाविला. ही स्पर्धा नागपूर येथील कविवर्य सुरेश भट ओडीटोरियल सभागृह नागपूर येथे पार पडली. यात जिल्ह्यातील 55 शाळांनी भाग घेतला होता. कान्हा हा पोतदार इंटरनॅशनल स्कूल काटोल रोड नागपूर या शाळेमध्ये चौथ्या वर्गामध्ये शिकत आहे. जयप्रकाश गुप्ता भारत सरकार वस्त्र उद्योग अध्यक्ष यांच्या हस्ते हे पारितोषिक कान्हाला देण्यात आले.यावेळी प्राचार्य कृष्णकुमार पांडे, आभाताई मेघे व इतर मान्यवर उपस्थित होते.




या उत्कृष्ट कामगिरीबद्दल क्षेत्राचे आमदार आशीष देशमुख,माजी क्रीडा व युवक कल्याण मंत्री सुनील केदार, समाजसेवक प्रकाश बालपांडे,मनोज बसवार,शफिक सय्यद, एडवोकेट चंद्रकांत पिसे, वरिष्ठ पत्रकार किशोर ढूंढेले, एडवोकेट आनंद गुप्ता,एडवोकेट भेजराज सोनकुसरे, डॉ योगेश पाटील, रामभाऊ घाटोडे, राजेंद्र नारनवरे, रमेश घटे, डॉ रोशन निनावे, राजेंद्र बडवाईक, प्रवीण रासेकर व पिंटू अंतुरकर यांनी शुभेच्छा दिल्या.

# नवरात्रीनिमित्त महिलांचा सत्कार



■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ३ :**

महानगरपालिकेचे माजी स्थायी समिती अध्यक्ष व प्रभाग क्रमांक २८ चे माजी नगरसेवक पिंटू झलके यांच्या वतीने नवरात्रीच्या पावन पर्वावर दरवर्षी प्रमाणे यंदाही विविध क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या ११ महिला भगिनींचा दररोज सन्मान करण्यात आला.

या उपक्रमा अंतर्गत सतत ९ दिवस दररोज ११ महिला या प्रमाणे ९९ महिलांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये शिक्षिका , परिचारिका , डॉक्टर ,एडवोकेट ,कॉर्पोरेट क्षेत्रातील महिला, महानगरपालिकेतील महिला अशा विविध कार्यकर्तृत्ववान महिलांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी भाजपा महिला आघाडी नेत्या लक्ष्मी मोहाडीकर, वैशाली पिसे, रंजना धोपटे, दिपाली वैद्य, तृप्ती शास्त्रकार, किशोरी झलके व अनंता बाविस्कर, रवींद्र शेंडे, मयूर बाभरे, आशुतोष रगड इत्यादी मान्यवरांचा सहभाग होता.

# रुयाड येथे जिल्हास्तरीय वंध्यत्व निवारण पंधरवाडयाचा शुभारंभ

■ **महासागर प्रतिनिधी**
**कुही, दि. ३ :**

पशुधनामध्ये वांझपणा हा महत्वाचा आर्थिक वाढीवर नकारात्मक घटक असल्याचे लक्षात घेत प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन नागपूर डॉ सतीष राजु यांच्या संकल्पनेतुन 02 ऑक्टो. ते 16 ऑक्टो. या पंधरा दिवसीय कालावधीत विभागात वंध्तव निवारण पंधरवाडा चे जिल्हा शुभारंभ कुही तालुक्यातील रूयाड येथे आज दिं 02 ऑक्टो. (गुरु) ला करण्यात आले.

प्रसंगी सहाययक आयुक्त पशुसंवर्धन जिल्हा उपायुक्त कार्यालय नागपूर डॉ अभय भालेराव, पशुधन विकास अधिकारी प्रासपकार्यालय नागपूर डॉ प्रमोद सपाटे, डॉ प्रशांत चौधरी, पशुधन विकास अधिकारी कुही डॉ अविरत सवाईमुल, विस्तार डॉ लईक खान पशुधन विकास अधिकारी, रूयाड संरपच विजय गोरबोडे, सदस्य दिलीप डहारे, गणेश मोहतुरे, ग्राम विकास अधिकारी विजय लिंगायत उपस्थित होते.




सदर शिबीरात 232 मोठी व लहान जनावरे तसेच 42 शेळयांची तपासणी करून आवश्यक उपचार करण्यात आले.

या शिबीरास रूयाड परीसरातील ब्राह्मणी, सातारा, मुसळगाव, चिपडी, मुरबी, बानोर, वग, पारडी, हरदोली, वीरखंडी, मांढळ व इतर गावातील शेतकयाच्या उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबीरात 39 जनावराचे बंध्तव तपासणी, गर्भधारण तपासणी,११५ जनावरांना जंतनाशक औषधी व गोचीड गोमांस्या निमुर्लन फवारणी करण्यात आले. या प्रसंगी अध्यक्षीय भाषणात डॉ अभय भालेराव यांनी वंध्तव निवारण पंढरवाडा संकल्पनेचे महत्व, लिंग विनिष्चित विर्यमात्रा व भृणप्रत्यारोपन प्रणालीचा वापर करून उच्च दुग्धउत्पादन क्षमता असणारी जनावरे तयार करण्याबाबत मार्गदशन केले.

पंधरवडा शुभारंभ कार्यक्रमाला राहुल बांते, पराग खोब्रागडे, गोपाल फड पशुधन पर्यवेक्षक व सेवादाता राहुल ठवकर, चेतन सेलोकर व संदीप तिरपुडे पशुपालक देवादिप सोमकुवर, ईश्वर देशमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी दवाखान्याचे परीचर भोंगाडे, लाभांडे, गाढवे यांनी परिश्रम घेतले.

# ऑपरेशन सेवा अंतर्गत ज्येष्ठ प्रवाशांना मदत

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ३ :**

ऑपरेशन सेवा च्या अंतर्गत, नागपूर विभागातील रेल्वे सुरक्षा दल (आरपीएफ) कर्मचाऱ्यांनी 2 ऑक्टोबर 2025 रोजी प्रवाशांच्या कल्याणासाठी आपली बांधिलकी पुन्हा एकदा दर्शविली व वेळेत मदत प्रदान केली. अजनी रेल्वे स्थानकावर, धम्मचक्र व दशहरा सुरक्षा ड्युटी दरम्यान सुमारे 17:00 वाजता, आरपीएफ कर्मचाऱ्यांनी सक्युर्लेटिंग एरियात दोन ज्येष्ठ प्रवाशांना अडचणीत पाहिले. यात उपनिरीक्षक राहुल मोहरले (अजनी), उपनिरीक्षक राजू डोकारे (वरिष्ठ डीएससी कार्यालय) व प्रधान आरक्षक जे. पी. पॉवर (अजनी) यांचा समावेश होता. प्रवाशांमध्ये बाबाराव मोहोद (92 वर्षे) व विलास संभरकर (87 वर्षे), हे दोघे चांदुर रेल्वेचे रहिवासी होते व त्यांचा प्रवास ट्रेन क्रमांक 12106 विदर्भ एक्सप्रेसने होणार होता.

त्यांच्या अशक्त स्थितीला पाहून, आरपीएफ कर्मचाऱ्यांनी त्वरित व्हीलचेअरची व्यवस्था केली, त्यांना सुरक्षितरीत्या प्लेटफॉर्म क्र. 1 वरून प्लेटफॉर्म क्र. 2 पर्यंत नेले व सुनिश्चित केले की ते आरामात ट्रेनमध्ये चढू शकतील. ज्येष्ठ प्रवाशांनी या मानवी सेवेसाठी आपली मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त केली व आरपीएफचे कौतुक केले.

# कृषी उत्पन्न बाजार समितीचा सर्वांगीण विकास हेच आपले ध्येय : सभापती सचिन किरपान



■ **महासागर प्रतिनिधी**
**रामटेक, दि. ३ :**

रामटेक तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीची वार्षिक आमसभा अतिशय उत्साहात व थाटात रामटेक शहरातील डॉ.आंबेडकर चौकातील गंगा भवन सभागृहात दि.२९ सप्टेंबर ला सोमवारी संपन्न झाली.

यावेळी बोलतांना सभापती सचिन किरपान म्हणाले रामटेक तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचा सर्वांगीण विकास हेच आपले ध्येय असून, समितीचा सर्वांगीण विकास केल्याशिवाय आपण स्वस्थ बसणार नाही.आम्ही २०२३ साली या बाजार समितीचे नवीन संचालक मंडळ आपल्या नेतृत्वाखाली पदारुढ झालो. तेव्हा काही लाखांचे उत्पन्न असलेली ही बाजार समिती, आज वार्षिक दोन कोटींच्यावर उत्पन्न असलेली बाजार समिती झाली व नागपूर जिल्ह्यातील तिसऱ्या क्रमांकाची बाजार समिती असल्याचा त्यांनी यावेळी उल्लेख केला. गत दोन वर्षांत झालेल्या विकास कामांची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

समितीच्या सर्वांगीण विकासासाठी संचालक मंडळ आपल्या पाठीशी ठामपणे उभे आहे तर बाजार समितीच्या उत्पन्नात महत्त्वाची भूमिका असणारे आडते, व्यापारी व शेतकरी यांच्या सहकार्याने समितीचा कायापालट करण्याचा त्यांनी निर्धार व्यक्त केला.

रामटेक तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वार्षिक आमसभेच्या अध्यक्षस्थानी सभापती सचिन किरपान होते. उपसभापती लक्ष्मी कुमरे, संचालक विरेश आष्टनकर, नकुल बरबटे,त्रिलोक मेहर,उमेश भांडारकर,नरेश मोहने, रामू झाडे,योगेश म्हात्रे,झनकलाल मरसकोल्हे, निळकंठ महाजन, भिमराव आंबिलढूके, बाबुलाल वरखडे,विजय मदनकर,साबेरा पठाण,यशवंत भलावी हे व्यासपीठावर उपस्थित होते.

आमसभेच्या प्रारंभी दिपप्रज्वलन व छत्रपती शिवाजी महाराज व अन्य थोर पुरुषांच्या प्रतिमेस माल्यार्पण करण्यात आले. त्यानंतर समितीचे सचिव हनुमंत महाजन यांनी अहवाल वाचन केले. यावेळी त्यांनी बाजार समिती रामटेकच्या विकास व उत्पन्नाबाबतची सविस्तर आकडेवारी सादर केली. आमसभेत उपस्थित असलेल्या तालुक्यातील ग्रामपंचायतचे सरपंच व सेवा सहकारी संस्था अध्यक्षांचा यावेळी शाल व सन्मानचिन्ह देऊन संचालक मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी संचालक भिमराव आंबिलढूके, योगेश म्हात्रे, सरपंच स्नेहा भांडारकर, सेवा सहकारी संस्थेचे अध्यक्ष रामकृष्ण नवघरे, आडते सुरेश वांदीले, निखिल पाटील यांनी उपस्थितांना संबोधित केले. आमसभेला सरपंच-उपसरपंच व सदस्य तसेच सेवा सहकारी संस्थाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यानिमीत्ताने बाजार समितीच्या वतीने आयोजित 'लकी ड्रॉ' च्या विजेत्यांना विविध पुरस्कार देण्यात आले. उपस्थित सर्वांना भेटवस्तू वितरण करण्यात आले. आमसभेचे प्रास्ताविक त्रिलोक मेहर यांनी केले तर उपस्थित सर्वांचे आभार उमेश भांडारकर यांनी मानले.

# धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त इंदोरा मायानगर परिसरात भोजन व्यवस्था



■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ३ :**

धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या निमित्ताने दिक्षाभूमी येथे जाणाऱ्या बौद्ध अनुयायांसाठी प्रभाग क्र. 7 इदोरा मायानगर परिसरातील ललित कला भवन येथे 'मायानगर मित्र परिवार' यांच्यातर्फे भोजन व्यवस्था करण्यात आली. बाहेरून आलेल्या अनुयायांसाठी ही सेवा अत्यंत अनुकरणीय ठरली.

या उपक्रमात नागपूर शहर काँग्रेस कमिटीचे सचिव कुणाल निमगडे, प्रविण खोब्रागडे, राजेश महेसकर, हेमंत लाडे, मधुकर बांगडे, दुर्योधन मेश्राम, विनोद लाडे, प्रशांत जनबंधू, विशाल गोवर्धन, रवि गजभिये, राजू बोरकर, धनंजय बोण्डे, विजय जनबंधू, मनीष खोब्रागडे, नितीन गजभिये, आशीष नंदेश्वर, अमन बोरकर, अविनाश गजभिये, अतुल टैंभुर्णे, संजय बागडे, विजय काबळे, सजय गौस्वामी, राकेश गोडाने यांच्यासह परिसरातील अनेक मित्र परिवार सदस्य उपस्थित होते.

धम्मचक्र प्रवर्तन दिन हा बौद्ध समाजासाठी एक अत्यंत पवित्र व प्रेरणादायी दिवस असून, या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेतली होती. त्या स्मरणार्थ दरवर्षी हजारो अनुयायी दिक्षाभूमीला भेट देतात. या पार्श्वभूमीवर मायानगर मित्र परिवाराने केलेली भोजन व्यवस्था ही समाजासाठी एक सामाजिक बांधिलकीचे उदाहरण ठरले.

# कारागृहातील २०० बंदीवान देणार गांधी विचार परीक्षा

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ३ :**

नागपूर मध्यवर्ती कारागृहातील बंदीवानांसाठी गांधी विचार परीक्षेचे आयोजन सहयोग ट्रस्ट आणि मुंबई सर्वोदय मंडळातर्फे करण्यात आले आहे. बुधवार, दि. १ ऑक्टोबरला सकाळी नऊ वाजता कारागृहात होणाऱ्या या परीक्षेत नागपूर मध्यवर्ती कारागृहातील बडी गोल, छोटी गोल, फाशी यार्ड आणि महिला यार्डातील एकुण २०० बंदीवान या परीक्षेत सहभागी होणार असल्याची माहिती गांधी विचार परीक्षेचे संयोजक आणि सहयोग ट्रस्टचे विश्वस्त डॉ. रवींद्र भुसारी यांनी दिली आहे.

ही परीक्षा ओपन बुक पद्धतीची असून त्यासाठी कारागृहातील बंदीवानांना यापूर्वीच पुस्तके पुरविण्यात आलेली आहेत. नागपूर मध्यवर्ती कारागृहातील चौथ्या वर्गापासून स्नातकोत्तर पर्यंत विविध विषयात शिक्षण घेतलेले बंदीवान गांधी बापू, माझी जीवन कथा आणि गांधीजींची आत्मकथा अर्थात माझे सत्याचे प्रयोग या पुस्तकांवर आधारित प्रश्नपत्रिका सोडवतील. परीक्षा एका एक तास अवधीची असून प्रश्न पत्रिका ८० प्रश्नांची असणार आहे.

# रॉयल इंटरनॅशनल स्कूलमध्ये गरबा महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न

■ **महासागर प्रतिनिधी**
**सावनेर, दि. ३ :**

दरवर्षीप्रमाणे या वर्षीही पोदार प्रेप आणि रॉयल इंटरनॅशनल स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने सावनेर येथील प्रसंग सेलिब्रेशन हॉलमध्ये गरबा उत्सव मोठ्या उत्साहात आणि सांस्कृतिक वातावरणात आयोजित करण्यात आला होता.

पारंपारिक पोशाखात विद्यार्थ्यांनी गरबा आणि दांडियामध्ये उत्साहाने भाग घेतला, रंगीत नृत्य सादर केले. भारतीय संस्कृतीचे जतन करणे, सामाजिक एकता वाढवणे आणि आनंदी वातावरण निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता.

या कार्यक्रमाला संचालक मंडळाचे अध्यक्ष अतुल नाईक, उपाध्यक्ष डॉ. पराग चौधरी, कोषाध्यक्ष देवेंद्र दलाल, सचिव डॉ. उमेश जीवतोडे, संचालक डॉ. नितीन पोतोडे, विजय ठाकरे, महेंद्र वरोटकर, सल्लागार डॉ. सचिन चौधरी आणि पोदारी प्रेप सेंटरच्या प्रमुख पूजा सुके मॅडम यांची उपस्थिती होती. यावेळी प्राचार्य अरविंद स्वामी यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले आणि उत्सवांच्या माध्यमातून संस्कृतीचे जतन आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे महत्त्व अधोरेखित केले.



व्यवस्थापन, प्राध्यापक आणि पालकांचे आभार मानून कार्यक्रमाचा समारोप झाला. हा उत्सव खरोखरच आनंद, उत्साह आणि एकतेचे प्रतीक ठरला.

# बहुजन विचार मंचतर्फे फ्रेंड्स कॉलनी येथे रावण दहन

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ३ :**

विजयादशमीच्या पावन पर्वावर बहुजन विचार मंच व नरेंद्र जिचकार यांच्या वतीने फ्रेंड्स कॉलोनी ग्राउंड,गिट्टीखदान,काटोल रोड येथे रावन दहन करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजसेवक गंगाप्रसाद ग्वालबंक्षी, भाजपा ज्येष्ठ नेते नरेश बरडे, माजी नगरसेवक किशोर जिचकार,माजी नगरसेवक कमलेश चौधरी, नागपूर सुधार करण्याचे माजी विश्वस्त व माजी नगरसेवक भुषण शिंगणे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

यावप्रसंगी बोलताना कार्यक्रमाचे संयोजक नरेंद्र जिचकार म्हणाले की रावण दहन हे प्रतिक आहे असत्यावर सत्याच्या विजयाचा प्रभू रामचंद्राचे संपूर्ण जीवन आपल्याला शिकवते की सत्याच्या मार्गावर चालावे,जरी कठीण काळ




आयुष्यात आले तरी त्याला घाबरून न जाता आपण आपल्या ध्येयपूतीर्साठी प्रयत्न करीत राहावे.शेवटी विजय सत्याचाच होतो. अध्यक्षीय भाषणात ज्येष्ठ समाजसेवक गंगाप्रसाद ग्वालबंक्षी म्हणाले की या परिसरात अनेक मोठे नेते होते, आहेत पण कुणी ही कधीही या परिसरात रावण दहन करावे असे कुणाला वाटले नाही पण नरेंद्र जिचकार यांच्या मनात हे आले आणि मागच्या दोन वर्षापासून ते या परिसरात रावण दहनचा कार्यक्रम आयोजित करीत आहे.त्यांच्या मनात हे प्रभूनीच आणले आहे कारत ते नेहमीच सामाजिक कार्यक्रमात अग्रेसर असतात. कार्यक्रमाचे संचालन जेष्ठ समाजसेवक घनश्यामजी मांगे यांनी केले. मंचावर अशोक डोरलीकर, डॉ.प्रकाश रणदिवे, रामसिंग ठाकूर, सुरेश कोंगे,जावेद भाई,भैय्याजी चौबे, पांडुरंग शिंगणे, वसंतराव पवार, तुकाराम चौधरी, भाऊराव कापसे,आसिफ अन्सारी, महेश अलगरे, शंकर ठाकरे,मुक्कीम भाई, बशीर भाई सह अनेक मान्यवर उपस्थित होते.याप्रसंगी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

# महिला आघाडीतर्फे गरबा महोत्सव उत्साहात

■ **महासागर प्रतिनिधी**
**वाडी, दि. ३ :**

दत्तवाडीतील आमदार समीर मेघे यांच्या जनसंपर्क कार्यालयासमोरील छत्रपती शाहू महाराज उद्यानात भाजपा महिला आघाडी वाडी मंडळातर्फे नवरात्रीनिमित्त एकदिवसीय गरबा महोत्सवाचे आयोजन शुक्रवार २६ सप्टेंबर रोजी संध्याकाळी ७.३० करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी जि.प. सभापती उज्वला बोढारे होत्या. कार्यक्रमाची सुरुवात अंबाबाईच्या गोंधळाने करण्यात आली. यानंतर रंगतदार रास गरब्याची मैफल रंगली. आयोजन भाजपा महिला आघाडी मंडळ अध्यक्ष कल्पना सगदेव यांनी केले.

# राष्ट्रपिता म.गांधी आणि लाल बहादुर शास्त्री यांना महावितरणचे अभिवादन

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ३ :**

राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि 'जय जवान, जय किसान'चा नारा देणारे भारताचे माजी पंतप्रधान लाल बहादुर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त महावितरणच्या नागपूर परिमंडळालातील विद्युत भवन मुख्यालयात एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

महावितरणच्या नागपुर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांच्या हस्ते भारत मातेच्या या दोन महान सुपुत्रांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी महानिर्मितीचे उपमुख्य अभियंता अंकुर जोशी यांच्यासह महावितरणचे अधीक्षक अभियंता अमित परांजपे, संजय वाकडे आणि मंगेश वैद्य यांच्यासह महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) अतुल राऊत, सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) महेश जाधव, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी सचिन लहाने, सहायक संचालक (सुरक्षा व अंमलबजावणी) प्रशांत तुळशी यांच्यासह महावितरण आणि महानिर्मितीचे अनेक अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तत्पूर्वी, मुख्य अभियंता दिलीप दोडके यांच्या शुभहस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.



# नागलवाड़ी येथे नवरात्र मंडपाजवळ अजगर

■ **महासागर प्रतिनिधी**
**हिंगणा, दि. ३ :**

नागलवाडी येथे नवरात्रोत्सव सुरु असतांना त्या पंडाल जवळ भला मोठा अजगर निघाल्याने उपस्थितांची चांगलीच तारांबळ उडाली. रविवारी (२८) रात्री या गावात नवरात्रोत्सव सुरु असल्याने गावकरी एकत्र आले होते. रात्री१० वाजताच्या सुमारास बाजूला असलेल्या घराजवळ ७ फूट लांब अजगर लोकांना दिसला .येथील माजी सरपंच नाना लापकाळे यांनी तातडीने सर्पमित्रांना पाचारण माहिती दिली.

सर्पमित्र आकाश मंडल, आकाश मेश्राम आणि राजा बिसेन या तिघांनीही अजगराला सुरक्षितरीत्या पकडुन नैसर्गिक अधिवासात सोडले. साधारण आठ दिवसांपूर्वी याच परिसरात एक नऊ फूट लांबीचा अजगर दिसला होता त्यानंतर हा दुसरा ७ फूट लांब अजगर निघाल्याने नागरिक अचंबित झाले.

# महिला सबला असल्याची जाणीव सर्व महिलांना व्हावी : डॉ. प्रतिमा सावरकर

■ **महासागर प्रतिनिधी**
**मौदा, दि. ३ :**

नवरात्रोत्सव हा सण स्त्री शक्तीच्या विविध रूपांचा उत्सव असून, तिच्या सामर्थ्याचा व तिच्यातील सकारात्मक गुणांचा आदर करण्याचा हा सण आहे. या नऊ दिवसांमध्ये देवी दुर्गेच्या नऊ वेगवेगळ्या रूपांची पूजा केली जाते. प्रत्येक रूपात तिचे स्वतःचे महत्त्व आणि गुणधर्म आहेत. असे असले तरी महिला अजूनही परावलंबीच आहेत. तिने आता व्यक्त झाले पाहिजे. आपले सुख दुःख धाडसाने आपल्या आई-वडिलांना, भावांना, बहिणींना, मैत्रिणींना, नातेवाईकांना सांगितली पाहिजेत. तरच ती सशक्त होईल, महिला आता अबला नसून सबला झाली आहे याची जाणीव तिला पदोपदी व्हावी, अशी अपेक्षा अस्तिरोग तज्ञ डॉ. आशिष सावरकर यांच्या पत्नी स्त्रीरोग तज्ञ डॉ. प्रतिमा आशीष सावरकर यांनी नवरात्रोत्सवानिमित्त व्यक्त केली.



नवरात्रोत्सव हा सण संपूर्ण भारताला उत्सवात एकत्र आणतो, तरीही प्रत्येक प्रदेशात स्वतःच्या वेगळ्या रिती आणि परंपरा आहेत. महाराष्ट्रात नवरात्रोत्सव जसा साजरा होतो. तसा गुजरातमधील गरबा, पश्चिम बंगालमधील दुर्गापूजेची कलात्मक भव्यता, तामिळनाडूमधील शांत बोम्मई गोलूचे प्रदर्शन हे भारताच्या सांस्कृतिक विविधतेचे दर्शन घडवते. भक्ती, उत्सव आणि वाईटावर चांगल्याचा विजय या निमित्ताने अधोरेखित होतो.

नवरात्रीच्या या नऊ दिवसात देवीच्या नऊ रुपांची पूजा होते. प्रत्येक दिवस एका विशिष्ट रंगाशी जोडलेला असतो. हेच नवरात्र दक्षिण भारतात 'गोलू' नावाने साजरे होते. गोलू म्हणजेच 'बाहुल्या' होय. लाकडापासून निर्मित केलेले देव व संत यांची प्रतिकृती सजवून विविध रूपात त्यांचा देवादिकांच्या चरित्रानुसार जीवनकाळ मांडण्यात येतो. यानिमित्ताने प्रत्येक कुटुंबामध्ये सायंकाळी भक्तिगीत व श्लोकांचे पठण केले जाते.

मंत्रोच्चारात पूजाविधी केली जाते, निरनिराळे वस्त्र, धातूची निरांजने व पौराणिक कथेनुसार त्यांचे चरित्र साकारणे हे या उत्सवाचे वैशिष्ट्य आहे. हिंदू पुराणातील मजकूर, दरबार, जीवन, शाही मिरवणूक, रथयात्रा, विवाह, स्वयंपाकातील भांडी हे सर्व गोलूच्या प्रदर्शनातून पहावयास मिळते. दसऱ्याच्या दिवशी या उत्सवाचा समारोप होतो.

# कुहीत जय श्रीरामाच्या जयघोषात रावणदहन



## दहन बघण्यासाठी गर्दी; सियाँवर रामचंद्र की जयचा जयघोष

■ गजानन लांजेवार
कुही, दि. ३ :
वाईटावर चांगल्या प्रवृत्तीचा विजयाचे प्रतीक असलेल्या विजयादशमीचा सण रावण दहनाने उत्साहात साजरा झाला. मागील काही वर्षांची जुनी परंपरा असलेल्या श्री महारुद्र हनुमान मंदिर (खातीपुरा) येथील अंगणवाडीच्या भव्य पटांगणावर पंधरा फूट उंचीचा रावण दहन करण्यात आले.

खातीपुरा परिसरातील युवक मंडळीनी एकत्रित येत सदर कार्यक्रमाचे यशस्वीरित्या आयोजन केले. मागील पंधरा दिवसापासून रावणाची प्रतिकृती तयार करण्याचे काम सुरू होते. नवरात्र उत्सवाच्या मध्यंतरी पावसाने धुमाकूळ घातलेला होता. त्या प्रतिकूल परिस्थितीतही मार्ग काढत रावणाची प्रतिकृती तयार करण्याचे काम खातीपुरा परिसरातील युवकांनी केले. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती सामाजिक कार्यकर्ता सचिन घुमरे, नगरसेवक मयूर तळेकर, दीपक लांजेवार यांची उपस्थिती होती.

त्यानिमित्ताने निघालेल्या विजयी मिरवणूकीत प्रभू श्रीरामासह सितामाई, लक्ष्मण, हनुमान यांसह रावण-वानरसेनेच्या प्रतीकात्मक लढाईने उपस्थितांची मने जिंकली. प्रभू रामचंद्रच्या वेशभूषेत शैलेश चाचेरकर, लक्ष्मण शिवम चट्टे, सीता नैतिक चकोले, हनुमान अथर्व तळेकार, राक्षसीन शुभम देवतळे नी साकारली. व परिसरातील बालगोपाल वानर सेनेच्या वेशभूषेत आकर्षक दिसत होती.

गावात वाजत गाजत रॅली काढण्यात आली. श्री महारुद्र हनुमान मंदिर (खातीपुरा) परिसरात नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून आली. मान्यवरांच्या हस्ते प्रज्वलित बाणाने रावणाचे दहन करण्यात आल्यानंतर भाविकांनी "प्रभू सियावर रामचंद्र की जय" चा जयघोष केला. रावणाच्या प्रतीकात्मक पुतळ्याचे दहण होताच उपस्थितांनी विजयोत्सवाचा एकच जल्लोष केला. दहणापूर्वी आणि नंतर प्रचंड फटाक्यांची आतषबाजीने आसमंत उजळून निघाला होता.

दरम्यान, महारुद्र हनुमान मंदिरात विशेषारती करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शुभम शेंडे, आकाश शेंडे, प्रशांत शेंडे, विनय बोरकर, गजु देवतळे, स्वप्नील चाचेरकर, अंगद शेंडे, राजु शेंडे, नरेश देवतळे, मनोज देवतळे, चंदू वांढरे, रुपेश देवतळे, विनोद चवरे, रोशन शेंडे, कार्तिक लेंडे, आकाश गुरणले, कुणाल बावणे प्रयत्नरत होते.

# विविध योजनेत निःशुल्क रोग निदान संपन्न



■ महासागर प्रतिनिधी, कामठी, दि. ३ :
२९ सप्टेंबरला वैद्यकीय दंतरोग निदान व उपचार आणि शस्त्र क्रिया शिबीर घेण्यात आले चंद्रशेखर बावनकुळे पालकमंत्री नागपूर व अमरावती जिल्हा ह्यांचे हस्ते या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमात डॉ.एन.बी. राठोड, जिल्हा शल्यचिकित्सक, सर्वोपचार रुग्णालय नागपूर, डॉ. राजकुमार गहलोत, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर व बाळासाहेब यावले गट विकास अधिकारी पंचायत समिती कामठी, आणि डॉ. सौरभ अग्रवाल, संचालक, आशा हॉस्पिटल कामठी, तसेच मंगेश यादव, बुद्धाजी खोडे सहित मान्यवर होते. शिबिरात डागा स्त्री रुग्णालय नागपूर, आशा हॉस्पिटल कामठी, सिटी हॉस्पिटल कामठी येथील चमूंनी आरोग्य विषयी रुग्णालयाला मोलाचा वाटा दिलेला असुन डॉ. निशात शेख वैद्यकीय अधिक्षक उपजिल्हा रुग्णालय कामठी आणि डॉ. सुरेश मोटे तालुका आरोग्य अधिकारी कामठी ह्यांच्या मार्गदर्शना खाली उपजिल्हा रुग्नालयिन/कार्यालयीन अधिकारी कर्मचारी आणि तालुका आरोग्य अधिकारी यांचे कार्यालयीन अधिकारी / कर्मचारी तसेच आशा सेविका व कीटक /जल जन्य रोग विभाग, क्षयरोग विभाग, एड्स विभाग इत्यादी विभागांनी मोलाचा वाटा दिला.

" स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान " आणि "नमो नेत्र संजीवनी स्वास्थ्य अभियान "अंतर्गत सध्या तपासणी बाबत कार्यक्रम सुरु असुन त्या बाबत विशेष तपासणी व निदान प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

वरील "वैद्यकीय दंतरोग निदान व उपचार आणि शस्त्रक्रिया" शिबीर उपसंचालक, आरोग्य सेवा नागपुर मंडळ नागपूर, आणि जिल्हा शल्यचिकित्सक सर्वोपचार रुग्णालय नागपूर यांचे प्रमुख मार्गदर्शनाने उप जिल्हा रुग्णालय कामठी आणि तालुका आरोग्य अधिकारी कामठी यांचा संयुक्त उपक्रम उप जिल्हा रुग्णालय कामठी जिल्हा नागपूर या रुग्णालयातील परिसरात राबविण्यात आला.

या शिबिरात विशेष करुन पौष्टिक आहार, सिकल सेल, थलेसेमिया, अनिमिया, हिमोफिलिया, मुख कर्क रोग, स्तन कर्क रोग, गर्भाशय, मधुमेह, उच्चरक्तदाब, क्षय रोग, तंबाखु व तंबाखुजन्य, पदार्थांचे दुष्परिणाम, नेत्र रोग तपासणी, मानसिक रोग तपासणी स्वच्छता व स्वच्छ परिसर इत्यादी व आरोग्यो निगडीत सर्व राष्ट्रीय कार्यक्रम अंतर्गत जनजागृती याबाबतचे प्रदर्शन मांडण्यात आले. तालुक्यातील विविध माध्यमातून नागरिकांना सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले होते.

यात एकुण ११२६ रुग्णांनी लाभो घेतला त्यापैकी पुरुष रूग्ण ६१५आणि ५११ स्त्री रुग्णांनी शिबिराचा पूर्ण लाभ घेतलेला आहे.

# सेंटर पॉइंट स्कूल येथे गरबा महोत्सव साजरा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :
सेंटर पॉइंट स्कूल, वर्धमाननगर येथे नवरात्र उत्सवानिमित्त आयोजित गरबा महोत्सव अतिशय उत्साहात व रंगतदार वातावरणात साजरा करण्यात आला. तब्बल ८०० विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांनी पारंपरिक वेशभूषेत सजून-धजून गरबाच्या तालावर ठेका धरत या कार्यक्रमात सहभाग नोंदवला.कार्यक्रमाचे आयोजन शाळेच्या उपप्राचार्या दीपा चक्रवर्ती यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. प्राचार्या कांचन उके यांनी उपस्थित पालकांचे मनःपूर्वक आभार मानले आणि सर्वांना नवरात्रीच्या शुभेच्छा दिल्या. गरबा स्पर्धेमध्ये विविध विभागांतील विद्यार्थ्यांनी मनमोहक वेशभूषा व नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विजेत्यांना कांचन उके ,दीपा चक्रवर्ती व जयती चक्रवर्ती यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.



विजेते (ज्युनियर विभाग) बेस्ट ड्रेस (मुली) जिनाया कुलानी, चिया लखवानी, आरोही कौशिक, हितिषा अग्रवाल, नायरा भद्रे बेस्ट डान्स (मुली) जिया सेठानी, जूही रक्षीय, नूर्वी उपाध्ये, कैरा जैस्वाल, काशिश अग्रवाल बेस्ट ड्रेस (मुले ) ध्रुव मदान, अहमद अली, नित्य जैन, अयन खुराना, पर्व अरोरा बेस्ट डान्स (मुले ) शौर्य बोरा, ग्रंथ कौशिक, शाश्वत अग्रवाल, खुश वातवानी, श्लोक बजाज विजेते (सिनिअर विभाग) बेस्ट ड्रेस (मुली):लावण्या भद्रे, आरोही भट्टड, हिनल थावरानी, हीर भोजानी, रिया सिदानी बेस्ट ड्रेस (मुले ) अव्युक्त कोहली, आरव गुप्ता, राजीव शर्मा, ब्रिजेश पुनयानी, प्रित भेदा बेस्ट डान्सर्स ईवा मित्तल, वान्या साहू, सान्वी डोंगरे, प्रियांशी पसारी, अनन्या गुप्ता, ओजस अव्वा, समर्थ टक्कर, नक्ष धनजानी, जिमोन पास्कल, अर्नव आम्बरे विशेष पुरस्कार बेस्ट ड्रेस (टीचर) सोनल ढभालिया, बेस्ट डान्स (पॅरेन्ट्स) जयेश अमेसार, रितु अमेसार बेस्ट ड्रेस (पॅरेन्ट्स) रक्षित कोहली, मेघा कोहली संपूर्ण कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी एक संस्मरणीय अनुभव ठरला.

## त्रिमूर्ती नगर गुजराती युवक मंडळाकडून चेंबरच्या अधिकाऱ्यांचा गौरव



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :
त्रिमूर्ती नगर गुजराती युवक मंडळाने आयोजित केलेल्या नवरात्रोत्सवात नागपूर चेंबर ऑफ कॉमर्सच्या अधिकाऱ्यांचे भव्य स्वागत आणि सत्कार करण्यात आला. याप्रसंगी चेंबरचे अध्यक्ष कैलाश जोगानी, वरिष्ठ उपाध्यक्ष प्रदीप जाजू, कोषाध्यक्ष नाथाभाई पटेल, उपाध्यक्ष तरुण निर्वाण आणि संचालक वसंत पालीवाल यांना मंडळाने शाल आणि स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष रमेशभाई ढोलरिया, राजेशभाई सावलिया, केतनभाई पटेल, राजशभाई राखोलिया यांचे विशेष सहकार्य लाभले. गरबा महोत्सवात समाजातील लोकांनी मोठ्या संख्येने उत्साहाने भाग घेतला.

## गणेशनगर, नंदनवन येथे रावण दहन कार्यक्रम उत्साहात

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :
गेल्या २२ वर्षांपासून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विजयादशमी निमित्त रावण दहनाच्या कार्यक्रमाचे आयोजन राजीव गांधी पार्क, गणेशनगर, नंदनवन येथे माजी नगरसेवक प्रशांत धवड आणि मित्र परिवारा तर्फे मोठ्या उत्साहात करण्यात आले.



यावेळी अनेक मान्यवरांचा सत्कार माजी नगरसेवक प्रशांत धवड यांच्या हस्ते करण्यात आला. यानंतर भव्य फटाका शोचे सुद्धा आयोजन करण्यात आले. फटाका शो चा आनंद हजारो नागरिकांनी घेतला व सर्वांचे मनमोहुन गेले. फटाका शो नंतर हजारो नागरिकांच्या उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते रावण दहन करण्यात आले.

# जरीपटका येथे दुर्गामाता उत्सवात रामसेतू देखावा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :
इंदोरा, प्रभाग क्र. ७ जरीपटका लाईन नं. ३, महात्मा गांधी शाळेजवळील सिंध दुर्गा माता मंडळ यांनी यावर्षी दुगामार्ता उत्सवात खास आकर्षण ठरलेला रामसेतू देखावा उभारला असून, त्याला पाहण्यासाठी मोठ्या संख्येने दर्शनार्थी गर्दी करत आहेत.

संपूर्ण परिसरात उत्सवमय वातावरण असून, मंडळाने पारंपरिक सजावट, लाईटिंग आणि भक्तिमय संगीताच्या सहाय्याने रामसेतूचा देखावा अत्यंत देखण्या पद्धतीने साकारला आहे.

हा देखावा केवळ धार्मिकच नव्हे तर सांस्कृतिकदृष्ट्याही उल्लेखनीय ठरत आहे. उत्सवाच्या आयोजनामध्ये पुढील कार्यकर्त्यांचा मोलाचा सहभाग आहे रवि चंदवानी, सुशील चंदवानी, अशोक चंदवानी, गंगाराम चंदवानी, जयकुमार तोपवानी, नितीन जेसवानी, राकेश रामवानी, रितेश कृपलानी, दीपक चंदवानी, राम गिडवाणी, हितेश केवलरामानी, करण केवलरामानी, बंटी जेसवानी, नितेश चंदवानी, आणि घनश्याम चंदवानी यांचे विशेष योगदान आहे.मंडळाने स्थानिक नागरिकांसाठी सुरक्षा आणि स्वच्छतेची विशेष काळजी घेतली आहे. याशिवाय, महिला व वृद्धांसाठी स्वतंत्र दर्शन रांग, तसेच पिण्याच्या पाण्याची व इतर आवश्यक सुविधांचीही व्यवस्था करण्यात आली आहे. दुगामार्तेचा आशीर्वाद घेण्यासाठी आणि रामसेतूचा अद्वितीय देखावा पाहण्यासाठी नागपूरकरांनी एकदा तरी या ठिकाणी अवश्य भेट द्यावी, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.




## अष्टस्थानम महाकन्या पूजन देशभरात संपन्न




■ महासागर प्रतिनिधी, नागपुर, दि. ३ :
नवरात्रीच्या निमित्ताने बेटियां शक्ती फाउंडेशन नागपुर द्वारे देशातील विविध आठ ठिकाणी आयोजित केल्या गेलेल्या अष्टस्थानम महाकन्यापूजनात विक्रमी ५३० पेक्षा जास्त कन्यांचे पूजन करून त्यांना विविध प्रकारची आर्थिक व शैक्षणिक मदत करण्यात आली.

बेटियां शक्ती फाउंडेशन द्वारे २०१९ वर्षीपासून दरवर्षी कन्यापूजन आयोजित करून कन्यांना विविध प्रकारची मदत करण्यात येते. या वर्षी संस्थेद्वारे देशातील सीमावर्ती भागातील पुरग्रस्त सात ठिकाणावर व नागपुरात अशा आठ ठिकाणी कन्यापूजन आयोजित करण्यात आले होते.उपक्रमाची सांगता महाष्टमीला फाउंडेशनच्या नागपुर शहरातील खरबी मधील सभागृहात कन्यापूजनाने व कन्याभोजनाने करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजना करिता संस्था पदाधिकारी, स्वयंसेवक व सर्वसामान्य नागरिकांनी परिश्रम घेतले.

## निधन वार्ता

### देवराव दवणे

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ३ :
नागपूर तालुक्यातील येरला ग्रामपंचायतचे पहीले सरपंच देवराव आण्णाजी दवणे यांचे निधन झाले. ते १०४ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात दत्तकपुत्र चंद्रशेखर गमे व बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर फ्रेंड्स कॉलनी घाटावर शुक्रवारी अंत्यसंस्कार करण्यात आला.



### मुलचंद चरडे

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ३ :
येथील आदर्श नगर निवासी ऑर्डनन्स फॅक्टरी अंबाझरी येथील सेवानिवृत्त अधिकारी मुलचंद चरडे यांचे निधन झाले. ते ८१ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी व बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी टेकडीवाडी स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आला.

# ग्रामीण प्रादेशिक पत्रकार संघाचा विस्तार



■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. ३ :
आता पत्रकार केवळ उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडमध्येच नव्हे तर इतर राज्यांमध्येही ग्रामीण पत्रकार संघटनेच्या विचारसरणीवर विश्वास दाखवत आहेत. राजस्थानमधील माउंट अबू येथील मान मोहिनी कॉम्पसच्या दिव्य जगात मंगळवारी ग्रामीण पत्रकार संघटनेची एक महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीचे अध्यक्ष राष्ट्रीय संरक्षक दयाचंद वर्क होते आणि राष्ट्रीय सरचिटणीस हरेंद्र चौधरी यांनी संचालन केले. हरियाणा, राजस्थान, नागपूर आणि हैदराबाद येथील पत्रकारांशी दीर्घ चर्चा केल्यानंतर, या राज्यांमध्ये ग्रामीण पत्रकार संघटनेचे संघ तयार करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना राष्ट्रीय संरक्षक दयाचंद वर्क म्हणाले की, GAPA ची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत आहे. GAPA ही पत्रकारांच्या हिताचा आवाज जोरदारपणे उठवणारी संघटना आहे. एवढेच नाही तर पत्रकारांना न्याय मिळावा यासाठी GAPA संघटना २४ तास लढण्यासाठी तयार आहे. राष्ट्रीय सरचिटणीस हरेंद्र चौधरी यांनी आपल्या भाषणात सांगितले की, हरियाणा, राजस्थान, नागपूर आणि हैदराबादमध्ये एक मजबूत टीम तयार करण्यात आली आहे आणि लवकरच या राज्यांच्या प्रत्येक जिल्ह्यात एक मजबूत GAPA संघटना स्थापन केली जाईल.

महाराष्ट्रातील बहुतेक जिल्ह्यांमध्ये लवकरच जिल्हा समन्वयकांची नियुक्ती केली जाईल असे वरिष्ठ महाराष्ट्र समन्वयक तुलसीराम ठाणेकर यांनी सांगितले. हरियाणाहून उपस्थित असलेले ज्येष्ठ पत्रकार राजकुमार म्हणाले की, आपल्याला अशा संघटनेची आवश्यकता आहे. पत्रकारांच्या हितासाठी काम करा. हरियाणामध्ये लवकरच ग्रामीण क्षेत्र पत्रकार संघटना स्थापन केली जाईल. राजस्थानमधील पवन बैठकीला उपस्थित होते.

गर्ग यांची राजस्थानसाठी संयोजक म्हणूनही नियुक्ती करण्यात आली आहे. या बैठकीला राष्ट्रीय संरक्षक दयाचंद वर्क, राष्ट्रीय सरचिटणीस हरेंद्र चौधरी, राष्ट्रीय कोषाध्यक्ष रमेश चौहान, राष्ट्रीय सचिव अशोक सोम, मेरठ जिल्हा सरचिटणीस शिवकुमार शर्मा, राजवीर सिंग, संजय त्यागी, संतोष तायडे, सुनील तिजारे आणि इतर उपस्थित होते.

## वाडीत आ. समीर मेघे यांच्या हस्ते रावण दहन

■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. ३ :
दत्तवाडीतील गजानन सोसायटीच्या क्रिडा मैदानावर विजयादशमीचे औचित्य साधत आमदार समीर मेघे यांच्या हस्ते पारंपरिक पद्धतीने रावण दहन करण्यात आले. जिंदल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी रामायणावर आधारित आकर्षक नृत्य व नाट्य सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणामुळे सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला.या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते लोकेश जिंदल यांनी विजयादशमीला ऑपरेशन सिंदूर शी जोडत मार्गदर्शन केले. त्यांनी समाजातील वाईट प्रवृत्तींच्या दहनाची आवश्यकता पटवून दिली.रावण दहनाच्या वेळी परिसरात "जय श्रीराम" च्या घोषणांनी उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. आयोजनासाठी मानसिंह ठाकुर , राजेश जयस्वाल,कश्यप, सतीश जिंदल, अनिल भाटिया, अभय कुनावर, हर्षल काकडे, केसरवानी, बबलू ढाकरिया आदींनी सहकार्य केले.

# महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती साजरी

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ३ :
दि. २ ऑक्टोबर २०२५ रोज गुरुवारला राष्ट्रीय आदर्श विद्यालय प्राथमिक विभागात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती निमित्य प्रभात फेरीचे तसेच भाषण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.भाषण स्पर्धेची तीन विभागात विभागणी केली असून गट क्रमांक अ बालवाडी विभाग प्रथम क्रमांक आर्यन बावणे, द्वितीय क्रमांक जुबिया कुरेशी, तृतीय क्रमांक नित्या गुजरकर तर गट क्रमांक ब वर्ग पहिला व दुसरा मधून प्रथम क्रमांक निकुंज डोंगरे, द्वितीय क्रमांक उन्नती भोंगाडे, तृतीय क्रमांक नैना साह.गट - क वर्ग तिसरा व चौथा मधून प्रथम क्रमांक युग महाजन, द्वितीय क्रमांक अर्णव पंधराम, तृतीय क्रमांक ध्रुवी कुंभलकर तर सहभागी सर्व स्पर्धकांना प्रोत्साहन पर पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे सदस्य होमराज हजारे, प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. जगदीश गुजरकर, संतोष ठकरेले होते.




कार्यक्रमाचे संचालन दुर्गा भोंगाडे, आभार प्रदर्शन दिलीप जांभुळे यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रसंगी मोठ्या संख्येने पालक वर्ग सुद्धा उपस्थित होता, कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष तथा माजी आमदार आनंदराव देशमुख तसेच सचिव मयंक देशमुख यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक निलेश टोंगसे, सुहास महाजन, रोशनी सावरकर, अनिता देशमुख, प्रियंका हांडे, डोंगरे, मीना लंघे यांचे सहकार्य लाभले.

## शिव राम मंदिर येथे गरबासह कार्यक्रम आयोजित

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. ३ :
शिव राम मंदिर रचना अपार्टमेंट जवळ, प्रभाग क्रमांक ८ येथे गरबाचे आयोजन करण्यात आले . लोक कलावंत पुष्पा सांभारे, अंकिता कोहळे व सहकाऱ्यांनी भजन, गरबा व अन्य कार्यक्रमांचे आयोजन केले होते . प्रभागातील महिला मंडळ यांनी पूजा बोडले, मंजु राऊत, माया ठाकरे, पुष्पा डोंगरे, निर्मला सायरे, इंदू चव्हाण, रोशनी डोंगरे, सोनु सोनवणे, सभापती वंदनाताई दादाराव मुडे, यांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले.



आजही लोक कलावंत त्यांची लोकला टिकवून आहेत, लोककलावंताला शासनाकडून मदत व्हायला हवी, अशी अपेक्षा या कार्यक्रमाचे अध्यक्ष पत्रकार राजेंद्र सांभारे यांनी व्यक्त केली.

## माऊली नगरमध्ये होम मिनिस्टर स्पर्धा उत्साहात

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ३ :
येथील माली नगर युवा मंचाच्या वतीने रविवार २८ सप्टेंबर रोजी दुर्गा माता मंदिर प्रांगणात होम मिनिस्टर स्पर्धा उत्साहात पार पडली. स्पर्धेत जया सोनवणे, अश्विनी साहू, पुष्पाऊ कोरे, प्रतिभा कोरे, कृतिशा भिवगडे, रुद्र रंगारी,शिवानी गुप्ता, अनु शर्मा, युगांधरा देवकापुरवार, रुपाली चरडे, नेहा रबडे यांनी विजेता घोषीत करुन त्यांना बक्षिस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन रावनीत कौर यांनी केले.

## काटोल अर्जुन नगर येथे ६९ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन संपन्न



■ महासागर प्रतिनिधी
नरखेड, दि. ३ :
२ ऑक्टोंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती अर्जुन नगर, महाराष्ट्र शाहीर परिषद शाखा काटोल तसेच भारत सांस्कृतिक मंडळ काटोल यांच्या संयुक्त विद्यमाने अर्जुन नगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ ६९ वा धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री तानबा सिंगारे यांचे मार्गदर्शन उपस्थितांना लाभले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोंबर १९५६ ला नागपूर येथील दिक्षा भूमीवर ५ लाख लोकांसोबत बौद्ध धम्माची दिक्षा घेतली तो दिवस दसऱ्याचा होता.

म्हणून दरवर्षी दसऱ्याच्या दिवशी धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा कार्यक्रम होतो. त्यादिवशी देशातून व जगातून लाखो लोक दीक्षाभूमीवर येऊन नतमस्तक होऊन अभिवादन करतात. बौद्ध धम्म हा विज्ञानाशी जुळला आहे इथे अंधश्रद्धेला स्थान नाही. जो पंचशीलाचे पालन करतो त्याचा सर्वांगीण विकास होतो. यावेळी गायिका शशिकला सिंगारे व त्यांचा संच यांनी आपले गीत गायनातून व डॉ. आंबेडकर यांचे विचार पटवून दिले. उपस्थित तुकाराम श्रृंगारे, गजानन धवराळ, गायक व ढोलक वादक पत्रकार राजेंद्र बागडे, माला कोठे, दिपाली वानखेडे, लीला वानखेडे, सरला वानखेडे, कांचन घोरपडे, मंदा श्रृंगारे ,ललिता नाईक, पंचफुला मेश्राम, आदी महिला पुरुष व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन रितेशकुमार सिंगारे यांनी केले तर आभार भाऊराव ढोणे यांनी मानले.

# समाजाच्या भल्यासाठी संपूर्ण महाराष्ट्राचा आवाज बनणार

## आमदार डॉ.आशिष देशमुख : सावनेर येथे अभूतपूर्व दसरा मेळावा संपन्न



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

विकासाच्या राजकारणासाठी व समाजाच्या भल्यासाठी विधानसभेत आणि विधानसभेच्या बाहेरदेखील संपूर्ण महाराष्ट्राचा आवाज बनणार, अशी गर्जना सावनेर-कळमेश्वर क्षेत्राचे आमदार डॉ आशिषराव देशमुख यांनी सावनेर येथे आयोजित अभूतपूर्व दसरा मेळाव्यात नतमस्तक होऊन केली.

विजयादशमी, धम्मचक्र प्रवर्तन दिन, गांधी जयंती व आरएसएस स्थापना शताब्दी निमित्त भारतीय जनता पार्टी ओबीसी आघाडी, महाराष्ट्रद्वारे आमदार डॉ आशिषराव देशमुख यांच्या नेतृत्वात गुरुवार, दिनांक 02 ऑक्टोबर 2025 रोजी नगर परिषद ग्राउंड, सावनेर येथे भव्य दसरा मेळावा आयोजित करण्यात आला होता. सध्याची राजकीय परिस्थिती, राज्यातील घडामोडी, नागपूर जिल्ह्यातील राजकारणाची दिशा, सावनेर नवनिर्माण, सावनेर-कळमेश्वर क्षेत्राचा विकास, आगामी निवडणुका अशा अनेक विषयांवर आमदार डॉ आशिषराव देशमुख आपले प्रखर विचार व्यक्त केले.

आपल्या दमदार भाषणात ते म्हणाले, "विजयादशमी, धम्मचक्र प्रवर्तन दिन, गांधी जयंती व आरएसएसच्या स्थापनेची शताब्दी या चारही विश्वव्यापी कार्यक्रमांचा आज सुरेख संयोग जूळून आला आहे. आणि म्हणूनच सर्व समाजाला आपल्या राष्ट्राच्या तिरंगा झेंड्याखाली आणण्याचं काम आपण इथे सावनेरला करतो आहे. विदर्भातला सर्वात उंच तिरंगा सावनेर येथील गांधी चौकात उभारल्या जातो आहे. याच दिवासाला प्रभू श्रीरामाने अहंकाररूपी रावणाचा वध करून सितामातेला मुक्त केले होते. तसेच देवी दुगार्ने महिषासुराचा वध करून कित्येक पिडितांना मुक्त केले होते. यापासून स्फूर्ती आणि शक्ती घेत मी आशिष देशमुख तुमची अविरत सेवा करण्याचा प्रयत्न करत आहे.

स्वच्छ गाव, समृद्ध गाव या गांधीजींच्या स्वप्नपूतीर्साठी मला तुम्हा सगळ्यांची साथ हवी आहे. तुम्हां सर्वांना माहित आहे की, यापूवीर्चे सत्ताधारी कित्येक वर्षे तुमच्यासोबत जमीनदार म्हणून वागत होते. परंतू तुमचा आशिष तुम्हां सर्वांचा सालदार म्हणून काम करेल व सदैव तुमचा सालदार म्हणून वागेल. मी लोकप्रतिनिधी आहे, सत्ताधारी नव्हे. मी तुमचा सेवक आहे, मालक नव्हे. इमाने इतबारे, प्रेमाने, जिव्हाळ्याने, आपुलकीने, आदराने आपली अविरत सेवा करेल, अशी या शुभदिनी आपणा सर्वांना मी ग्वाही देतो, नतमस्तक होऊन वचन देतो."

ते पुढे म्हणाले, "आपण सर्वजण बहुतांश इथे ओबीसी समाजाचे आहोत आणि आपल्याला गर्व आहे की, आपल्या देशाचे लाडके पंतप्रधान हे देखील ओबीसी समाजातून येतात. त्यांच्या नेतृत्वामध्ये मागील १० वर्षांमध्ये देशाने यशाचं शिखर गाठलं आहे. त्यांनी ओबीसी आयोगाला संवैधानिक दर्जा दिला. लवकरच ओबीसीची जातीय जनगणना चालू होणार आहे. मोदींनी ऑपरेशन सिंदुरद्वारे पाकिस्तानला वठणीवर आणले. आपल्या देशातच शस्त्र निर्मिती करून संरक्षण क्षेत्राला आत्मनिर्भर बनविण्याचं धोरण त्यांनी आखलं आहे. त्याच अनुषंगाने, ६ हजार हेक्टर जमिनीवर सावनेर एमआयडीसी येथे रक्षा कॉरीडॉर (डीएनए) प्रस्तावित आहे. सावनेर परिसरात १० हजार कोटींचा खत प्रकल्प एमआयडीसी सावनेर येथे उभारीत आहोत, यामुळे ३१ हजार लोकांना रोजगार मिळणार आहे. ७० हजार कोटी गुंतवणुकीचा कोळसा वायुकरण (गॅसिफिकेशन) प्रकल्प उभारीत आहोत, त्यामध्ये ३५ हजार रोजगार निर्मिती मिळेल. २५०० कोटींचा सावनेर - छिंदवाडा फोर लेन रोड, १८०० कोटींचा कन्हान नदी डायव्हर्शन सिंचन प्रकल्प ज्यामुळे १२०० हेक्टर शेती सिंचनाखाली येणार, सावनेर येथील पाच मजली नविन न्यायालय भवन निर्माण करण्याकरिता ४४ कोटींची मंजूरी, सेतू बंधन योजनेअंतर्गत कळमेश्वर रेल्वे गेटवरील उड्डाणपूल (फड.इ.) निर्मितीकरिता ५५ कोटी आणले तसेच सावनेर व कळमेश्वर क्षेत्राचं सौंदर्य वाढविण्यासाठी ७५ कोटी रुपए मुख्य रस्त्यांसाठी आणले. नागपूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेवर प्रशासकाची नियुक्ती झाल्यानंतर बँक नफ्यात असून सुरळीत सुरू झालेली आहे आणि याचा सर्वांना फायदाच होत आहे. आपण खापरखेडा पोलीस स्टेशनचे पोलीस आयुक्त नागपूर शहरामध्ये वर्गीकरण केले, मोहपा येथे नविन पोलीस स्टेशनची निमीर्ती केली, सावनेर नगरीतील समस्त जनतेच्या संरक्षणासाठी १ कोटी रूपयांचे सीसीटीव्हीचे जाळे शहरामध्ये लावण्यात आले.

# पाण्यात बुडून तरुणाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ३ :



दसऱ्याच्या दिवशी आनंदमय वातावरण असताना द्रुगधामना गावावर शोककळा पसरली. येथील रहिवासी यश सुखदेव मोहोड (वय २३ वर्षे) हा तरुण गुरुवार २ ऑक्टोबर रोजी सकाळी आपल्या दुचाकी वाहनासह द्रुगधामना तलावावर गाडी धुण्यासाठी गेला होता. मात्र पाण्याचा खोलीचा अंदाज न आल्याने तो खोलगट भागाकडे गेला आणि त्यात पाण्यात बुडून मृत्यू पावला. यश मोहोड हा गावातील धार्मिक आणि सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर राहणारा, मनमिळावू स्वभावाचा तरुण म्हणून ओळखला जात होता. त्याच्या अकस्मात मृत्यूमुळे गावात दसऱ्याच्या सणावर विरजण पडले आहे.

यश हा आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा होता. त्याची एक मोठी बहीण असून तिचे लग्न झालेले आहे. घरातील एकुलत्या मुलाचा अशा प्रकारे झालेला दुर्दैवी मृत्यू हा मोहोड कुटुंबीयांवर आकाश कोसळल्यासारखा आहे. गावातील हळहळ व्यक्त होत असून प्रत्येकाच्या डोळ्यांतून अश्रू अनावर झाले आहेत. शुक्रवार ३ ऑक्टोबर रोजी त्याचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले. त्यानंतर शोकाकुल वातावरणात द्रुगधामना घाटावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

अंत्ययात्रेत मोठ्या संख्येने गावकरी, नातेवाईक, मित्रपरिवार आणि सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. या दुर्दैवी घटनेमुळे द्रुगधामना गावात शोककळा पसरली असून मोहोड कुटुंबाला या दुःखातून सावरणे कठीण झाले आहे.

# शासकीय कार्यालयात मराठी भाषेचा वापर अधिकाधिक व्हावा : डॉ. कोमल ठाकरे



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

मराठी भाषेला चिरंतन मूल्य असून, या भाषेचा वापर शासकीय व्यवहार व संवादासाठी अधिकाधिक होण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक प्रा. डॉ. कोमल ठाकरे यांनी केले.

नागपूर महानगरपालिकेच्या अमृत वर्षाचे औचित्यसाधून अभिजात मराठी भाषा सप्ताह अंतर्गत अभिजात मराठी भाषा सन्मान दिवसानिमित्त शुक्रवारी (ता.३) नागपूर महानगरपालिकेच्या मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख सभागृहात कार्यक्रम पार पडला. ३ ऑक्टोबर ते ९ ऑक्टोबरपर्यंत हा सप्ताह साजरा केला जाणार आहे. यावेळी अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी, अतिरिक्त आयुक्त विजया बनकर, अधीक्षक अभियंता लिना उपाध्याय, शिक्षणाधिकारी साधना सयाम, सहायक आयुक्त श्याम कापसे, जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी उपस्थित होते.

शासकीय कामकाजात मराठी भाषेचा दर्जेदार उपयोग या विषयावर डॉ. ठाकरे यांनी विचार व्यक्त केले. यावेळी बोलताना डॉ. कोमल ठाकरे यांनी मराठी भाषेच्या वैभवशाली इतिहासाचा धांडोळा घेतला. डॉ. ठाकरे यांनी महाराष्ट्रातील संत परंपरेने मराठी भाषेला एक सर्वोत्कृष्ट भाषा करण्यात मोलाचा वाटा उचलला. संत ज्ञानेश्वरांनी या भाषेला अमृताहून गोड असल्याचे म्हटले आहे.

अशा या दर्जेदार भाषेचा वापर कार्यालयीन कामकाजासोबत दुसऱ्याशी संवाद करताना अधिकाधिक केल्यास मराठी भाषा चिरंतन राहण्यास व समृद्ध होण्यास नक्कीच मदत होईल, असेही त्यांनी सांगितले.

## १५९ दुर्गादेवी मूर्तीचे शांततेत विसर्जन

**नागपूर :** शक्तीचे रुप असलेल्या दुर्गादेवी उत्सवाची सांगता विसर्जनाने झाली असून, नागपूर महानगरपालिकेतर्फे शहरातील विविध ठिकाणी उभारलेल्या पर्यावरणपूरक कृत्रिम तलावांमध्ये २ ऑक्टोबरपर्यंत १५९ दुर्गादेवींच्या मूर्तीचे विसर्जन झाले आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशानुसार, अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांच्या मार्गदर्शनात घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त राजेश भगत यांच्या नेतृत्वात मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले यांच्या सह संबंधित झोनचे सहायक आयुक्त यांनी दुर्गादेवी मूर्तीचे विसर्जनाची व्यवस्था केली आहे.



■ नागपूर : स्वामीनगर येथे रावणासोबत कुंभकर्ण व मेघनाद यांचे दहन

# लक्ष्मीनगर झोन कार्यालयामार्फत जप्ती कारवाई

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

नागपूर महानगरपालिकेच्या लक्ष्मीनगर झोन क्र. १ अंतर्गत मालमत्ता कर थकवणाऱ्यांवर धडक कारवाई सुरू आहे. या अंतर्गत आय.टी. पार्क परिसरामधील मे. प्रिमीयर टेक्नॉलॉजी प्रा. लि. या कंपनीने सन २०२३ ते २०२५ या कालावधीतील मालमत्ता कराचा भरणा न केल्यामुळे त्यांच्या मालमत्तेवर जप्तीची कारवाई करण्यात आली आहे. सदर मलामत्ता धारकावर एकुण १३ लाख ५४ हजार ९६३ रुपये इतकी मालमत्ता कराची थकबाकी होती. या थकबाकीपोटी मनपाने वॉरंट जारी करून जंगम आणि स्थावर मालमत्तेची जप्ती व अटकावणी करण्याची कारवाई पार पाडली.

मे. प्रिमीयर टेक्नॉलॉजी प्रा. ली. च्या विविध मालमत्तावर थकबाकी होती यातील मालमत्ता घर क्र. १६४१/बी/२१ वर, रू ५,०२,४४६ रक्कम थकीत होती. तर १६४१/बी/२१/यु-१ वर रू. १,८५,२७४, रक्कम, १६४१/बी/२१/ यु-२ वर रू. ८४,६७६ रक्कम तर १६४१/बी/२१/यु.३ वर ५,८२,५६७ असे एकुण १३,५४,९६३ रक्कम थकीत असल्याने ही कारवाई करण्यात आली आहे. यात लक्ष्मीनगर झोनचे अधिकारी नरेश केळझरकर यांच्या नेतृत्वाखाली ही जप्तीची कारवाई करण्यात आली. यावेळी कर अधीक्षक, कर निरीक्षक गौतम मेश्राम, नरेंद्र जांभुळकर, पुरुषोत्तम भडंग आणि कर संग्राहक अमोल काटेकर, राहुल गेडाम आदी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कारवाई यशस्वी केली.

मालमत्ता धारकांनी जप्ती व अटकावणीच्या कारवाईची तातडीने दखल न घेतल्यास, मनपा अधिनियम ४५(१) अंतर्गत थकबाकीदारावर हुकूमनामा प्रसिद्ध करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा मनपाने दिला आहे. सर्व थकबाकीदारांनी पुढील कारवाई टाळण्यासाठी थकीत कर त्वरित भरावा, असे आवाहन नागपूर महानगरपालिकेकडून करण्यात आले आहे.

# स्तंभलेखक प्रवीण बागडे यांना मातृशोक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :



प्रसिद्ध स्तंभलेखक आणि समाजाभिमुख विचारवंत प्रवीण बागडे यांना मातृशोक झाला आहे. त्यांच्या मातोश्री नवयुग/पं. बच्चराज व्यास विद्यालयातील सेवानिवृत्त शिक्षिका बुद्धवासी शालीनी मोरेश्वर बागडे वय वर्षे ७८ यांचे ०२ ऑक्टोबर २०२५ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांचा अंत्यसंस्कार नारा दहन घाट, जरीपटका, नागपूर येथे करण्यात आला. त्यांच्या मागे मुलगा ललित, प्रवीण, आणि नितीन (बालू) तसेच बराच मोठा आप्त परिवार आहे. या प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी बागडे कुटुंबियांप्रती संवेदना व्यक्त केल्या आहेत.

साहित्य, समाजकारण आणि जनजागरण क्षेत्रात आपल्या लेखणीद्वारे महत्वाचे योगदान देणारे प्रवीण बागडे यांना मिळालेला हा वैयक्तिक आघात अतिशय वेदनादायी आहे. त्यांच्या मातोश्रींच्या निधनाने समाजातील एक प्रेमळ, मार्गदर्शक व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून येणार नाही, परंतु त्यांच्या मुलांमार्फत केलेले कार्य हेच त्यांचे खरे स्मारक ठरेल. या दुःखद प्रसंगामुळे बागडे कुटुंबीयांवर शोककळा पसरली आहे.

**महासागर**
**प्रभाग वार्ता**

# विभागीय क्रीडा संकुल मानकापूर येथे कुत्र्यांचा हैदोस

## खेळाडूंच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह

प्रमोद जांभूळकर,
नागपूर दिनांक ३

शहरातील मानकापूर येथील विभागीय क्रीडा संकुलामध्ये सध्या भटक्या कुत्र्यांचा हैदोस वाढला असून, तेथे नियमितपणे प्रशिक्षणासाठी येणाऱ्या खेळाडूंसमोर नव्या प्रकारची अडचण निर्माण झाली आहे. कुत्र्यांच्या कळपामुळे खेळाडूंमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, त्यांचा शारीरिक व मानसिक ताणही वाढला आहे. गेल्या काही दिवसांपासून संकुल परिसरात भटक्या कुत्र्यांची संख्या लक्षणीयरीत्या वाढली आहे. काही प्रकरणांमध्ये कुत्र्यांनी खेळाडूंवर हल्लाही केल्याचे समोर आले आहे. परिणामी, संकुलात प्रवेश करताना गेटवरच बंदोबस्त ठेवण्याची वेळ आली आहे. या पार्श्वभूमीवर खेळाडू, प्रशिक्षक आणि कर्मचाऱ्यांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.



### प्रशासनाची तातडीने दखल आवश्यक

मानकापूर क्रीडा संकुल हे नागपूरमधील एक प्रमुख प्रशिक्षण केंद्र आहे. येथे विविध खेळांचे प्रशिक्षण नियमितपणे दिले जाते. अशा ठिकाणी सुरक्षिततेचा अभाव असल्यास खेळाडूंच्या प्रगतीवर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. त्यामुळे संबंधित प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून योग्य ती कारवाई करावी, अशी अपेक्षा खेळाडूंनी व पालकांनी व्यक्त केली आहे.

### खेळाडूंसाठी सुरक्षित आणि अनुकूल वातावरण हवे

या प्रकारामुळे विभागीय क्रीडा संकुलाचा वापर करणाऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. खेळाडूंना सुरक्षित, शांत आणि एकाग्रतेसाठी पोषक वातावरण मिळणे आवश्यक आहे. यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करून भटक्या कुत्र्यांच्या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढावा, ही वेळेची गरज आहे.

### सुरक्षा व्यवस्था धोक्यात

संकुलाची देखभाल करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी कुत्र्यांच्या त्रासाविरुद्ध उपाययोजना करण्याचा प्रयत्न सुरू केला असला, तरीही परिस्थितीवर अद्याप नियंत्रण मिळवण्यात अपयश आले आहे. परिसरात सुरक्षा जाळे बसवण्याची आवश्यकता आहे, तसेच भटक्या कुत्र्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्थानिक प्रशासनाने पशुसंवर्धन कायद्याची कडक अंमलबजावणी करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# आनंद नगर येथे कचऱ्याच्या समस्येने नागरिकांचे आरोग्य धोक्यात



**प्रदीप पौनिकर, नागपूर दि. ३**

प्रभाग क्र.५, पंचवटीक्काटर, आनंद नगर, या वस्तीमध्ये कचऱ्याचे ढीग साचल्याने नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.मनपा प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे नागरिक त्रस्त आहे आणि प्रशासन मस्त आहे.

वस्तीमध्ये अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग पडलेले आहेत, ज्यामुळे परिसरातील नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. कचऱ्याच्या ढिगाऱ्यामुळे डेंगू ,मलेरिया, चिकनगुनिया, हिवताप यासारखे रोग घरोघरी पसरत आहे. पर्यावरण प्रदूषण, आणि सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत.

''वस्तीमध्ये कचऱ्याचे ढीग पडलेले आहेत, त्यामुळे रहिवाश्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. कचऱ्यामुळे आरोग्य समस्या निर्माण झाल्या आहेत आणि परिसराची शोभा कमी झाली आहे. आम आदमी पक्षाच्या वतीने मनपा सतरंजीपुरा पुरा झोनचे सहाय्यक आयुक्त यांना अनेकदा तक्रार केल्यानंतरही लक्ष देत नाही, प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे काम होत नाही.जर मनपा प्रशासनने स्वच्छतेकडे लक्ष दिले नाही तर आम आदमी पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे. आम आदमी पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते प्रदिप पौनिकर, क्षितिज वंजारी, अनिल संभे, किसन निमजे, हेमराज कुंभारे, विजय नंदनवार, नानक धनवानी, मनोज फटींग, जानकीशरण साहू, दिलीप टाले, संजू पटेल, केतन ठाकूर, हरेश निमजेसुनिल गजभिये, स्वाती तारवानी, हरिहर पराते, आरती दलाल, नीलकंठ टाकलीकर, संदिप साखरे, लीना गजभिये, त्रिवेणी सहारे, संजू पटले, विनोद निखारे, अरुन गुणारकर, बाबुराव निमजे, डॉ. जयप्रकाश पौनिकर उपस्थित होते.

# सांडपाण्याच्या समस्येने नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**प्रदीप पौनिकर,**
**नागपूर दि. ३**

प्रभाग क्र.५,नवी मंगळवारी, पोळा मैदान येथे सांडपाण्याच्या समस्येने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे ही समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. नागरिकांना विविध आजारांचा सामना करावा लागत आहे आणि त्यांचे जीवन त्रस्त झाले आहे.

सतरंजीपुरा झोन चे सहाय्यक आयुक्त याना अनेकदा निवेदने देण्यात आले आहे. तरी मनपा प्रशासनाने दखल घेतली नाही. जर प्रशासनाने लक्ष दिले नाही तर आम आदमी पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला.



यावेळी,प्रदिप पौनिकर, हरेश निमजे, किशन निमजे, विजय नंदनवार, हेमराज कुंभारे, अनिल संभे, नानक धनवानी, आरती दलाल, संदीप साखरे, किशोर मौंदेकर, केतन ठाकूर, दिपक कोदरलीकर, सुनिल गजभिये, दिलीप रामटेक्कर, हरी निखारे, मनोज फटींग, क्षितिज वंजारी, निलकंड टाकलीकर, हरिहर पराते, कृष्णा पाठराबे, प्रिती पौनिकर, स्वाती तारवानी, अंशु बिरेवार, अमोल उके, संजू पटले, राजकुमार किटाळीकर, जयघोष कोटांगले, गोविंदा केळवदकर, अनिल चांदेकर, अरुण गुणारकर, बाबुराव निमजे,आम आदमी पार्टीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.